# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. २३/०३/२०१५**

आज सोमवार दि. २३/०३/२०१५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०८ दि. ११/०३/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | केळुसकर प्रशांत नारायण | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ५) | सामंत प्रमोद जयराम | विरोधी पक्षनेता |
| ६) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ९) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| १०) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ११) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १२) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १४) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १५) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १६) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १७) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १८) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १९) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २०) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २१) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २२) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २३) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २४) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २५) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २६) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २७) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २८) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २९) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३१) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३२) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३३) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३४) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३५) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३६) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३७) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३८) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३९) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४०) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४१) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४२) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४३) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४४) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४५) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४६) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४७) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४८) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४९) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ५०) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५१) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५२) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५३) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५४) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| ५५) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५६) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५७) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५८) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५९) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ६०) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६१) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६३) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६४) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६५) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६६) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६७) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६८) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६९) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७०) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७१) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७२) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७३) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७४) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७५) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७६) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७७) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७८) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७९) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८०) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८१) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८२) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८३) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८४) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८५) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८६) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८७) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| २) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ३) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | सदस्या |
| ४) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ५) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३) | सुमबंड महरूनीसा हारूनरशीद | सदस्या |

**मा. महापौर :-**

नमस्कार. आजच्या सभेत सर्व नगरसेवक व मा. आमदारांचे मनपूर्वक स्वागत. प्रेक्षक गॅलरीत बसलेले सर्व नागरीक, पत्रकार बंधू ह्यांचे स्वागत आहे. ह्या सभेत आपण काही महत्वाचे विषय घेतले आहेत. शाळेतील गणवेश, गेल्यावर्षी सगळ्यांची फिर्याद होती की गणवेश वेळेवर भेटत नाही. त्यामुळे ह्यावर्षी वेळेवर विषय घेऊन लवकर गणवेश द्यायचा प्रयत्न केला आहे. मा. सभासदांना विनंती राहील ह्यास सहकार्य करावे. नाल्याचा विषय देखील वेळेवर घेऊन वेळेवर करायचा प्रयत्न केला आहे. मा. सभासदांना विनंती राहील सर्वांनी सहकार्य करुन ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी धन्यवाद.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम, सभा सुरु करण्याचा तुम्ही आदेश केलेला आहे. आणि आज आपण सर्व सभासदांकडून सभा चालवण्यासाठी सहकार्याची अपेक्षा केलेली आहे. प्रत्येक चांगल्या कामामध्ये आमच्या सर्वांचे सहकार्य आपणाबरोबर राहील ह्याची मी विरोधी पक्षनेता म्हणून तुम्हाला ग्वाही देतो. गेल्या आठवड्यापासून शहरामध्ये बऱ्याच गोष्टी घडलेल्या आहेत. दोन गुन्हे दाखल झालेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

सभेचे कामकाज चालू होऊ द्या.

**प्रमोद सामंत :-**

मी पाच मिनिटे बोलणार.

**मा. महापौर :-**

विरोधी पक्षनेता सभागृह नेत्यांनी बोलल्याप्रमाणे तुम्हाला वेळ देणार.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम, सभेसमोर हा विषय आला पाहिजे. पाच मिनिटांची वेळ द्या.

**मा. उपमहापौर :-**

देण्यात येईल. सभेचे काम चालू होऊ द्या.

**प्रमोद सामंत :-**

सभागृहाच्या इतिहासात हा पहिला दिवस आहे.

**मा. उपमहापौर :-**

सभा चालू होऊ द्या.

**प्रमोद सामंत :-**

हा असा विषय आहे दोन गुन्हे दाखल झाले आहेत. आजचा दिवस हा सभागृहाचा शर्मनाक दिवस असला पाहिजे. जो गुन्हा दाखल झाला आहे तो दलितांवर मोलमजुरी करुन आपली उपजिविका करणाऱ्या एका महिलेवरती आपण अत्याचार केला आहे आणि त्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. आणि दुसरा गुन्हा त्यापेक्षा गंभीर स्वरुपाचा आहे. एका अल्पवयीन मुलीवर विनयभंग केल्याचा आरोप झालेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ह्या सभागृहाचे कामकाज आणि बाहेर काय घडले ह्याचा संबंध ह्या सभागृहात नाही.

(सभागृहात गोंधळ)

**प्रमोद सामंत :-**

हा विषय सभागृहाशी निगडीत आहे. म्हणून मी बोलतो. अश्विन कासोदरियावर विनय भंगाचा आरोप झाला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

आरोप लादला कसे बोलता तुम्ही.

**प्रमोद सामंत :-**

आरोपी फरार आहे.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

हा गंभीर गुन्हा आहे. ह्या गंभीर गुन्ह्याचा आम्ही निषेध करत आहोत.

**मा. उपमहापौर :-**

जुबेरजी जोपर्यंत आरोप सिध्द होत नाही तोपर्यंत आरोपी होऊ शकत नाही.

**नगरसचिव :-**

परिपत्रक टाईप करणे.

**जुबेर इनामदार :-**

आरोपी नाही तर पळाला कशाला.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही आमच्याकडून सहकार्य अपेक्षित करता तुम्ही त्याच्यावर निवेदन द्या.

**मा. महापौर :-**

तुम्ही बसा.

**प्रमोद सामंत :-**

मी बसतो मला निवेदन द्या, आम्हाला तुमचे निवेदन ऐकायचे आहे.

**नगरसचिव :-**

जम्मू काश्मीर सरकारने त्यांना जीवन गौरव पुरस्कार दिला आहे. प्रमोद चितारीचा सन्मान करण्यात आला.

**अशरफ शेख :-**

तुम्ही कोणाचा सत्कार करता ते आम्हाला काहीच कळले नाही.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो मा. महापौर मॅडम आमचा सत्काराला विरोध नाही. परंतु ह्या ठिकाणी सत्कारमूर्ती आले तेव्हा आम्हाला वाटले कोण आले. आम्ही पक्षाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. परंतु आम्हाला कळवायला पाहिजे होते ही आमची सुचना आहे. मा. महापौर मॅडम आपण तज्ञ आहात. पण आपण आम्हाला सुचना द्यायला पाहिजे होती. सभा सिस्टमनी चालवा अशी माझी सुचना आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्हाला एक हे दिलेले आहे त्याच्यात असे लिहिले आहे की, मिरा भाईंदर महापौर खुर्चीला सासूरवास एम.बी.एम.सी. मेयर इन डॉट इन चेअर महापौर खुर्ची का अपमान मिरा भाईंदर में मेयर ने खुर्ची का अपमान केला अशा प्रकारचे वेगवेगळ्या पेपरमध्ये आलेले आहे. तुमच्या खुर्चीमध्ये आपण कोणाला तरी बसवलेले आहे. कृपया ह्याचा खुलासा करावा. कारण ही संविधानक खुर्ची आहे. अशा खुर्चीवर कोणाला तरी बसवून आपण त्या खुर्चीचा अपमान केलेला आहे. ह्या सभागृहाचा अपमान केलेला आहे. आपण कृपया दिलगीरी व्यक्त करावी.

**मा. महापौर :-**

तुम्ही बसा मी खुलासा करते. त्यावेळेस माझ्या सासूबाईला चक्कर आली. माझ्या बाजुला ते बसलेले होते एखाद्या वडिलांना असे सांगताना हसायला तुम्ही म्हणजे काय संस्कार आहे ते दाखवता.

**बर्नड डिमेलो :-**

मॅडम दुसऱ्या खुर्च्या होत्या.

**मा. महापौर :-**

तुम्ही फोटोत बघा. दुसऱ्या खुर्च्या नव्हत्या. माझ्या सासूबाई डॉ. वाडियांच्या ट्रीटमेन्ट खाली आहेत. त्यांची तब्येत बरी नाही. त्या पडत होत्या म्हणून बसवले. तरी मी खेद व्यक्त करते की असे काही घडले. मेहता साहेबांकडे काही तरी आहे तुमच्याकडून खुलासा घेऊ का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मान्य करतो चक्कर आली म्हणून खुर्ची दिली पाहिजे पण तुमच्या बाजूला पण खुर्च्या होत्या.

**मा. महापौर :-**

मी दिलगीरी व्यक्त केली आहे बसून जा. पुढचा विषय घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्हाला माफी मागीतलीच पाहिजे.

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तर तासाला सुरुवात होते. निलम हरिश्चंद्र ढवण ह्यांचा प्रश्न आहे. ११.३७ मिनिटे झालेली आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम ती संविधानक खुर्ची आहे आणि अशाप्रकारे होता कामा नये. मा. महापौरानी मोठ्या मनाने दिलगीरी व्यक्त केली आहे. मा. महापौर मॅडम आपण खरोखर खूप मोठ मन ठेवले आहे. मला आसिफ शेखला काही तरी दाखवायचे आहे. की त्यांची आई त्यावेळी ह्याच अशा संविधानिक खुर्चीवर बसल्या होत्या आणि माजी आमदार त्याच्या सोबत त्याच दालनात होते. त्यावेळी आम्ही हा विषय आणला असता तर आम्हालाही बरे वाटले असते की ही संविधानिक खुर्ची नाही का? आसिफ शेख साहेबांनी देखील मोठे मन धरुन दिलगीरी व्यक्त करावी.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर आमदाराचे आमच्यावर चांगलेच प्रेम दिसते. असे प्रेम दुसऱ्या ठिकाणी दाखवा म्हणजे सगळ्यांचे अच्छे दिन येतील. सगळ्या सदस्यांना पण अच्छे दिन येऊ द्या. सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता ह्यांनी आमच्या मातोश्रींचा फोटो, आमचे सन्मा. प्रथम आमदार गिल्बर्ट मेन्डोंसा आणि मी स्वतः असे छायाचित्र सभागृहात दाखवले आहे. मी संपूर्ण सभागृहाला सांगु इच्छितो जून २०११ रोजी जेव्हा विरोधी पक्ष नेता म्हणून आमचे सन्मा. प्रथम आमदार गिल्बर्ट मेन्डोंसा साहेब ह्यांनी जेव्हा माझी विरोधी पक्षनेता पदी निवड केली त्यावेळी पदभार ग्रहण करताना मी माझ्या बाजूला जी खुर्ची होती त्या खुर्चीवर आमच्या मातोश्री ह्यांना त्या ठिकाणी बसवले होते आणि माझ्या मातोश्रींना आम्ही सन्मान दिलेला आहे. प्रत्येकांनी आपआपल्या आईला सन्मान दिला पाहिजे. त्यामुळे मला वाटते काही गैर नाही. आणि दुसरी गोष्ट आपल्या भारतीय

संस्कृती प्रमाणे संपूर्ण विश्वामध्ये ह्या आईची सेवा करणे वडिलांची सेवा करणे हे प्रत्येक पुत्राच कर्तव्य असते आणि आईच्या पायाखाली जन्नत असते. मग आईला आपण खुर्चीवर बसवले तर त्यामध्ये कोणी काही गैर केले असे मला वाटत नाही.

**प्रशांत दळवी :-**

तुम्ही एकदम बरोबर बोलता.

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम, सभेला सुरुवात करा महत्वाचे विषय आहेत.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौरांनी आमच्या संस्कृतीचे अनुकरण केले आहे आणि प्रत्येकांनी आपल्या आई-वडिलांचा सन्मान केलाच पाहिजे. पण माझी खुर्ची होती ती विरोधी पक्षाची नव्हती शेजारची खुर्ची होती आणि ती शहराचे प्रथम नागरिक महापौरांची नव्हती हा त्यामध्ये फरक आहे. आपण हे समजून घ्या. महापौराची खूर्ची ही शहराच्या प्रथम नागरिकांची खूर्ची असते. शहराचा प्रथम नागरिक हा सर्वपरी असतो. त्याला मान सन्मान असतो. आणि त्या खूर्चीवर बसवण्यापेक्षा दुसऱ्या खुर्चीवर बसवले असते तर चांगले झाले असते. आम्ही आमच्या मातोश्रीना शेजारच्या खुर्चीवर बसवले ते त्या फोटोत दिसते त्याच्यात काही गैर केले असे वाटत नाही. आपण दिलगीरी व्यक्त केली हा चांगला संदेश लोकामध्ये गेला. सास भी कभी माँ थी वो क्यों भूल जाते है।

**अनिल भोसले :-**

आसिफजी वो पेशन्ट थी।

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य निलम ढवण ह्यांचा प्रश्न आहे.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब हा जो प्रश्नोत्तराचा तास अर्धा तास असतो तो कशाच्या आधारावर अधिनियमाच्या की प्रारुप उपविधीच्या मला तेवढ उत्तर पाहिजे.

**नगरसचिव :-**

प्रारुप उपविधी मध्येच असते.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे तुम्ही प्रारुप उपविधीला मानता अर्थ तोच झाला ना. मान्यता नसली तरी मान्य आहे. ह्याचा अर्थ महिला बालकल्याण समिती जेव्हा स्थापित झाली उपविधीमध्ये ९ ची संख्या असताना १५ चा ठराव झाला त्या संदर्भात आम्ही मा. आयुक्तांना नगरसचिवांना पत्रव्यवहार केले मुख्यमंत्र्यांना सुध्दा केलेले तेव्हा आम्ही तुम्हाला प्रश्न विचारले तेव्हा तुम्ही त्याचे उत्तर असे देता की ते प्रारुप आहे त्याची अजून मंजूरी झाली नाही. मग तुम्ही प्रश्नोत्तर अर्धा तास का चालवता? अधिनियमाप्रमाणे चालू द्या. सचिव साहेब त्याच्यावर निवेदन द्या.

**मा. महापौर :-**

तुम्ही बसा.

**प्रमोद सामंत :-**

मॅडम ९ चे १५ झाले.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

कोणत्या आधारावर झाले ते समजू द्या.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब थोडा तो लाज शरम करो. आपने उस समय के अंदर में क्या बोला था।

**नगरसचिव :-**

आपण लाज शरम असा शब्द का वापरता?

**भगवती शर्मा :-**

काय चूकीचे वापरले?

(सभागृहात गोंधळ)

**मदन सिंह :-**

मा. महापौर मॅडम, त्यांनी माफी मागावी. सन्मा. सदस्यांनी सचिवांचा अपमान केला आहे.

**मा. महापौर :-**

भगवती शर्मा साहेब बसून जा. भगवती शर्मा तुम्ही तुमचे शब्द मागे घ्या. तुम्ही लाज शरम नाही असे का सांगितले ते शब्द मागे घ्या.

**निलम ढवण :-**

ते शब्द मागे घेण्यात यावे. नाही तर दिलगीरी व्यक्त करावी.

**भगवती शर्मा :-**

मी काही चूकीचे बोललो नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब दरवेळी स्टेटमेंट बदलतात. ज्यावेळी आमची सत्ता होती तेव्हा स्टेटमेंट वेगळे होते. आता सत्ता बदलली स्टेटमेंट वेगळे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रश्नोत्तराचा तास चालू झाला असताना हा गोंधळ झाला आहे सर्वांना खाली बसवा.

**नरेंद्र मेहता :-**

अशा प्रकारे जे शब्द वापरले ते प्रोसिडींगमधून वगळण्यात यावे. सभागृहास विनंती राहील. शांततापूर्वक सभा कामकाज चालले पाहिजे. नक्की विरोधी पक्ष बरोबर न्याय होतील. ९ चे १५ कसे झाले ह्याच ह्यांना असे सांगायचे आहे का ज्यावेळी इकडे बसले त्यावेळी त्यांना कायदा माहित नव्हता असे त्यांना सांगायचे आहे का?

**प्रमोद सामंत :-**

कायदा माहित होता.

**नरेंद्र मेहता :-**

काँग्रेस पक्षाला आठवण करुन देतो स्वर्गीय प्रफुल्ल पाटील साहेबांनी ९ ची १५ ही समिती केली होती. उपविधी जे तयार आहेत प्रारुप असेल तरी त्याप्रकारे सभागृहाचे कामकाज चाललेले आहे. काही काम परंपरेप्रमाणे चालत असतात ह्याचा कायद्यात उल्लेख नसतो. आपल्याला ज्या-ज्या वेळी अशा अर्धा तास चर्चा किंवा अर्धा तास लक्षवेधी किंवा इतर जे प्रोसेडिंग प्रमाणे कामकाज चालते ते अनेक वर्षापासून चाललेले आहे. उपविधी त्यासाठीच तयार केलेली आहे. उपविधीप्रमाणे म्हटले तर कुठल्याही कायद्याचे पुस्तक वाचता येणार नाही. मुंबई प्रांतिक अधिनियम ते साईडला ठेवायला लागेल. कुठले ठराव करता येणार नाही. कोणते निर्णय करता येणार नाही.

**सुहास रकवी :-**

मॅडम ह्या विषयाचे उत्तर सचिव देतील.

**मा. महापौर :-**

ते त्याचे मत मांडतात. सचिव तुम्हाला उत्तर देणार. त्यांना मत मांडायचा अधिकार आहे की नाही बसून जा.

**नरेंद्र मेहता :-**

आजचे कामकाज ते नियमाप्रमाणे आहे आणि नियमाप्रमाणेच ह्यापुढे कामकाज चालवावे अशी आमची विनंती राहील. आजचे कामकाज विषय पटलावर आहे ते नियमाला धरुन आहे. आणि तरी सन्मा. सदस्यांना काही म्हणायचे असेल तर त्यांना वेगळे मार्ग आहेत हे नियम नाहीत आपल्याला विनंती राहील सभागृहाचा वेळ जातो. अनेक विषय आहेत कामाला सुरुवात करावी.

**जुबेर इनामदार :-**

मी अजिबात वेळ घेणार नाही.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, प्रश्नोत्तराला सुरुवात करा. तुम्ही बसा.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम जोपर्यंत स्पष्ट होत नाही की प्रश्नोत्तर तास किती तास चालते. उपविधीप्रमाणे चालवायचा असेल स्वर्गवासी प्रफुल्ल पाटील साहेबांच्या नावाचा उल्लेख केला जे एक ज्येष्ठ नेते होते. त्यांनी केलेला ठराव राज्यशासनानी विखंडीत केला होता. त्या महिला बालकल्याणचा २१ चा ठराव केला होता तो ठराव विखंडीत झाला होता. आम्हाला तेच म्हणायचे आहे तुम्हाला उपविधीप्रमाणे चालवायचे असेल तर उपविधीमध्ये जे नियम आहेत त्याचा काटेकोरपणे पालन करायला लागेल. महिला बालकल्याणमध्ये ९,१५,२०,२५,१०० असतील तेवढ्या महिला आल्याच पाहिजेत ह्या मताचा मी आहे. मात्र त्या उपविधीचा व्यवस्थित त्या नियमाप्रमाणे बदल करुन किंवा बदल करण्याची प्रोव्हिजन आपल्याला अधिनियमाने दिलेली आहे. अधिनियम नेहमी श्रेष्ठ असतो. नंतर हे उपविधी आहे. अधिनियमाच्या आधारावर आपण उपविधी तयार केलेले आहेत ह्याचा अर्थ सचिव महोदय तुमच्या पेक्षा चांगले उत्तर कोणी देऊ शकणार नाही. माझी तुम्हाला विनंती राहील देवाला नजरेसमोर ठेऊन हे उत्तर द्यायचे की ह्याच्यामध्ये खरे काय उपविधी की अधिनियम आणि मी जे काही तुम्हाला बोललो इथे महानगरपालिकेचा ग्रंथ आहे मी कुठे चूकत असेल तर सांगा. महिला बालकल्याणमध्ये जे काही बदल घडवायचे ते घडवा. ४५५ नुसार त्याच्यामध्ये हरकती सुचना मागवून जे काही बदल घडवायचे ते घडवू शकता. आज ह्या सभागृहात तुम्हाला लक्षवेधी मांडता येणार नाही कारण लक्षवेधी उपविधीचा भाग आहे अधिनियमाचा भाग नाही. म्हणून आम्ही बोलतो कुठेही नियमाचे उल्लंघन करु नका. संविधानिक प्रश्न काय मांडायचा हिसकावून घेऊ नका. नियमबाह्य कामकाज करु नका. आमची तुम्हाला विनंती आहे सचिव साहेब कोणत्या आधारावर चालेल.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खुलासा करा.

**जुबेर इनामदार :-**

कामकाज उपविधीप्रमाणे चालवता की अधिनियमाप्रमाणे चालवता ते आम्हाला सांगा.

**मा. महापौर :-**

नियमाप्रमाणे कामकाज चालू आहे तुम्ही बसा.

**सुहास रकवी :-**

मॅडम, बसून कसे चालेल त्यांनी विचारलेल्या प्रश्नाची उत्तर द्या.

(सभागृहात गोंधळ)

**प्रमोद सामंत :-**

सभेचे कामकाज उपविधीप्रमाणे चालणार आहे की अधिनियमाप्रमाणे चालणार आहे. ह्यापुढे आम्ही तसे फॉलो करु कधी आपण उपविधीप्रमाणे चालतो कधी अधिनियमाप्रमाणे चालतो.

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो अधिनियमाला आधारीत उपविधी तयार केलेले असतात. उपविधीत काही तरतूद आहे त्या उपविधीच्या तरतूदीप्रमाणे उदा. महापौरच्या निवडणूका महापौरानी घ्यायच्या असतात. तो जो बदल झाला नाही. तरी देखील आपण अधिनियमाच्या तरतूदीनुसार शासनाच्या आदेशानुसार पिठासीन अधिकारी बोलवून त्याच्याकडून मा. महापौराच्या निवडणूका पार पाडू अशा स्थायी आणि प्रभाग समिती निवडणूका उपविधीत तरतूद असून देखील त्याच्या व्यतिरिक्त दुसऱ्या तरतुदीने आपण करतो. अधिनियमात बदल केला तर अधिनियमात बदल घेऊन आपण तसे करु शकतो. अधिनियमात बदल केला त्याप्रमाणे निवडणूका पार पाडल्या तशी तरतूद उपविधीत नाही. अधिनियमात तरतूद नसेल तर उपविधीची तरतूद त्यामुळे हे करतो अधिनियमाला धरुन कामकाज चालू केलेले आहे. ते कामकाज बरोबर आहे.

**जुबेर इनामदार :-**

उपविधीत कोणताही बदल घडवायचा असेल अंर्तमूख करायचा असेल .................

**मा. उपमहापौर :-**

प्रश्नोत्तराचा तास सुरु करा.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम ह्या गोंधळात काय सुरु करणार.

**मा. महापौर :-**

सगळ्यांनी बसून घ्या. सचिवांनी उत्तर दिले.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही बसून जा.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम आजचा माझा फेरीवाल्या संदर्भात विषय आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अखत्यारित ह्या फेरिवाल्या संदर्भात फेरीवाला झोन आणि ना फेरीवाला झोन असे दोन झोन कार्यरत आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब तुम्हाला जुबेर साहेबांनी विचारले तर तुम्ही सांगा. जे त्यांनी विचारले ते सांगा.

**मा. महापौर :-**

सचिवांनी आपला खुलासा दिलेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिवांनीच खुलासा केला पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

त्यावेळी सचिवांनी चूक केली होती सचिवांनी उत्तर दिले पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

ढवण मॅडम तुमची वेळ संपेल तुम्ही चालू करा.

**भगवती शर्मा :-**

आमच्यावर त्यांनी अन्याय केला आहे म्हणून आम्ही सविचांना विचारतो.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, ह्या ठिकाणी सन्मा. सदस्य जुबेर इनामदारनी जो विषय उपस्थित केला होता. सन्मा. सचिव महोदय खुलासा करतात त्या खुलासाची आम्ही सहमत नाही. सभागृहाचे कामकाज

अधिनियमाप्रमाणे चालले पाहिजे. अधिनियम हे उपविधीच्या अनुसरुन असले पाहिजेत. म्हणजे एकमेकांना पूरक असले पाहिजेत. त्याविरुध्द काम ह्या ठिकाणी सुरु आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख तुम्ही बसून घ्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सचिव ह्या पदासाठी लायक नाहीत असा आमचा आरोप आहे. प्रशासनाचे आयुक्त, आयुक्ताना माहित आहे की प्रशासनाचे जे सचिव आहेत ते सचिव त्या पदाला लायक नाहीत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सगळ्यांनी बसून घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये अनेक वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आहे. प्रथम महापौर मायरा मेन्डोंसा त्यानंतर निर्मला सावळेजी, त्यानंतर तुलसीदास म्हात्रेजी, कॅटलीन परेरा ह्यांच्यावर माझा ठाम विश्वास आहे. त्यांनी जे काम चालवले ते नियमाला धरुन चालवले.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहात कोणाची लायकी काढणे बरोबर नाही. लायकी काढताना त्यांनी विचार करायला पाहिजे एवढे वर्षी सचिव तेच होते तेव्हा ते लायक होते का?

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

मी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करते त्यांनी बसून घ्यावे. सभेचे कामकाज चालू होऊ दे. तुम्हाला सभाशास्त्राचा नियम माहित आहे का तुम्ही बसून घ्या. आपल्याला सभेच्या कामकाजात इंटरेस्ट नसेल यू कॅन गो आऊट.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

सचिवांना जाऊ द्या, सचिवांचा पदभार काढून घ्या. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब आपणास विनंती आहे की सचिव कीती सक्षम आहेत आपल्याला माहित आहे. आपण तातडीने आजच्या आजच सचिवांना कार्यमुक्त करावे.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, जोपर्यंत सचिव साहेब ह्या सभागृहात असतील सभेचे कामकाज चालू देणार नाही.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६९, दि.१५/११/२०१४, दि. २५/११/२०१४ (दि. १५/११/२०१४ रोजीची तहकूब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रश्नोत्तराचा जो विषय होता तो पूढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा.

**मा. महापौर :-**

तुमचा विषय पूढच्या वेळी घेणार.

**रोहिदास पाटील :-**

दि.१५/११/२०१४, दि. २५/११/२०१४ (दि. १५/११/२०१४ रोजीची तहकूब सभा) रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ६९ :-**

दि.१५/११/२०१४, दि. २५/११/२०१४ (दि. १५/११/२०१४ रोजीची तहकूब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ७० :-**

दि.१५/११/२०१४, दि. २५/११/२०१४ (दि. १५/११/२०१४ रोजीची तहकूब सभा) रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७०, मिरा भाईंदर महानगरपालिकेवर ५ व्या नामनिर्देशित पालिका सदस्याची नेमणूक करणेबाबत.

**मा. महापौर :-**

स्विकृत सदस्य श्री. हेमंत म्हात्रे ह्यांना बोलावून त्यांचा सत्कार करावा.

**नगरसचिव :-**

श्री. हेमंत म्हात्रे ह्यांचा मा. महापौर सत्कार करत आहेत. त्यांनी सभागृहात यायचे आहे.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य श्री. हेमंत म्हात्रे ह्यांनी डायसवर यायचे आहे. मा. महापौर सत्कार करत आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नवनिर्वाचित हेमंत म्हात्रे ह्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे आम्ही अभिनंदन करतो.

**जुबेर इनामदार :-**

नवनिर्वाचित हेमंत म्हात्रे ह्यांचे आमच्या पक्षातर्फे अभिनंदन करत आहे.

**प्रकरण क्र. ७० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेवर ५ व्या नामनिर्देशित पालिका सदस्याची नेमणूक करणेबाबत.

**ठराव क्र. ७१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेवर ५ व्या नामनिर्देशित पालिका सदस्य पदी श्री. हेमंत सदानंद म्हात्रे यांची नेमणूक करण्यात येत आहे.

**सही/-**
**महापौर तथा पिठासीन अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७१, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील इमारतींना वापर परवाना देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेकरीता मंजूरी मिळणेबाबत.

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम परवानगी घेऊन बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये काही इमारतीत वापर सुरु असून वापर परवाना घेण्यात आलेला नाही. याबाबतची सर्वसाधारणपणे कारणे खालीलप्रमाणे दिसून येतात.

१) परवानगीमधील अटींची पुर्तता न झाल्यामुळे
२) वास्तुविशारद व विकासक ह्यामध्ये झालेल्या वादामुळे
३) विकासकाने इमारतीचे बांधकाम विहीत वेळेत पूर्ण न केल्यामुळे सदनिका खरेदीदारांनी परस्पर घेतलेल्या ताब्यामुळे
४) इमारतीमध्ये काही भागात मंजूरी व्यतिरिक्त झालेल्या बांधकामामुळे

सद्यस्थितीत वापर परवाना अदा करणेची कार्यवाही महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ६(७)(८) मधील तरतूदीनुसार खालीलप्रमाणे केली जाते.

वास्तुविशारद वापर परवाना मिळण्यासाठी अर्ज सादर करतात. अर्जासोबत बांधकाम परवानगीप्रमाणे काम पुर्ण झाल्याबाबत व संरचनात्मकदृष्ट्या बांधकाम सक्षम असल्याबाबत मान्यता प्राप्त संरचना अभियंता यांचे प्रमाणपत्र (Structural Stability Certificate) सादर करतात. परवानगीमधील अटीशर्तीची पूर्तता झाल्यावर विना वापरपरवाना वापर सुरु असल्यास रु.२००/- प्रती चौ.मी. प्रमाणे दंड वसूल करुन वापर परवाना देण्याबाबत धोरण आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत ब-याच जुन्या इमारती अश्या आहेत कि, वापर सुरु असून वापर परवाना घेतलेला नाही अथवा वापर परवाना दिलेला नाही, अश्या इमारतीं वापर परवाना देणेबाबत खालीलप्रमाणे विशेष मोहिम लागु करता येईल.

**<u>विशेष मोहिमेतील अटी व शर्ती खालीलप्रमाणे.</u>**

१) फक्त बांधकाम परवानगी घेतलेल्या व मंजूर नकाशा नुसार बांधकाम करण्यात आलेल्या इमारतींना सदर विशेष मोहित लागू होईल.
२) बांधकाम परवानगी वेळी अस्तित्वात असलेल्या तत्कालीन नियमानुसार अग्निशमन व्यवस्थेबाबत नाहरकत दाखला आवश्यक राहिल.

३) अर्जदार यांनी विहित नमुन्यातील अर्जासोबत नोंदणीकृत संरचना अभियंता यांचे स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.
४) अर्जदार गृहनिर्माण संस्थेची नोंदणी पाच वर्षापूर्वी झालेली नसावी.
५) गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत असल्यास भोगवटा इमारत पाच वर्षापूर्वीची असल्याचे पुरावे सादर करावे. म्हणजेच पाच वर्षापेक्षा कमी कालावधी करीता वापर असलेल्या व गृहनिर्माण संस्था नोंदणी नसलेल्या इमारतींना विशेष मोहिम लागु होणार नाही.
६) सदर विशेष माहिमेनुसार दंडनिय शुल्क रु. २००/- प्रति चौ.मी. आकारण्यात येईल.
७) सदर विशेष मोहिम एक वर्षासाठी म्हणजेच दि. ०१/०४/२०१५ ते दि. ३१/०३/२०१६ या कालावधीसाठी लागू राहिल.

उपरोक्त विशेष मोहिम पाच वर्षापूर्वीच्या गृहनिर्माण संस्था / भोगवटादार यांचे मर्यादित असून विकासकास सदर विशेष मोहिम लागू होणार नाही. विकासकांमार्फत प्राप्त होणाऱ्या भोगवटा दाखला प्रस्तावात यापूर्वी घेण्यात येणारे विना वापर परवाना दंडनिय शुल्कात वाढ करुन ते यापुढे रु. ४००/- प्रति चौ.मी. आकारण्यात यावे.

वरील अटीसह विशेष मोहिम लागू करण्यास व सदर विशेष मोहिमेत प्राप्त होणारे अर्ज मा. आयुक्त यांच्या स्तरावर निकाली काढणेस ही मा. महासभा मंजूरी देत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त खुलासा देतात सर्वांनी जागेवर बसून घ्या. ठराव सर्वानुमते मंजूर.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महासभा दि. २३/०३/२०१५ मी अभिनंदन ठराव वाचत आहे. मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात धोकादायक व जुन्या बांधकाम केलेल्या इमारती ३ ते ४ एफ.एस.आय. वापरुन बांधकाम केलेले आहे. ह्या संदर्भात धोकादायक इमारतींना नविन वाढीव एफ.एस.आय. मिळवण्यासाठी महानगरपालिकेने आघाडी सरकारकडे मंजूरीसाठी सन २०१० साली पाठवले होते. मा. आमदार प्रताप सरनाईक व मा. आमदार नरेंद्र मेहता ह्यांनी अधिवेशनामध्ये लक्षवेधी उपस्थित करुन ह्या लक्षवेधीद्वारे जुन्या इमारतीचा विकास करताना अडीज एफ.एस.आय. बांधकाम मंजूर केलेले आहे. मा. आमदार प्रताप सरनाईक व मा. आमदार नरेंद्र मेहता ह्यांनी ह्या लक्षवेधीच्या अनुषंगाने सद्यस्थितीतील अडीज एफ.एस.आय. वाढीव १ एफ.एस.आय. क्षेत्र मंजूर करण्यात यावे अशी मागणी केली. ह्या लक्षवेधीतील विषयाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री साहेबांनी ह्या प्रश्नाबाबत सभागृहामध्ये आश्वासन दिले की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सदरच्या विषयाबाबत दि. ३१/०३/२०१५ पर्यंत समितीचा निर्णय अपेक्षित असून माहे एप्रिल २०१५ पर्यंत ह्या प्रश्नाबाबत मा. आमदार प्रताप सरनाईक व मा. आमदार नरेंद्र मेहता ह्यांनी लक्षवेधीद्वारे शहरातील नागरीकांच्या जिवनाशी निगडीत असलेल्या जिव्हाळाच्या व महत्वाच्या प्रश्नाला न्याय दिलेला आहे. तसेच युती सरकारने दि. ०१/०८/२०१५ पासून एल.बी.टी. रद्द करण्याचा विषय घेतलेला आहे. दोन्ही समस्यांचे निराकारण केल्याने हे सभागृह मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडवणीस ह्यांचे आभार व्यक्त करुन मा. आमदार प्रताप सरनाईक व मा. आमदार नरेंद्र मेहता ह्यांचे अभिनंदन करीत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

**अनिल भोसले :-**

माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरात होणारा पाणीपुरवठा अत्यंत अपुरा होता ह्या संदर्भात आघाडी सरकारने वारंवार मोठी वाढीव योजना मंजूर केली होती. युती सरकारने व स्थानिक आमदार नरेंद्र मेहता, आमदार प्रताप सरनाईक व महापौर गिता भरत जैन ह्यांनी ह्या पाणी समस्येवर योग्य पाठपुरावा करुन रु. २७९.७२ कोटी पाणी पुरवठा पाणी योजना युती शासनाकडून मंजूर करुन घेतली. सदर योजनेकरीता राज्य सरकारने ७० टक्के निधी अनुदान मिळणारे ही योजना कार्यरत झाल्यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील शहरातील पाणी टंचाई दूर होण्यास मदत होणार आहे. आमदार नरेंद्र मेहता, आमदार प्रताप सरनाईक व महापौर गिता भरत जैन ह्याच्या अथक प्रयत्नातुन सदर योजना मंजूर झालेली आहे. ह्या त्यांच्या अथक प्रयत्नांबद्दल युती सरकार व मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडवणीस, आमदार नरेंद्र मेहता, आमदार प्रताप सरनाईक व महापौर गिता भरत जैन ह्यांचे हे सभागृह अभिनंदन करीत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी नवी मुंबई महानगरपालिका डोळ्यासमोर ठेऊन फक्त नवि मुंबई महानगरपालिकेच्या गावठणासाठी चार एफ.एस.आय दिला आणि २० हजार घरे नियमीत केली संपूर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये नवी मुंबई साठीच हा निर्णय जाहिर केला त्याच्यानंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने बूधवारी आंदोलन केले त्याची माहिती सर्व पत्रकारांना पालिका प्रशासनाला मुख्यमंत्र्यांना दिली त्याच्यानंतर

शहराचे आमदार नरेंद्र मेहता आणि प्रताप सरनाईक ह्यांनी लक्षवेधी टाकली त्यानंतर मुख्यमंत्र्यांना जाग आली त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी मिरा भाईंदर आणि पूर्ण ठाणे जिल्ह्याच्या प्रश्नाचे निराकारण करण्याची घोषणा केली म्हणून राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी आणि कॉंग्रेस पार्टीचे माजी आमदार गिल्बर्ट मेन्डोंसा, माजी खासदार संजीवजी नाईक, माजी आमदार मुझफ्फर हुसेन ह्या सगळ्यांचे मी अभिनंदन करतो.

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हा जो प्रश्न होता. २०१० पासून आघाडी सरकारकडे प्रलंबीत होता. आणि त्या सरकारला वारंवार विनंती करुन त्या ठिकाणी बिल्डींग कोसळून लोक मयत झाली तर त्याच्यावर आघाडी सरकारने निर्णय घेतला नाही. सन्मा. सदस्यांना माहित नसेल ही लक्षवेधी अधिवेशन चालू व्हायच्या १५ दिवस अगोदर द्यायला लागते. सरनाईक साहेब आणि आम्ही सगळ्यांनी मेहनत घेतली होती. विरोधी पक्षनेता जी भुमिका घेतली त्यांनी जे आंदोलन केले त्याचे मी मनापासून आभार व्यक्त करतो. आपण नक्कीच काळजी करु नका आपले ज्या-ज्या वेळेला आंदोलन होतील आम्ही तुमच्या सगळ्या मागण्या पूर्ण करु. आमच्या सरकारमध्ये तेवढी क्षमता आहे. सरकारमध्ये तेवढी ताकद आहे. आता आघाडीची सरकार नाही ही युतीची सरकार आहे निर्णय घेणारी सरकार आहे. लोकांना वेठीस धरणार नाही. आंदोलन कोणी केले ह्याला महत्व नाही. लोकांना न्याय मिळाला पाहिजे. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसनी हा निर्णय घेतलेला आहे. एवढेच नाही त्यांनी महाराष्ट्रातून एल.बी.टी. काढण्याचा निर्णय घेतला एक ऑगस्टपासून एल.बी.टी. सुध्दा ते काढतात हा निर्णय घेतला पाण्याच्या योजनेला पाणीच दिले नाही तर २०० कोटी सुध्दा दिले आपण ठराव केला मा. महापौर मॅडम दोन दिवसामध्ये बैठक लावून २०० कोटी रुपये दिले. ह्या सरकारने मिरा भाईंदरला गंभीरतेने घेतले आहे. कारण हा १५ वर्षांचा बॅकलॉग आघाडी सरकारने जे केले नाही यूती सरकार ते सगळे बॅकलॉग भरतील असे अनेक सभेमध्ये दररोज अभिनंदन ठराव येणार आहेत असे मी सभागृहाला निवेदन करतो.

**सुहास रकवी :-**

आपल्या आमदारांनी चांगले काम केले आहे. कॉंग्रेस पक्षातर्फे अभिनंदन करतो. आणखी एक प्रश्न ज्वलंत आहे. जून्या ज्या बिल्डींग आहेत त्या इस्टेट इन्वेस्टमेंट कंपनी आम्ही हा अभिनंदनाचा ठराव लगेच मांडू. ८ दिवसात तो प्रश्न मांडा इस्टेट इन्वेस्टमेन्ट कंपनीमुळे आपल्याकडे रि-डेव्हलपमेंटची प्रक्रिया थांबलेली आहे. आपल्याला तो अनुभव असेलच तो प्रश्न देखील तुम्ही लवकरात लवकर सोडवा.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. रकवीजीना माहिती देण्यासाठी मा. आयुक्त त्या वेळी उपस्थित होते आम्ही हा विषय मांडलेला की रि-डेव्हलपमेंट ह्यासाठी होत नाही इस्टेट इन्वेस्टमेंट आहे. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात मा. आयुक्त त्याला व्हिटनेस आहेत. सभागृहात हा निर्णय घेतला की इस्टेट इन्वेस्टमेंटवर लगेच निर्णय घेऊ आणि त्यांनी भाषणात सांगितले की ह्याच्यावर काहीतरी ठाम काढू या. मागच्या सरकारने इस्टेट इन्वेस्टमेंट आणले कसे? आता आम्हाला तेच बघायचे आहे. मागच्या सरकारने जे-जे केले आहे त्या लोकांना न्याय देण्यासाठी टाईम घालवले तर नक्की आम्ही घालवणार.

**जुबेर इनामदार :-**

आमदार साहेबांचे निवेदन झाल्यावर मी थांबू शकलो नाही म्हणून मनापासून बोलू इच्छितो रेटून खोट बोलायचे असेल तर भाजपा कडून शिकायचे केंद्रामध्ये काळा धन येणार होता ६ महिन्यात आणतो १०० दिवसात आणतो. १५ हजार माझ्या बँकेत येणार होते ते अजून आले नाही.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर मॅडम हे सभागृहाचे टाईमपास चालले आहे.

**जुबेर इनामदार :-**

बोलण्यामध्ये आणि करण्यामध्ये बरच अंतर आहे. येणाऱ्या दिवसामध्ये आपल्या समोर येईलच की, तुम्ही किती योजना पूर्ण करता एल.बी.टी. खरोबर ह्या राज्यातून जाईल का? हे पाण्याच्या योजनेचे पैसे येतील का? क्लस्ट डेव्हलपमेंट होईल का?

(सभागृहात गोंधळ)

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर मॅडम, कॉंग्रेस और राष्ट्रवादी सत्ता से विपक्ष में चली गई है। उनकी भावना समझ में आती है लेकिन इसका मतलब यह नही की शहर के विकास को रोको। उनकी भावना को मान सकते है।

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, इनकी भावना ऐसी है की जो इन्होंने किया वो भी बी.जे.पी करेगी ऐसा है।

(सभागृहात गोंधळ)

**मदन उदितनारायण सिंह :-**

फक्त बॅनर लावायचे काम केले आहे.

**जुबेर इनामदार :-**

बॅनर लगाने का काम शहर में किसका है सभी जानते है।

**निलम ढवण :-**

एक विषय निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, आता जो ईस्ट इंडियन कंपनी आणि ह्याचा विषय निघाला. वर्षभरापूर्वी जिल्हा नियोजनच्या बैठकीत देखील मी स्वतः ईस्ट इंडियन कंपनी कुढून आली आणि अचानक ७/१२ वर स्टॅम्प कसे मारले जातात त्या संदर्भात सन्मा. पालकमंत्री नाईक साहेब ह्यांच्या समोर हा विषय मी मांडला होता. एक वर्षापूर्वी मांडला तरी अद्यापी काही झाले नव्हते त्यामुळे सन्मा. सदस्यांनी एवढी घाई करु नये. आत त्याचे निराकरण नक्की होणार आहे. ईस्ट इंडिया कंपनी उडवा कारण गोरगरिब जनतेचे पैसे फूकट जातात. अननेसेसरी भरले जातात त्यामुळे ह्याची चौकशी हवी अशी देखील मागणी मी जिल्हा नियोजन समितीमध्ये केली होती. त्यामुळे हा विषय आता न येता वर्षभरापूर्वीच आम्ही ह्या विषयाची मागणी केली आहे. हे मी निदर्शनास आणून देऊ इच्छिते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रशासनाने गोषवारा मा. महासभेच्या अजेंड्याबरोबर दिला नसल्याने सदस्यांना या विषयाची काहीही माहिती नाही व तो गोषवारा प्रशासनाने महासभेच्या वेळी दिला. अनधिकृत इमारतींना संरक्षण देण्याचा प्रशासन व काही अधिका-यांचा हेतु दिसून येत असल्याने सदरचा विषय रद्द करुन प्रशासनाने रितसर गोषवारा देऊन पुढील महासभेत विषय आणावा असा मी ठराव मांडत आहे.

**रोहिदास पाटील :-**

ठराव मंजूर झाला.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर झाला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही आम्हाला संधी दिली नाही.

**प्रकरण क्र. ७१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील इमारतींना वापर परवाना देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेकरीता मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ७२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम परवानगी घेऊन बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये काही इमारतीत वापर सुरु असून वापर परवाना घेण्यात आलेला नाही. याबाबतची सर्वसाधारणपणे कारणे खालीलप्रमाणे दिसून येतात.

१) परवानगीमधील अटींची पुर्तता न झाल्यामुळे

२) वास्तुविशारद व विकासक ह्यामध्ये झालेल्या वादामुळे

३) विकासकाने इमारतीचे बांधकाम विहीत वेळेत पूर्ण न केल्यामुळे सदनिका खरेदीदारांनी परस्पर घेतलेल्या ताब्यामुळे

४) इमारतीमध्ये काही भागात मंजूरी व्यतिरिक्त झालेल्या बांधकामामुळे

सद्यस्थितीत वापर परवाना अदा करणेची कार्यवाही महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ६(७)(८) मधील तरतूदीनुसार खालीलप्रमाणे केली जाते.

वास्तुविशारद वापर परवाना मिळण्यासाठी अर्ज सादर करतात. अर्जासोबत बांधकाम परवानगीप्रमाणे काम पुर्ण झाल्याबाबत व संरचनात्मकदृष्ट्या बांधकाम सक्षम असल्याबाबत मान्यता प्राप्त संरचना अभियंता यांचे प्रमाणपत्र (Structural Stability Certificate) सादर करतात. परवानगीमधील अटीशर्तीची पूर्तता झाल्यावर विना वापरपरवाना वापर सुरु असल्यास रु.२००/- प्रती चौ.मी. प्रमाणे दंड वसूल करुन वापर परवाना देण्याबाबत धोरण आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत ब-याच जुन्या इमारती अश्या आहेत कि, वापर सुरु असून वापर परवाना घेतलेला नाही अथवा वापर परवाना दिलेला नाही, अश्या इमारतीं वापर परवाना देणेबाबत खालीलप्रमाणे विशेष मोहिम लागु करता येईल.

**<u>विशेष मोहिमेतील अटी व शर्ती खालीलप्रमाणे.</u>**

१) फक्त बांधकाम परवानगी घेतलेल्या व मंजूर नकाशा नुसार बांधकाम करण्यात आलेल्या इमारतींना सदर विशेष मोहित लागू होईल.

२) बांधकाम परवानगी वेळी अस्तित्वात असलेल्या तत्कालीन नियमानुसार अग्निशमन व्यवस्थेबाबत नाहरकत दाखला आवश्यक राहिल.

३) अर्जदार यांनी विहित नमुन्यातील अर्जासोबत नोंदणीकृत संरचना अभियंता यांचे स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

४) अर्जदार गृहनिर्माण संस्थेची नोंदणी पाच वर्षापूर्वी झालेली नसावी.

५) गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत असल्यास भोगवटा इमारत पाच वर्षापूर्वीची असल्याचे पुरावे सादर करावे. म्हणजेच पाच वर्षापेक्षा कमी कालावधी करीता वापर असलेल्या व गृहनिर्माण संस्था नोंदणी नसलेल्या इमारतींना विशेष मोहिम लागु होणार नाही.

६) सदर विशेष माहिमेनुसार दंडनिय शुल्क रु. २००/- प्रति चौ.मी. आकारण्यात येईल.

७) सदर विशेष मोहिम एक वर्षासाठी म्हणजेच दि. ०१/०४/२०१५ ते दि. ३१/०३/२०१६ या कालावधीसाठी लागू राहिल.

उपरोक्त विशेष मोहिम पाच वर्षापूर्वीच्या गृहनिर्माण संस्था / भोगवटादार यांचे मर्यादित असून विकासकास सदर विशेष मोहिम लागू होणार नाही. विकासकांमार्फत प्राप्त होणाऱ्या भोगवटा दाखला प्रस्तावात यापूर्वी घेण्यात येणारे विना वापर परवाना दंडनिय शुल्कात वाढ करुन ते यापुढे रु. ४००/- प्रति चौ.मी. आकारण्यात यावे.

वरील अटीसह विशेष मोहिम लागू करण्यास व सदर विशेष मोहिमेत प्राप्त होणारे अर्ज मा. आयुक्त यांच्या स्तरावर निकाली काढणेस ही मा. महासभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण ७२, अपंग व्यक्तींना स्वयं रोजगारासाठी बँकेमार्फत आर्थिक मदत देणेबाबत.

**मा. महापौर :-**

तो ठराव मंजूर झाला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

आमचा ठराव घ्या.

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अपंग कल्याण योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत प्रदान करणे यासाठी लेखाशिर्षकामध्ये दरवर्षी तरतुद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन निर्णयानुसार अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल उपलब्ध करुन देणे या योजने अंतर्गत जे अपंग लाभार्थी छोटया उदयोजकातील स्वयंरोजगार करण्यासाठी मान्यता प्राप्त बँकेकडुन प्रकल्प खर्चाची मर्यादा रु.१,५०,०००/- पर्यंत कर्ज पुरवठा घेतल्यास कर्जाच्या २०% रक्कम हि अनुदान म्हणुन देण्यात यावी असा प्रस्ताव आहे. त्यासाठी लागणाऱ्या अटीशर्ती खालीलप्रमाणे.

१) कुंटूबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार, ठाणे यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
२) मान्यता प्राप्त बँकेकडुन कर्ज मंजुर केलेले पत्र.
३) ४० % अपंग असल्याचा ठाणे सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला.
४) रहिवासी दाखला (किमान सात वर्ष)

तरी अपंग कल्याण योजने अंतर्गत अपंग व्यक्तींनी रु.१,५०,०००/- लाखापर्यंत बँकेकडुन जर कर्ज मंजुर करुन घेतले तर त्यानां मंजुर कर्जाच्या २०% रक्कम अनुदान प्रदान करण्यास सदरची योजना यापुढे राबविण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस हि सभा मंजुरी देत आहे. या योजनेची मुदत दोन वर्षाकरीता म्हणजेच दि. १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१७ पर्यंत राहील. या योजनेतील लाभ घेणाऱ्या लाभार्थींकरीता ठेवणाऱ्या अटी व शर्थींचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आपणास विनंती राहील मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ओ.सी. चा विषय होता ठराव मंजूर झाला असेल तरी आपल्याला विनंती राहील की सभागृहाला ओ.सी. च्या विषयावर चर्चा करण्यासाठी वेळ द्या आणि हा ओ.सी. चा विषय आणला खरोखर आम्ही आपले आणि प्रशासनाचे अभिनंदन करु की अनेक वर्षापासून बरेचसे विकासक ह्या शहरात इमारत बांधतात काही कारणामुळे ओ.सी. घेत नाही आणि नंतर सामान्य नागरिकाला हे भोगावे लागते. कितीतरी अशा इमारती आहेत ज्यांचे काही देण नाही घेण नाही. बिल्डींग ॲजपर प्लान आहे, नकाशाप्रमाणे आहे तरीपण त्याला तीनपट शास्ती लावली जाते. काही अशा इमारती आहेत ज्यांना बँकेतून लोन मिळत नाही. काही अशा फॅमीली आहेत ज्यांना बँकेत अनेक चक्कर मारायला लागतात. कारण ओ.सी. नसल्याने लोन उपलब्ध होत नाही. ओ.सी. चे खूप महत्व आहे, पण एखादी सोसायटी रजिस्ट्रेशन झाल्यानंतर बिल्डर हात वर करतो आणि कोणत्याही कागदपत्राची पूर्तता करत नाही. आर्किटेक्ट अर्ज करत नाही, बिल्डर अर्ज करत नाही. सगळे लोक लाखो रुपये फिज मागतात आणि महानगरपालिकेमध्ये एखादा अर्ज केलाच तर तो विकासकानी करायला पाहिजे ह्या धरतीवर तो अर्ज फेटाळून लावतो आम्ही जो ठराव केला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ज्या इमारती ॲजपर प्लान आहेत

नकाशाप्रमाणे बांधकाम केले आहे आणि स्ट्रक्चर सर्टिफिकेट आहे म्हणजे जी बिल्डींग बांधली आहे ती स्टेबल आहे आणि स्ट्रक्चर सर्टिफिकेट आहे अशा लोकांना ओ.सी. देण्यासाठी हा विषय आणला आहे. ह्याचा फायदा हा बिल्डरसाठी आणलेला नाही. म्हणून कमीत कमी तीन वर्ष सोसायटी जूनी असावी. सोसायटी रजिस्ट्रेशन झालेले असेल त्यांना हे लागू होईल तसेच एखादी सोसायटी फॉर्मेशन झालेले नाही आणि इमारतीमध्ये लोक राहतात आणि पाच वर्ष अशी इमारत असेल त्याला ह्या ओ.सी. खाली अर्ज करता येईल. बिल्डरची आवश्यकता नाही त्याला फक्त दोन गोष्टीची पूर्तता करायची आहे. आर्किटेक्ट कडून दाखला ती बिल्डींग ॲजपर प्लान बांधलेली आहे. आणि बिल्डींग स्टेबल आहे कोणताही दंड न आकारता जे आपले नॉमिनल चार्जेस आहेत २० एम.एल. फूटचे ते सवलती दरावर निर्णय घेतलेले आहेत आणि माझी सभागृहाला विनंती आहे की राष्ट्रवादी कॉंग्रेस किंवा भाजप सगळ्यांचा मतदार संघात हाच प्रॉब्लेम आहे की लोकांना ओ.सी. मिळत नाही आणि खूप मोठा प्रॉब्लेम त्यांना फेस करायला लागतो.

**सुहास रकवी :-**

आमदार साहेब तुमचे म्हणणे बरोबर आहे पण ह्याचा गोषवारा आम्हाला दिला असता तर आमच्याही काही सुचना होत्या ना. गोषवारा आता मिळालेला आहे तर आम्ही अभ्यास कधी करायचा. ह्याच्यामध्ये काही सुचना मांडायच्या असतील आमच्या परिसरामध्ये लोकांच्या काय हरकती असतील त्यांना कोणत्या पध्दतीने ओ.सी. हवी असेल तर आम्हाला गोषवारा मिळाला तर आम्ही नागरिकांना कळवू ना. तुम्ही आता विषय आणला आता गोषवारा देता विषय मंजूर करता तर हा विषय पूढच्या सभेस घ्या.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम हा चांगला विषय तुमच्या माध्यमातून आला. लोकांना ओ.सी. ची गरज आहे बरीच लोक ओ.सी साठी दारोदार फिरतात. आर्किटेक्ट लोक त्यांना लूटतात. प्रशासनाकडून नीट उत्तर दिले जात नाही. असे असताना हा विषय तुम्ही आणला लोकांना अवधी मिळाला पाहिजे पाणी मिळाले पाहिजे. बऱ्याच वर्षापासून लोक इथे राहतात त्यांना आपण पाणी देऊ शकत नाही. तुम्ही विषय दिला पण प्रशासनाने ह्याबद्दल थोडीशी माहिति आम्हाला दिली पाहिजे होती. आम्ही पण त्याचा अभ्यास केला असता बऱ्याच समस्या आहेत. आमदार साहेबांचा कन्स्ट्रक्शनचा बिझनेस आहे त्यांना सगळ्या गोष्टी पटकन समजतात त्यांना असलेली माहिती सभागृहातील ९३ सदस्यांना मिळावी असे प्रशासनाला वाटत नाही का?

**मा. महापौर :-**

आपण बसा मा. आयुक्त खुलासा करतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझी तुम्हाला विनंती आहे मा. आयुक्तांना तुम्ही नंतर खुलासा करायला सांगा. सर्व सदस्यांचे ऐकून घ्या. मा. महापौर मॅडम, हा विषय खूप चांगला आहे. हा विषय आणल्याबद्दल तुमचे अभिनंदन. परंतु हा विषय प्रशासनानी आणलेला नाही हा तुम्ही आणलेला आहे. महासभेचा नियम कसा आहे प्रत्येक विभाग, विषय आपल्या सचिवांकडे येतो आणि सचिव तुमच्या मान्यतेने हा महासभेत ठेवतो. परंतु हा विषय प्रशासनाने आणलेला नाही हा विषय आपण आणलेला आहे. त्यामुळे आम्ही तुम्हाला विनंती करतो की ह्या विषयाची आम्हाला प्रशासनाकडून माहिती पाहिजे. आणि शेवटी आम्ही ह्याचा अभ्यास करुन पूढच्या महासभेमध्ये रितसर हा विषय पास करु या. हा विषय पास केल्यानंतर शहरातील हजारो नागरिकांचे भले होईल. ओ.सी. साठी सोसायटीवाले अप्लाय करतात तेव्हा साहेब २०-२५ लाख रुपये डिमांड करतात हा आमचा आरोप आहे आणि हे जर केले तर सोसायटीच्या लोकांना विदाऊट पैसे ओसी मिळेल. ही चांगली आणि अभिनंदनीय बाब आहे. परंतु हा विषय आपल्याकडून आला पाहिजे. हा आपल्याकडून आलेला नाही. हा काही ठराविक लोकांनी आणलेला आहे. म्हणून आमची तुम्हाला विनंती आहे. रितसर प्रशासनाने हा गोषवारा आणावा. कारण ह्याच्यावर लिहीले आहे ७ महापौर १५ म्हणजे हे महापौर दालनमध्ये टाईप झाले आहे. हे टाऊन प्लानिंग डिपार्टमेंटमध्ये टाईप झालेले नाही. प्रत्येक अजेंड्याचा गोषवारा त्या डिपार्टमेंटमध्ये टाईप झालेला आहे. परंतु हा गोषवारा महापौर दालनमध्ये टाईप झालेला आहे. आम्हाला महापौर दालनमधला नको टाऊन प्लानिंग डिपार्टमेंट ओ.सी. देते त्या डिपार्टमेंटकडून आले पाहिजे. आज आपण ठराव करु जसा मदन साहेबांन "ज" चा प्रस्ताव टाकलेला आहे. आम्ही ठराव करतो तेव्हा "ज" खाली प्रस्ताव आणतो त्याची अंमलबजावणी होत नाही आणि आपण जर ठराव केला आणि त्याची अंमलबजावणी होणार नसेल तर मतलब काय? म्हणून सगळ्या सदस्यांकडून माझी तुम्हाला विनंती आहे की हा विषय व्यवस्थित रितसर प्रशासनाकडून येऊ द्या. आम्ही तुम्हाला १०० टक्के सहयोग करणार. आमदार साहेब महापौर त्या आहेत पण सभा तुम्ही चालवता. म्हणून आमची तुम्हाला विनंती आहे की तुम्ही मॅडमना सांगा हा विषय पुढच्या मिटींगला रितसर आणू या. आम्ही पण आमच्या सुचना देऊ ते पण देतील मग आपण पास करु या.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सभागृह ह्या ठिकाणी मी नमूद करु इच्छितो की गोषवारा हा सभेच्या कामकाजाचे जे प्रोसिडींग आहे त्याच्याबरोबर देतो परंतु गेल्या आठवड्यामध्ये आपल्या महानगरपालिकेचे विधान सभेमध्ये लक्षवेधी आणि तारांकित प्रश्न झाले होते त्यामुळे संबंधित अधिकारी ह्या ठिकाणी उपलब्ध नव्हते. मी स्वतः सुध्दा नव्हतो. त्याच्यामुळे आम्हाला हे लपवून ठेवायचे असते किंवा आमच्या मनामध्ये काय पाप असत तर हा गोषवारा आपल्याला दिलाच नसता. आम्ही सांगितले असते महापौर मॅडम तुम्ही गपचूप ठराव घेऊन टाका. हा सकाळी सही करुन दिलेला आहे. बाकी सगळे प्रस्ताव ११ तारखेला दिलेले आहेत. हा

गोषवारा आजच्या तारखेला सुधारीत मला त्या दिवशी वेळ भेटला नाही मी मुंबईला असल्यामुळे त्यानंतर २-३ दिवस सुट्टी आली. म्हणून मी आज सकाळी सुधारणा करुन दिलेला आहे. ह्याच्यामध्ये आमचा हा उद्देश नाही की ह्याला चोरुन ठेवणार किंवा लपवून ठेवणार ह्याच्यामध्ये आम्हाला जे वाटते ते दिलेले आहे. सभागृहाचा तो अधिकार आहे की मंजूर करायचा नामंजूर करायचा आपण करु शकता.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय ह्या सभागृहाच्या इतिहासामध्ये असे बऱ्याच वेळेला झालेले आहे की काही गोषवारे वेळेवर पोहोचले नाहीत तर प्रशासनाने ते विषय परत घेतले रितसर गोषवारे पुढच्या सभेमध्ये देऊ. ह्या विषयामध्ये देखील तशा भुमिका तुम्हाला घेता आली असती. कारण हा विषय एकदम स्पष्ट आहे. आम्हाला त्या विषयाबद्दल अभ्यास करावा लागेल. सर्वमताने ह्या ठरावाला मंजूरी देऊ. विषय पुढच्या सभेमध्ये घेऊ.

**लियाकत शेख :-**

मा. महापौर मॅडम, हा खरोखरच चांगला विषय आहे. शहराचा ज्वलंत असा विषय आहे. हा लोकांच्या हितासाठी आहे. परंतु एवढी घाई करणे गोषवारा आताच मिळाला सुचना मांडण्यासाठी ३-४ दिवसांचा अवधी आम्हाला मिळायला पाहिजे. त्याच्यावर रितसर अभ्यास करुन व्यवस्थितरित्या सुचना, व्यथा मांडली असती. सभागृहाला विनंती आहे पुढच्या मिटींगला व्यवस्थित अभ्यास करु.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य सुहास रकवी ह्यांनी जी सुचना मांडलेली आहे की हा जो विषय आणलेला आहे तो चांगला आणलेला आहे आणि शहराच्या हितासाठी विषय आहे. आणि शहराच्या हिताच्या ज्या-ज्या गोष्टी होतील त्याला आमच्या पक्षाचे समर्थन राहील. सगळ्यांचे वैयक्तिक पण समर्थन राहील. परंतु अभ्यास करण्यासाठी सर्व सदस्यांना वेळ पाहिजे आमच्या इथे जे नागरिक जुन्या इमारतींमध्ये राहतात त्यांना अजून ओ.सी. मिळाली नाही. त्याचेही मत आम्हाला घ्यायचे आहे. सन्मा. सुहास रकवीनी जी सुचना मांडली आहे त्याला माझे अनुमोदन आहे. आपण कृपया आमची सुचना स्विकारुन पुढच्या महासभेत विषय घ्यावा. अशी आम्ही आपणास विनंती करतो.

**मा. महापौर :-**

ठराव झालेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, ठराव झालेला आहे. आपल्याला बॅकफूट जाता येणार नाही. सन्मा. सदस्यांनी जे निवेदन केलेले आहे ह्या संदर्भात सभागृहाच्या सदस्यांना विनंती राहील की ह्या शहरातले नागरिक खूप मोठ्या अपेक्षेने आपल्याकडे बघत आहेत की आम्हाला लवकरच ओसी होणार आहे. आता बजेटची मिटींग आहे म्हणजे एक दीड महिना अजून जाणार आहे. ह्यांच्या ज्या काही सुचना असतील त्या घ्या आणि पूढच्या मिटींगमध्ये सुचनांचा विचार करुन करता येईल. परत तो ठराव घेता येणार नाही. म्हणून पूढच्या विषयाला सुरुवात करा.

**आसिफ शेख :-**

आमदार साहेब आपण सभागृहात चूकीची माहिती देता. नियम खोडून काढला का? विषय विषयपत्रिकेवर आहे. ठराव झालेला आहे आम्ही दुसरा ठराव देतो आहे.

**मा. महापौर :-**

मी त्या अगोदर ठराव मंजूर केलेला होता. सगळ्यांनी बसा. सचिव साहेब पूढचा विषय घ्या.

**आसिफ शेख :-**

मॅडम, आम्ही दोन ठराव दिलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब तुम्ही चूकीचे कामकाज करता. आम्ही तुम्हाला ठराव दिलेला आहे.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांनी पहिलाच ठराव घोषित केलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर काही घोषित करणार तुम्ही ऐकणार का?

**नगरसचिव :-**

त्याच्यानंतर दुसरा विषय वाचन झाला.

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७३, मिरा भाईंदर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करणेसाठी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्हाला अपंगाच्या विषयावर बोलायचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सभागृह सदस्यांना ही विनंती राहील शांततेने आपण सगळ्या विषयावर बोला. आपल्याला बोलायला संधी दिली जाईल. अपंगाच्या विषयावर ते नाही बोलणार तर कोण बोलणार? त्यांना तर नक्कीच अपंगाच्या विषयावर बोलायला लागेल त्यांनी ती भुमिका मांडावी.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, ह्या शहराचे आमदार मेहता साहेब ह्यांनी म्हटले हे सभागृह मा. महापौर चालवतात की ते चालवतात तेच मला समजत नाही.

**मा. महापौर :-**

त्यांनी आपले मत मांडले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

अपंग कल्याण योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत प्रदान करणेसाठी जे अपंग लाभार्थी छोट्या उदयोजकातील स्वयंरोजगारसाठी मान्यता प्राप्त बँकेकडुन प्रकल्प खर्चाची मर्यादा रु.१,५०,०००/- पर्यंत कर्ज पुरवठा घेतल्यास कर्जाच्या ३०% रक्कम हि अनुदान म्हणुन देण्यात यावी व सदरची योजना यापुढे राबविण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरीस शिफारस आहे असा मी ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

ठराव झाला. पूढचा विषय पण वाचून झाला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही २० टक्के दिले आम्ही ३० टक्के दिले.

**मा. उपमहापौर :-**

विषय चालू असतो तेव्हा तुमचा गोंधळ असतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही चांगले काम करतो. तुम्ही २० टक्के दिले आम्ही ३० टक्के दिले. तुम्ही त्याला विरोध करा.

**मा. उपमहापौर :-**

ठराव सर्वानुमते झाला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही मा. महापौराच्या परवानगीने ठराव मांडला आहे. सचिव साहेब ठराव घ्यायला लागेल.

**मा. महापौर :-**

तुम्ही मला सांगितले नाही की ठराव मांडायचा आहे.

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला सुचना करायची असेल तर करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ही महासभा आहे सांगायची गरज नाही. ठराव मांडायचा अधिकार आहे आम्ही ठराव मांडलेला आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मांडायचा अधिकार ठराव मंजूर व्हायच्या आधी असतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम तुम्ही गडबडीत बोललात ते आम्ही ऐकले नाही.

**मा. महापौर :-**

गडबड तुम्ही करता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही ऐकले नाही तुम्ही पुन्हा रेकॉर्ड वाजवा.

**भगवती शर्मा :-**

आम्ही ठराव केलेला आहे.

**आसिफ शेख :-**

दोन ठराव आलेले आहेत विषय संपलेला आहे.

**प्रकरण क्र. ७२ :-**

अपंग व्यक्तींना स्वयं रोजगारासाठी बँकेमार्फत आर्थिक मदत देणेबाबत.

**ठराव क्र. ७३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अपंग कल्याण योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत प्रदान करणे यासाठी लेखाशिर्षकामध्ये दरवर्षी तरतुद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन निर्णयानुसार अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल उपलब्ध करुन देणे या योजने अंतर्गत जे अपंग लाभार्थी छोटया उदयोजकातील स्वयंरोजगार करण्यासाठी मान्यता प्राप्त बँकेकडुन प्रकल्प खर्चाची मर्यादा रु.१,५०,०००/- पर्यंत कर्ज पुरवठा घेतल्यास कर्जाच्या २०% रक्कम हि अनुदान म्हणुन देण्यात यावी असा प्रस्ताव आहे. त्यासाठी लागणाऱ्या अटीशर्ती खालीलप्रमाणे.

१) कुंटूबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार, ठाणे यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
२) मान्यता प्राप्त बँकेकडुन कर्ज मंजुर केलेले पत्र.
३) ४० % अपंग असल्याचा ठाणे सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला.
४) रहिवासी दाखला (किमान सात वर्ष)

तरी अपंग कल्याण योजने अंतर्गत अपंग व्यक्तींनी रु.१,५०,०००/- लाखापर्यंत बँकेकडुन जर कर्ज मंजुर करुन घेतले तर त्यानां मंजुर कर्जाच्या २०% रक्कम अनुदान प्रदान करण्यास सदरची योजना यापुढे राबविण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस हि सभा मंजुरी देत आहे. या योजनेची मुदत दोन वर्षाकरीता म्हणजेच दि. १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१७ पर्यंत राहील. या योजनेतील लाभ घेणाऱ्या लाभार्थींकरीता ठेवणाऱ्या अटी व शर्थींचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७३, मिरा भाईंदर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करणेसाठी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३५ शाळा असुन दि.३० सप्टेंबर २०१४ च्या पटसंख्येनुसार इ. १ली ते इ.८वी पर्यत एकुण ९२६२ विद्यार्थी-विदयार्थीनी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात १०% संभाव्य वाढ लक्षात घेवून एकुण अंदाजे १०,१८८ पर्यंत पटसंख्या अपेक्षित आहे. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये विदयार्थी-विदयार्थीनींना शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश-टाय सह (प्रत्येकी-२), बुट-मोजे, वह्या, बॅग, पाण्याच्या बाटल्या इत्यादी पुरवठा करण्याबाबत महानगरपालिकेचे धोरण आहे. शिक्षण विभागानी साहित्य पुरवठा कामी असलेल्या सर्व प्रशासकीय मान्यता दि. २० एप्रिल २०१५ पूर्वी घ्याव्यात व तद्नंतर सदरचा विषय मान्यतेसाठी मा. स्थायी समिती पुढे ठेवावा. ठेकेदाराने विहित मुदतीत शैक्षणिक साहित्य पुरवठा केला नाही तर ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. तसेच शैक्षणिक साहित्य शाळा सुरू झाल्यानंतर १५ दिवसांत वितरित करण्यात यावे. असे न केल्यास दोषी अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कार्यवाही करावी.

मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना सदर धोरणानुसार सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक तरतुद सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली आहे. सबब साहित्य खरेदी करण्याकरिता ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला अपंगांच्या विषयावर बोलायचे आहे. मागच्या वेळी "ज" अन्वये आमदार साहेब तेव्हा विरोधी पक्षनेता होते. त्यांनी तो प्रस्ताव नामंजूर केला परंतु मला हे सांगायचे आहे की मी "ज" अन्वये प्रस्ताव आणला होता. अपंगांच्या आरोग्य वैद्यकिय सेवेमध्ये त्यांचे जर मोठे ऑपरेशन असेल तर त्याच्यामध्ये २० टक्के इतकी रक्कम त्यांना मदत करण्याचा ठराव होता. आज तुम्ही वेगळा विषय आणला आहे. परंतु तोसुध्दा अपंगांसाठी खूप उपयुक्त आहे. मला एवढेच म्हणायचे आहे तुम्ही त्यांना स्वयं रोजगारासाठी अर्थसाहाय्य मंजूर केले त्यामध्ये हाही विषय मर्ज करावा. त्यांना जर वैद्यकिय उपचारासाठी काही अमाऊंट डॉक्टरांनी सजेस्ट केली असेल तर त्याच्या २० टक्के रक्कम इतकी महानगरपालिकेनी अपंगांना आर्थिक साहाय्य म्हणून मंजूर करावी अशी त्याच्यामध्ये माझी एक सुचना आहे ती त्याच्यामध्ये इन्क्लूड केली तर दोन्ही गोष्टीचे समायोजन होऊन दोन्ही गोष्टी त्याच्यामध्ये होऊ शकते. तेव्हा ह्या सुचनेचा विचार व्हावा.

**मुन्ना सिंग :-**

पिछले टाईम स्कुल में ताट दिया गया था लेकिन अभी तक ताट दिया गया नही। वह अभी तक स्कुल में पडा है। ८-९ बार कम्पलेंट किया उसके बारे में जानकारी नहीं दिया गया। उसमें अधिकारी लोग ने ध्यान देना चाहिए। साहब खुलासा करेंगे तो अच्छा है।

**प्रभात पाटील :-**

सुचना लिहून देते.

**मा. महापौर :-**

प्रभात ताई आता ठराव मंजूर झाला आहे.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यात सुचना इन्क्लुड करायची आहे.

**मा. महापौर :-**

त्या नंतरचाही विषय झाला.

**प्रभात पाटील :-**

मी तुमच्याकडे परवानगी मागितली होती. काकानी मध्येच विषय वाचायला घेतला.

**नरेंद्र मेहता :-**

ताई तुम्ही परवानगी मागितली तोपर्यंत सचिवांना तिसरा विषय वाचला त्यानंतर मागितली होती नक्कीच आपण पूढच्या वेळी विषय घेऊ.

**प्रभात पाटील :-**

विषय तोच आहे पुन्हा तो विषय तुम्ही आणणार नाहीत. मागच्या वेळी "ज" चा प्रस्ताव दिला होता तुम्ही कॅन्सल केला.

**मा. महापौर :-**

प्रभात ताई तुमची भावना चांगली आहे. आपण विचार करु.

**प्रभात पाटील :-**

पुढच्या वेळी मी "ज" अन्वये प्रस्ताव देईन तो तुम्ही पटलावर घ्यायचा आहे.

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**अशरफ शेख :-**

मला मा. आयुक्तांना विचारायचे आहे. पूर्वी आपण अपंगांना स्टॉल द्यायचे ते आता आपण बंद केलेले आहे का? की स्टॉल चालू ठेवलेला आहे.

**मा. महापौर :-**

बंद आहेत.

**अशरफ शेख :-**

मग ह्या लोकांना स्टॉल द्यायचे सुरु करावे अशी माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

आपला विषय वेगळा आहे. स्टॉल द्यायचा विषय त्याच्यात नाही आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्याचे म्हणणे ऐकून घ्या.

**मा. उपमहापौर :-**

हो ऐकल. विषय क्र. ७३ ठराव द्या.

**वर्षा भानुशाली :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलते, ह्याच्यामध्ये माझी सुचना आहे की मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत गणवेश व शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना वाटप करते वेळी संबंधीत प्रभागातील नगरसेवकांना स्थानिक नगरसेवक व नगरसेविकाना ह्याबाबत कळवून त्याच्यासमोर सदर गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात यावे.

**कल्पना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**प्रमोद सामंत :-**

त्यांची सुचना घेतली आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही बसा. अजून काही सुचना असेल तर मी जवाब देते.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, आपण म्हणता सुचना द्या.

**मा. महापौर :-**

मी सुचना घेते ना.

**आसिफ शेख :-**

काय आहे ते कळते पण वळत नाही हे लफड आहे इकडे आता आमचे ज्येष्ठ सदस्य प्रभात ताई पाटील ह्यांनी चांगली सुचना केली आहे त्यामध्ये तुम्ही म्हणता ठराव झाला. पहिला ठराव आला ठराव झाला.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मी तुम्हाला विनंती करते जे विषय झाले त्याच्यावर बोलू नये. आताच्या विषयावर बोलायचे असेल तर सांगा.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम, ह्याच्यानंतर तुमच्या केबीनमध्ये सगळे ठराव मांडून मंजूर करुन नंतर इथे या.

**मा. महापौर :-**

तुम्ही असे बोलू शकत नाही. ठराव मंजूर महासभेतच होणार. तुम्ही कसे सांगू शकता केबीनमध्ये होणार बसून घ्या.

**बर्नड डिमेलो :-**

दुसरा ठराव झाला तोपर्यंत कोणाला कल्पना नाही. गोंधळामध्ये सर्व ठराव मंजूर केले आहेत. जर करायचे आहे तर ह्याच्यावर आमचा ठराव घ्या. त्याच्यावर मतदान करा. जून्यावर मतदान करा.

**मा. महापौर :-**

आताच्या विषयावर तुमच्या काही सुचना आहेत का?

**आसिफ शेख :-**

आता म्हणता ठराव झालेला आहे. सुचना येणार कधी आणि त्या ॲड करणार की नाही करणार? तुम्ही इथे येताना ठरवून आले आहेत असे आम्ही म्हणतो तुम्ही तुमच्या ऑफिसमध्ये, केबीनमध्ये, ॲन्टी चेम्बरमध्ये काय करता त्याबद्दल बोलत नाही आम्ही एवढेच बोलतो तुम्ही येताना सगळ्या गोष्टी ठरवून आलेले आहेत.

**मा. उपमहापौर :-**

आसिफजी विषयावर बोला.

**आसिफ शेख :-**

आम्ही विषयावरच बोलतो. आमदार डबल टिबल रोलमध्ये आहेत. सचिवचे काम पण तेच करतात. पिठासीन अधिकारी पण तेच निर्देश देतात आपण वरती बसले आहेत. त्यांना वरती बसवले तर बरे होईल. आम्ही ह्या ठिकाणी चांगल्या सुचना देतो. तुम्ही सुचनांचे पालनच करत नाही ना.

**मा. महापौर :-**

तुम्ही परत तेच सांगता त्यांना बसवायचे ते तुम्ही मला सुचना करता.

**आसिफ शेख :-**

आम्ही सुचना करत नाही. आम्ही सभागृहाच्या निर्देशनास आणतो. हा सभागृहाचा अपमान आहे. जे निर्देश होतात ते खालून होतात. निर्देश वरुन व्हायला पाहिजे. हा कोणता नवा नियम काढला.

**मा. महापौर :-**

मी कोणताही नवा नियम काढला नाही आपण बसून घ्या. आपल्याला विषयावर बोलायचे असेल तर बोला नाहीतर बसून घ्या.

**आसिफ शेख :-**

तुम्ही प्रत्येक वेळी असेच घेणार असाल, ठराव झाला आता काही बोलू नका तर मॅडम चालणार नाही. आम्ही सभा चालू देणार नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही शांत बसून ठराव ऐकून घ्या. जोपर्यंत मी मंजूर करत नाही तोपर्यंत तुम्हाला सुचना द्यायचा अधिकार आहे. ह्या विषयासंबंधी काही सुचना असेल तर द्या.

**बर्नड डिमेलो :-**

सभेला बोलावता कशाला.

**मा. महापौर :-**

तुम्हाला इकडे यायचे की नाही तो निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे मला नाही. मला सभाशास्त्र तुम्ही शिकवायचे नाही.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

दोन ठराव आले तरी ठरावावर मतदान घेत नाही.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला माहित आहे की आम्ही तुमचे ठराव घेतलेले आहेत. बहुमत इथे होते तेव्हा पण पास केले आहेत.

**आसिफ शेख :-**

मतदान घ्या.

**बर्नड डिमेलो :-**

आम्ही तुमच्या विरोधामध्ये असताना मंजूर केले आहेत.

**भगवती शर्मा :-**

दोन ठरावावर मतदान घ्या.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे निवारण करण्यात यावे.

**मुन्ना सिंग :-**

मैने ८ बार कम्पलेंट किया उसका कोई खुलासा नहीं किया।

**शिक्षण अधिकारी :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब ह्यांच्या परवानगीने बोलतो. शालेय पोषण आहार शासनामार्फत चाललेले असते. १०० टक्के अनुदान शासनाचे असते. आणि त्याबाबत शासनाकडून आपल्या विद्यार्थ्यांना सर्व शाळामध्ये, गरिब विद्यार्थ्यांसाठी ताट आली होती. ती ताट संबंधीत विद्यार्थ्यांनी खाल्यानंतर शाळेतच ठेवायचे असा आदेश होता. त्या पध्दतीने केले आहे. आणि सी.आर.सी. ला कळवले आहे. १६ नंबरच्या शाळेच्या वरती ते मी सांगितलेले आहे.

**मुन्ना सिंग :-**

उसका खुलासा मैं करता हूँ। आप ऐसा कैसा जवाब दे रहे हो उस टाईम बोले में जाके इन्क्वायरी करता हूँ। ८ टाईम यह जवाब दिया है।

**शिक्षण अधिकारी :-**

सर मैं खूद गया था, मैंने इन्क्वायरी भी किया।

**मुन्ना सिंग :-**

आपने इन्क्वायरी करके आपने अपने दिल में रखे है। उसका खुलासा देना चाहिए।

**शिक्षण अधिकारी :-**

मैंने स्टँडिंग में बोला था।

**मुन्ना सिंग :-**

हमको आपने जवाब नहीं दिया। स्टँडिंग में बोला मेरे को पागल कुत्ते ने काटा है। मैं इधर बडबड कर रहा हूँ। मा. महापौर मॅडम झूठा झूठा जवाब दे रहा है। गूमराह कर रहे है। यह इनका जवाब नहीं है।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, पागल कुत्ते मुन्ना सिंगना विनंती राहील अशा प्रकारचा शब्दप्रयोग करु नये.

(सभागृहात गोंधळ)

**मुन्ना सिंग :-**

स्टँडिंग में जवाब मिलता तो मैं हाऊस में नहीं बोलता।

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, सगळ्यांना वन टू वन बोलायला द्या. विरोधी पक्षनेताची एवढी केवीलवाणी परिस्थिती झाली आहे ना. वन टू वन बोलले ना तर सभागृहात प्रेक्षक गृहात प्रेक्षक बसले आहेत गोंधळामूळे कोण काय बोलते ते ऐकायला जात नाही. कोणी किती ठराव मांडले हे ही त्यांना कळत नाही. दोन ठराव वाचून झाल्यावर ते सुचना मांडतात.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठराव पास करायची हिंमत नाही म्हणून गोंधळामध्ये ठराव पास करतात. २०१४-१५ मैं ९२०२ बच्चे है।

**शिक्षण अधिकारी :-**

मा. महापौर, मा. आयुक्त ह्यांच्या परवानगीने बोलतो मागच्या वर्षी २०१२-१३ ला ८,८०० विद्यार्थी होते. २०१३-१४ ला ९,२०० झाले. म्हणजे ५०० विद्यार्थी वाढले. कॅलक्युलेशन आहे तर १० टक्के ह्या पध्दतीने दिलेले, पण आपण जेव्हा ऑर्डर देऊ आणि आदेश दिल्यानंतर आपण कार्यादेशामध्ये कमी जास्त विद्यार्थी जे टेंडर आहे. तसे आपले क्लॉज पण असतात. जेवढे लाभार्थी आहेत तेवढ्या विद्यार्थ्यांनाच साहित्य देण्यात येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नी असे म्हणत नाही की साहित्यामध्ये काय कमी जास्त करता. आमचे एवढेच म्हणो आहे जी गळती होते ती गळती तुम्ही थांबवा. तुम्ही इथे सांगता ५०० विद्यार्थी आले आणि १० टक्के म्हणजे १००० विद्यार्थी वाढणार. गळती थांबवा हा आमचा तुम्हाला सल्ला आहे.

**प्रमोद सामंत :-**

शाळेमध्ये गणवेश पडून राहतात. आपण ते मुलांपर्यंत पोहोचवत नाही. ह्याचे कारण एक असू शकतो. त्याची संख्या कमी होते आणि आपण ॲक्सेस गणवेश मागवतो. ते प्रशासनाने बघून घ्यावे की पैसे शासनाकडून आले तरी आपलाच पैसा आहे. तो आपण सांभाळून वापरला पाहिजे. तर त्यांना योग्य ते निर्देश द्यावे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, इतने साल से महासभा में हूँ और मैंने वातावरण देखा है। आज का वातावरण देखा जो सकारात्मक भुमिका होनी चाहिए। मैं सबसे अनुरोध करुगा की मिरा भाईंदर जनता के विकास के मुद्दे पे सकारात्मक चर्चा करे और शांती से चर्चा करे।

**प्रमोद सामंत :-**

मॅडम हमारी सकारात्मक भुमिका है। हमने विरोध किधर किया है। सीने मे दफन सारे दर्द उभर आए है। क्यों तुम देर से इतना खडे हो हम बहुत दूर निकल आए।

**प्रभात पाटील :-**

ठरावामध्ये एक सुचना त्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे की गणवेश पडून असतात माझ्या मते मा. उपमहापौर त्यांनाही ती गोष्ट माहित असेल की शाळेतून गणवेश विकले जातात. हे कोणाच्या ताब्यात आहे ते मी सांगायला नको जर ही गोष्ट खरी असेल तर ते गणवेश विकले जाणार नाहीत. मघाशी इथे कोणीतरी सुचना मांडली नगरसेवक घेऊन त्या-त्या वॉर्डाचे गणवेश डिस्ट्रीब्यूट करा. ही सुचना एकदम रास्त आहे. त्यामुळे योग्य त्या मुलाकडे गणवेश जातील. उर्वरित सगळे गणवेश जमा करावेत. त्याच्यामध्ये आणखी एक सुचना अशी आहे की ह्याच्यामध्ये सगळ्या गोष्टी आपण मुलांना देतो. परंतु ५ वी ते ७ वी आपले शिक्षण ७ वी पर्यंत आहे. त्यासाठी कम्पॉस बॉक्स ही गोष्ट खूप अनिवार्य आहे माझी सुचना आहे की त्याचा त्याच्यामध्ये समावेश केला जावा. कारण पट्टीची खूप आवश्यकता असते. ती सुचना त्याच्यामध्ये घेतली जावी ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना कम्पॉस बॉक्सची तरतूद करण्यात यावी.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलते. डॉ. राजेंद्र जैन साहेबांनी सांगितले आम्हाला माहित आहे लोकशाही आहे आम्ही हुकुमशाही करु देणार नाही. डॉ. जैन साहेब आपण काय केलत आपण तेच केल. आपण बोलता गोंधळ अजून गोंधळ काहीच झाला नाही. ह्याच्यापूढे भरपूर गोंधळ होणार आहे. सत्ताधारी पक्षवाले तुम्ही सुध्दा सावधानमध्ये रहा. सावधान म्हणजे काय महासभेत कामकाज सत्य असेल तरच आम्ही करुन देणार असत्य चालू देणार नाही. सभागृहाने ह्याची नोंद घ्यावी.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त महोदय आपल्याला सपोट करतो. गणेश देशमुख सर उपस्थित आहेत. एक विषय चांगला ह्याची आपल्याला मंजूर द्यायची. चांगले शिक्षण असावे. त्याची आपल्याला काळजी घ्यायला पाहिजे. सर्वात मोठा विषय शिक्षक उपस्थित नसतात. सकाळी हजेरी लावतात आणि गायब होतात. त्याच्यावर आपले कोणतेच नियंत्रण नाही. शाळेमध्ये लागणा-या वस्तू शिक्षकांना बसायला खुर्च्या नाहीत, टेबल नाही. विद्यार्थ्यांना बसायला बाक कमी पडतात शौचालयाचा बंदोबस्त नाही. मिरारोडला ३४ नंबरची शाळा आहे. प्रभाग कार्यालयामध्ये शाळा चालवतो तिथे ब-याच अडचणी आहेत तिथे आम्हाला वर्ग कमी पडतात. एका वर्गात ३ री, ४ थी, ५ वी चे विद्यार्थी शिकतात. ह्याच्यावर गांभिर्याने लक्ष केंद्रित करा. ह्याच्यात सुधारणा करणे अतिशय गरजेचे आहे. आपल्या शाळा चांगल्या असल्या तर विद्यार्थी वाढतील कमी होणार नाही. त्यांना सुविधा पुरवायला लागतील. गोरगरिब मूल आपल्याकडे येतात त्यांना चांगल्या सुविधा दिल्यातर ते येणारच. आम्ही मिरारोडच्या अभ्यासिकासाठी खूर्चीची टेबलची सातत्याने मागणी करतो. त्याचा काय इश्यू आहे. ठेकेदार देत नाही त्याची चौकशी करावी.

**संदिप पाटील :-**

मा. महापौर मॅडम, शिक्षण विभागाबद्दल एक खेदाची बातमी आहे. शिक्षण समितीमध्ये संगणक विभागाला ४-५ महिने झाले लोकांचे पगार दिले नाहीत. ४-५ महिने पगार दिले नाहीत तर ती लोक करणार काय? १-२ महिने माणूस लेट होईल. ह्याचा मा. आयुक्तांनी खुलासा करावा. त्या लोकांचा जीवनमरणाचा प्रश्न आहे. त्या लोकांनी करायचे काय.

**शिक्षण अधिकारी :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, आपले ३५ शाळांमध्ये माणसी टेक्नोलॉजीमार्फत संगणकाचे शिक्षण दिले जाते त्यापैकी ६ महिन्यापासून संगणकाची संख्या आहे ती बंद होती. त्याची नस्ती प्राप्त झाल्यानंतर संगणकाची संख्या आणि चालू संख्या ह्याच्याबाबत त्यांना वेतन देण्याची कारवाई सुरु आहे.

**संदिप पाटील :-**

६ महिने झाले कारवाई सुरु आहे. त्या लोकांचे व्हायचे काय? संगणक बंद आहेत तर त्याचे प्रशासनाने सुधारणा करायला पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

संगणक बंद आहेत तर त्यांना कामावर रुजू का केले त्यांना सांगायचे घरी बसा.

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम, गेल्या एक वर्षापासून सर्व शाळांची मी स्वतः व्हिजीट केली होती. त्यामध्ये संगणक, साफसफाई ह्या अनेक विषयामध्ये आपण लक्ष घातले.

**संदिप पाटील :-**

मा. आयुक्त साहेब ज्या कुणाचा ठेका असेल तर तो पूरवठा करत नसेल तर त्याला ब्लॅकलिस्ट मध्ये टाका. त्यांचा ठेका रद्द करा.

**अनिल भोसले :-**

संगणक हा विषय गंभीर आहे. एक वर्षापासून संगणक बंद आहेत. त्यासाठी माझी मा. आयुक्तांना विनंती आहे.

**संदिप पाटील :-**

मा. आयुक्त ह्याचा खुलासा करा.

**शिक्षण अधिकारी :-**

संबंधीत कंपनीकडून अहवाल आल्यानंतर तात्काळ वेतन अदा करण्यात येईल.

**संदिप पाटील :-**

थातूरमातूर उत्तर देऊ नका. त्याच्यावर प्रशासनाने ताबडतोब कारवाई करायला पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रत्येक शाळेतील संगणकचालकानी अहवाल दिलेला आहे की, शाळेतले संगणक बंद आहेत साहेब आपण त्याच्यावर काय कारवाई केली.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे. कॉम्प्युटर विभागामध्ये काही लोकांचे वेतन ४-५ महिन्यांपासून थकित आहे. सदर प्रकरण एक वर्षापासून प्रलंबित आहे. येत्या १५ दिवसामध्ये मी ह्याच्यात स्वतः लक्ष घालून अंतिम निर्णय घेऊन त्याचा पगार ताबडतोब रिलीज करण्याची कारवाई करण्यात येईल.

**निलम ढवण :-**

मा. आयुक्त साहेब संगणक चालक त्या शाळेतील कामकाज व्यवस्थित आणि लवकरात लवकर होण्यासाठी म्हणून बसवले जातात आणि तेच संगणक बंद असतील तर संगणक चालकाचा दोष नाही आणि एक वर्षापासून संगणक बंद राहीले तर त्या शाळेचा विकास किती लवकर होतो ते देखील स्पष्ट होत आहे. संगणक त्या कामासाठीच बसवले आहेत की काय हा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे संगणक देखील त्वरीत चालू करावे आणि त्यावर काम करतात त्यांना त्वरीत पगार देण्यात यावा अशी मी सुचना करत आहे.

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलते माझे असे मत आहे की आपल्या काही शाळेत पिऊन्सची व्यवस्था नाही तिकडे जी मूल शिकायला येतात त्यांना खाली चहा आणायला पाठवतात. आपल्याकडून ती व्यवस्था केली जाईल अशी अपेक्षा ठेवते.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम, हा संगणक ट्रेनिंग द्यायला जो ठेका दिला आहे त्याचा हा विषय आहे. ज्या संगणक ठेकेदाराला हे कॉन्ट्रॅक्ट दिले आहे किती संगणक चालू आहे. ते आपल्या मुलांना कोणते शिक्षण देतात. त्याची तपासणी करा. आपण प्रत्येक मुलामागे ३५ रुपये खर्च करतो आणि आपण पूर्ण खर्च करतो ठेकेदाराला बिल पण देतो ठेकेदार त्याला पगार देत नाही ते कर्मचारी आपल्या मुलांना शिक्षण देत नाही. खर्च कशाला करायचे त्याचे काही रिपोर्टींग झाले आहे का? ह्याचे कधी ऑडिट केले का? ऑडिट म्हणजे पाहणी केली आहे का? शिक्षण बरोबर देतात का? मा. आयुक्त साहेब हा विषय समोर आला असेल पण बरीच वर्ष हा प्रकार चालला आहे. त्या कर्मचाऱ्यांना पगार मिळाला पाहिजे बरोबर आहे. पण आपल्या मुलांना योग्य ट्रेनिंग मिळाली पाहिजे. मा. महापौर मॅडम आपण मा. आयुक्तांना आदेश द्या. मुलांना सुविधा दिली आहे ती बरोबर द्या नाहीतर बंद करा.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या ३५ शाळा आहेत आणि ९५ नगरसेवक आहेत. प्रत्येक शाळेत गणवेश वाटप करताना गणवेश वाटप करण्याअगोदर प्रत्येक शाळेची यादी त्या-त्या प्रभागात असणाऱ्या त्या विद्यार्थ्यांची यादी पाहिजे. आणि वाटप करताना ते नगरसेवक असले पाहिजे अशी माझी सुचना घ्या.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळेची अवस्था एकदम दयनीय आहे. शैक्षणिक दर्जा तर विसराच. मुलांना गुणवत्ता दर्जाचे शिक्षण मिळत नाही. ज्या संगणक ठेकेदाराला ठेका दिला आहे आणि त्यांना दर महिने बिल अदा केले जाते त्यापेक्षा त्यांचा ठेका रद्द करण्यात यावा. आणि त्या शाळेमध्येच कम्प्युटर खरेदी करुन तिथे त्यांना देण्यात यावा. दुसरी गोष्ट ह्या वर्षापासून ८ वी चे वर्ग सुरु केले आहेत. आणि पूढच्या वर्षी ९ वी आणि १० वी चे वर्ग सुरु करायला लागतील. मिरा भाईंदर शाळेमध्ये शिक्षण जे गोरगरिब विद्यार्थी आहेत उर्दु माध्यम, मराठी हिंदी आणि गुजराती माध्यम त्याच्यासाठी ९ वी ची शाळा सुरु करायला लागणार आहेत त्याचा निर्णय अजून घेतलेला नाही. आपल्या बाजूला ठाणे जिल्हा आहे त्याचा विचार केला तर ठाणे जिल्ह्याच्या सीईओ नी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ह्यांनी संपूर्ण ग्रामीण भागात शाळाचे डिजीटलायजेशन केले आहे. आपण ग्रामीण भागात डिजीटलायझेश्यान करु शकतो. तर आपण शहरी भागात का करु शकत नाही. म्हणजे आपल्या विद्यार्थ्यांना देखील खाजगी शाळेच्या विद्यार्थ्यांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळायला पाहिजे. त्या दृष्टीकोनातून प्रशासनाने प्रयत्न केले पाहिजे. तो प्रयत्न होताना दिसत नाही. माझी आपणास विनंती आहे की आपण प्रत्येक शाळेमध्ये कम्प्यूटरायझेशन करा आणि संपूर्ण शाळेचे डिजीटलायझेशन करा. जेणेकरुन आपल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळेल. कम्प्युटरचा ठेका रद्द करुन नविन कम्प्युटर देण्यात यावे.

**नरेश पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, मा. महापौर मॅडम आमच्या मोरवा शाळेची परिस्थिती अत्यंत गंभीर झालेली आहे. प्रत्येक वर्षी मेन कापड लावून शाळा चालवली जाते. लेडीजसाठी टॉयलेटची सोय नाही. ती शाळा कधी रिपेयर होणार. २०१३ ला सॅक्शन झालेले आहे. ह्या महासभेत बजेट सुध्दा सॅंक्शन झालेले आहे. ती बनवायला कधी चालू करणार.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, शाळेच्या मुलांच्या शिक्षणाचे आणि त्यांच्या ज्या काही गरजा आहेत गणवेश, साहित्य वैगेरे हा विषय आणलात सर्व सदस्यांनी आपले अभिनंदन केले. त्याही पूढे जाऊन सदस्यांनी काही प्रश्न उपस्थित केले. मागे जे काही घडत होत ना एक वर्ष, दीड वर्ष त्याकडे आपण गांर्भियाने बघायचे नाही. आता आपली परिस्थिती चांगली आहे. आपल्याला अच्छे दिन आलेले आहेत. ते सगळं विसरुन माझी आपल्याला विनंती आहे आपण संबंधित अधिका-याना आदेश द्यावेत असे प्रकार घडता कामा नये वेळेवर शाळेचे संगणक, त्याचे पगार, गणवेश वेळेवर देण्यात यावे. अशी माझी विनंती आहे.

**मिरादेवी यादव :-**

शाळा क्र. ४ आणि ५ मे ११०० बच्चे मराठी में ५०० से उपर उर्दु बच्चे है। वहाँ पे मैं कई बार शिकायत कर चूकी शिक्षण अधिकारी लेकीन कोई सुचना नही वहाँ ११०० बच्चे और १३ टीचर है। उसमें से बरोबर टिचर आती नही १ साल से मैं चर्चा की, स्टॅंडिंग मे मैं चर्चा की लेटर दिया पर उधर टीचर का सुविधा नही बच्चे को बैठने की जगह कम पड रही है। कई जगह पंखा नही तो कई बाथरुम, दरवाजा हर एक चीज का असुविधा मैंने बार-बार शिकायत की लेकिन आज तक कोई सुविधा मिली नहीं मेरे निवेदन पे ध्यान दिया जाए।

**संदिप पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझी सुचना आहे गेल्या वर्षी शिक्षण विभागाने गणवेश, पुस्तक आणि बूट ह्याचा वाटप ऑगस्ट महिन्यात केले होते म्हणजे शाळा चालू होऊन तीन महिन्यानंतर माझी अशी विनंती आहे की शाळा चालू व्हायच्या अगोदर मुलांना दिले ....................

**मा. महापौर :-**

ठरावात तेच आहे आणि ते झाले नाही तर अधिका-यांना दंड पण आहे.

**दिपीका अरोरा :-**

मा. महापौर मॅडम विथ युअर परमिशन सी.एफ.सी. विंग ऑफ एम.बी.एम.सी. में एक सर्व्हे कंडक्ट किया था कम्प्यूटर जो उनको प्रोव्हाईड किए है ११० कम्प्यूटर सिस्टम से जिसमे ७० टक्के याने की ५१ कम्प्यूटर आर नॉन ऑपरेटेबल ॲन्ड दोज प्रायव्हेट जो देशमुखजी है उन्होने यह आश्वासन दिया था की ऐसे स्थिती में जो प्रायव्हेट कॉन्ट्रॅक्टर है उनके उपर केस करेंगे शोकेस नोटिस भेजेंगे। उस विषय में मैं पूछना चाहूँगी की ऐसा नोटिस भेजा गया है या नहीं।

**मर्लिन डिसा :-**

मॅडम आपली परवानगीसे मला शिक्षण अधिका-यांना विचारायचे आहे आपल्या पालिकेच्या हद्दीत ३५ शाळा आहेत त्याच्यात किती ४ थी पर्यंत आहेत आणि किती ७ वी पर्यंत आहेत. सगळ्या शाळा ७ वी पर्यंत नाही. आणि जिथे ८ वी चे वर्ग चालू केले आहे ते जिथे ७ वी चे आहेत तिथे सगळीकडे केले आहेत की नाही. जिथे शाळा ४ थी पर्यंत आहे ती मूल काय करतात. ५ वी मध्ये पूढे जातात का शिकतात का राइट टू एज्यूकेशनमध्ये आता कम्पलसरी ८ वी पर्यंत मुलांना पास व्हायचे आहे. तर ज्या शाळेत ४ थी पर्यंत अभ्यास करतात त्याच्यानंतर तुम्ही फॉलो अप करतात का की ही सगळी मूल शाळेत जातात की नाही? तुम्ही बोलता१० टक्के वाढ येते तर ही कशी येते. मिरारोडमध्ये २१ नंबरची शाळा गूजराती मिडीयमची आहे तिथे १ ली ते ४ थी पर्यंत वर्ग आहेत तिथ किती शिक्षक आहेत. दुपारच्या वेळी मराठी माध्यम चालते कशाप्रमाणे चालते आणि किती शिक्षक आहेत? मिरा भाईंदरचा प्रत्येक सिटीझन टॅक्स भरतो. शिक्षणासाठी शासनाकडे खर्च येतो मग ह्या मुलांना आपण १०० टक्के एज्यूकेशन देतो का? टीचर नसतात, गैरहजर असतात. आमची २१ नंबरची शाळा मार्केटमध्ये आहे. तिथे हे शिक्षण देण्यासाठी सराऊंडींग बरोबर आहे का? तिथे एवढे फेरिवाले बसतात मग मूल कशी काय अभ्यास करणार? शिक्षकाना तिथे त्रास होत नाही का? ह्याचा खुलासा करावा.

**शिल्पा भावसार :-**

गुजराती मिडीयम शाळेचे ते बोलले तर मला एवढेच विचारायचे आहे की, गुजराती मिडीयम शाळेत गुजराती शिकवण्यासाठी गुजराती टीचर आहेत की नाही. मागे आम्ही बघितले मराठी टीचरनाच गुजराती शिकवायला ठेवले आहे. ते चूकीचे आहे.

**शिक्षण अधिकारी :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो आपल्या महानगरपालिकेच्या ३५ शाळा आहेत. त्यापैकी हिंदी माध्यमाच्या ४ शाळा आहेत, उर्दु माध्यमाच्या ५ शाळा आहेत गुजराती ५ आणि मराठी माध्यमाच्या २१ शाळा आहेत. हिंदी माध्यमाचे २८६८ विद्यार्थी आहेत, उर्दु माध्यमाचे १४८२ विद्यार्थी आहेत. गुजराती माध्यमाचे ३८० विद्यार्थी आहेत आणि मराठी माध्यमाचे ४३८६ असे एकूण ९११६ विद्यार्थी आहेत. मॅडमनी मिरारोडच्या २१

नंबरच्या शाळेच्या बाबतीत जो प्रश्न केला २१ नंबरला ६० विद्यार्थी आणि दोन शिक्षक तिथे अद्यापन करीत आहेत.

**मर्लिन डिसा :-**

चार वर्गासाठी दोन टीचर कसे काय मॅनेज करतात.

**शिक्षण अधिकारी :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो आपल्या शासनाचे पद मंजूर आहेत २०२ पद मंजूर आहेत. २०२ पैकी १९२ शिक्षक कार्यरत आहेत. ९ शिक्षकांच्या बाबतीत जिल्हा प्रशासनाकडे मागणी केलेली आहे. आमची जेव्हा शिक्षक संचालक आणि उपसंचालकाची सभा असते त्या वेळेस मी शिक्षकांची मागणी केलेली आणि काकानी देखील मा. शिक्षण अधिकाऱ्यांशी फोनवर संपर्क साधून त्यानी एक पत्र दिले आहे. तात्काळ आम्हाला शिक्षक उपलब्ध करुन द्यावे.

**मर्लिन डिसा :-**

४ थी नंतर तुम्ही फॉलो अप करता का?

**शिक्षण अधिकारी :-**

आपले बालकाचे शिक्षण मोफतच सक्तिचे अधिनियम २००९ आपण देखील शिक्षण खात्यात काम करता असे मला माहित आहे. गेल्या २५ वर्षापासून प्राथमिक ते उच्च माध्यमिक पर्यंत काम केलेच आहे. कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. ह्या संदर्भात शासन प्रयत्नशील आहे आणि कोणालाही वंचित ठेवत नाही. त्यासाठी अनेक उपाययोजना शासन करते. त्याप्रमाणे अंमलबजावणी देखील करते.

**मर्लिन डिसा :-**

४ थी पर्यंत गुजराती शिकणारी मूल पूढे कूठे जातात. ५ वी मध्ये शिकायला कुठे जातात.

**दिपिका अरोरा :-**

नोटिस बद्दल काय केले त्याचे उत्तर द्या.

**सुहास रकवी :-**

काका मघाशी जो विषय केलात ४ थी नंतर शिक्षण कूठे आपण स्टँडिंगमध्ये सभापती साहेब होते. आपण काही शाळाना मालमत्ता करात रिलॅक्सेशन देतो. त्याची यादी आपल्याकडे आहे. त्यातले २० टक्के आपल्या इकडच्या ज्या गरजू लोकांना ॲडमिशन द्यायचे आहे त्याचे सूध्दा तुम्ही किती दिली कुठे दिली ह्याची यादी नंतर देणार असे त्यावेळी सांगितले. म्हणजे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये ह्याच्या करिता आपला प्रयत्न आहे पण त्याकरिता त्यांनी सांगितल्याप्रमाणे ५१ टक्के फक्त संगणक चालतात म्हणजे तुमचे दुर्लक्ष किती आहे ते दिसून येते. गुजराती मिडीयमला किती शिक्षकाची आवश्यकता आहे. तुम्ही सांगता जिल्हा प्रशासनाकडे मागणी केली आहे पण त्याची पूर्तता किती केली त्याचा पाठपूरावा किती केला कारण ज्या मराठी शिक्षकाला गुजराती येत नसेल तर तो विद्यार्थी शिकणार काय हाही महत्वाचा विषय आहे. तुम्ही कोणतीही गोष्ट करताना पाठपूरावा करुन ते तडीस न्यायचे आहे. इम्पलीमेन्टेशन झालेच पाहिजे. शिक्षण म्हटल्यावर हा शहराचा भाग आहे. सगळ्या मुलांना शिक्षण मिळालच पाहिजे. सगळे सदस्य बोलले मिरादेवी यादवनी सांगितले की जेवणामध्ये किडे सापडले ह्याचा अर्थ सगळ्या ठिकाणी दुर्लक्ष दिसून येते. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब तुम्ही देखील शिक्षण अधिकाऱ्यांना वारंवार त्याची पाहणी करायला सांगायची आहे. तुम्ही ह्या शिक्षणाकडे लक्ष द्या ज्या सदस्यांनी सुचना केल्या आहेत त्याचा पाठपूरावा करुन त्याचे इम्पलीमेन्टेशन लवकरात लवकर होईल ह्याची ग्वाही द्या.

**शिक्षण अधिकारी :-**

मॅडम त्याच्यावर १५ दिवसात कार्यवाही करु.

**दिपिका अरोरा :-**

तुम्ही शोकस नोटिस काढले आहे की नाही.

**शिक्षण अधिकारी :-**

नोटिस काढली होती. त्यांनी प्रशासनाला उत्तर पण दिले आहे.

**दिपिका अरोरा :-**

काय उत्तर दिले.

**शिक्षण अधिकारी :-**

अडीअडचणीच्या वेळी, शिक्षकांच्या वेतनाबाबत किंवा संगणक बंद असल्याबाबत ...............

**दिपिका अरोरा :-**

पेमेन्ट तर तुम्ही स्टॉप केलेले आहे. वेतनचा प्रॉब्लेम टेंडर देण्यापूर्वी घातला नव्हता.

**शिक्षण अधिकारी :-**

मॅडम, तो १० वर्षाचा करार झालेला.

**दिपिका अरोरा :-**

पूर्वी आमच्याकडे कम्प्यूटर नव्हते आताच आले ना. टेंडरमध्ये काय क्लॉज ठेवला ते वेतन नंतर सांगितले नाही.

**शिक्षण अधिकारी :-**

१५ दिवसात निर्णय घेतला जाईल.

**वंदना चक्रे :-**

२००८ साली शाळेचे व्हेकेन्ट प्लॉट मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सरकारी प्लॉट ज्याच्यासाठी रिझर्व्हेशन पास झालेले आहे तेथे शाळा बांधण्यासाठी त्याची अंमलबजावणी कधी होणार ती शाळा कधी बांधणार? मी पत्र दिलेले आहे मा. आयुक्त महोदय बघून घ्या. महानगरपालिकेचे माझ्या वॉर्डमध्ये दोन शाळा आहेत. एक हिंदी एक मराठी २००८ साली त्याचा पत्रव्यवहार केलेला आहे. महापौर नरेंद्र मेहता असताना ठराव पास झालेला आहे. ती शाळा कधी बांधणार त्याचे मला उत्तर द्यावे.

**मा. महापौर :-**

ते त्वरीत सुरु करावे असे मी निर्देश देते. सन्मा. सदस्यांनी ज्या-ज्या सुचना केल्या, ज्या-ज्या तक्रारी आहेत त्याचे निवारण करावे अशी मी त्यांना विनंती करते, आदेश देते आणि ते लवकरच होणार.

**वंदना चक्रे :-**

मॅडम शाळेचा उल्लेख करा.

**मा. महापौर :-**

हा ठराव मी प्रभात ताई ह्यांची सुचना मंजूर करते. सचिव साहेब पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७३ :-**

मिरा भाईंदर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करणेसाठी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ७४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३५ शाळा असुन दि.३० सप्टेंबर २०१४ च्या पटसंख्येनुसार इ. १ली ते इ.८वी पर्यत एकुण ९२६२ विद्यार्थी-विदयार्थीनी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात १०% संभाव्य वाढ लक्षात घेवून एकुण अंदाजे १०,१८८ पर्यंत पटसंख्या अपेक्षित आहे. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये विदयार्थी-विदयार्थीनींना शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश-टाय सह (प्रत्येकी-२), बुट-मोजे, वह्या, बॅग, पाण्याच्या बाटल्या इत्यादी पुरवठा करण्याबाबत महानगरपालिकेचे धोरण आहे. शिक्षण विभागानी साहित्य पुरवठा कामी असलेल्या सर्व प्रशासकीय मान्यता दि. २० एप्रिल २०१५ पूर्वी घ्याव्यात व तद्नंतर सदरचा विषय मान्यतेसाठी मा. स्थायी समिती पुढे ठेवावा. ठेकेदाराने विहित मुदतीत शैक्षणिक साहित्य पुरवठा केला नाही तर ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. तसेच शैक्षणिक साहित्य शाळा सुरू झाल्यानंतर १५ दिवसांत वितरित करण्यात यावे. असे न केल्यास दोषी अधिका-यांवर प्रशासनाने कार्यवाही करावी.

मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना सदर धोरणानुसार सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक तरतुद सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली आहे. सबब साहित्य खरेदी करण्याकरिता ही सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**सदर ठरावामध्ये सुचक सौ. वर्षा भानुशाली व अनुमोदक सौ. कल्पना म्हात्रे यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत शालेय गेणवेष व शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना वाटप करतेवेळी संबंधित प्रभागातील स्थानिक नगरसेवक/नगरसेविका यांना याबाबत कळवून त्यांच्यासमोर सदर गणवेष व इतर शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात यावे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

इयता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना कंपासपेटी देण्यात यावी.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७४, टेंबा इस्पितळासाठी नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्ती बाबत.

**रोहिदास पाटील :-**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये टेंबा इस्पितळाकरीता आवश्यक असलेले अधिकारी/कर्मचारी पद भरतीची मोहिम राबविण्यांत आली. घेण्यात आलेल्या थेट मुलाखती व मुलाखती अंती निवडण्यात आलेले विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची निवड यादी व प्रतिक्षा यादी मुलाखत घेतलेल्या दिवशी प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार ‘‘महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे- मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत-त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित

असेल" आणि उक्त अधिनियमाच्या कलम ५३(३) नुसार, त्या व्यतीरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते कायम असो किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल. त्या अनुषंगाने सहा. आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा सवंर्गातील उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी ची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

**निवड यादी**

| अ. क्र. | संवंर्ग | निवडलेला उमेदवार | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी<br>(स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र) | १. डॉ.सरीता अरुण चन्नावर | खुला |
| २. | वैद्यकीय अधिकारी | १. डॉ. दिनेश पुनमचंद प्रजापती<br>२. डॉ. वंदना सत्यनारायण गुंडला<br>३. डॉ. संजय दशरथ गईवाले<br>४. डॉ. प्रणिल राजेंद्र पढयार<br><br>५. डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी<br>६. डॉ. संदिप प्रधान<br>७. डॉ. मोहन गोविंदा गायकवाड<br>८. डॉ. तानाजी दशरथ म्हारनूर<br>९. डॉ. प्रणव नरेश शिरभाते | खुला-१<br>खुला-२<br>खुला-३<br>खुला-४<br>(अपंग)<br>अ.जा.१<br>अ.जा.२<br>अ.ज.१<br>भ.ज.(क)१<br>इ.मा.व.१ |

**प्रतिक्षा यादी**

(जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. १२/०२/२०१५ ची प्रत्यक्ष यादी खालील प्रमाणे.)

| अ.क्र. | संवंर्ग | प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमे उमेदवार | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी<br>(स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र) | १. डॉ. आशिष विद्याधर श्यामकुल | खुला |
| २. | वैद्यकीय अधिकारी | १. डॉ. प्रशांत मारुती बोडके<br>२. शिल्पा व्ही. नाईक<br>३. डॉ. मनाली प्रमोद राउत<br>४. डॉ. विजय कारभारी कवर<br>५. डॉ. राजु बी. सुळे | खुला<br>खुला<br>खुला<br>अ.ज.<br>भ.ज.(क) |

वर नमूद केलेल्या संवर्गासाठी महासभा नियुक्ती प्राधिकारी आहे. त्यामुळे प्रस्तुत निवड यादीस व प्रतिक्षा यादीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार महासभेची मान्यता आवश्यक आहे. सबब निवडलेल्या व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या नियुक्तीस ही महासभा मंजूरी देत आहे. तथापि इस्पितळ सुरू झाले नसल्यामुळे इस्पितळ सुरू होण्यापूर्वी नजदीकच्या महासभेमध्ये प्रस्तुत वैद्यकिय उमेदवारांची नियुक्ती आदेश देण्याच्या मान्यतेच्या प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करावा. तथापी आरोग्य केंद्र व इंदिरा गांधी हॉस्पीटल येथील वैद्यकिय अधिकारी ३, नर्स १२, फार्मासिस्ट ३ यांचे नियुक्तीस ही सभा मंजूरी देत आहे. व त्यांचे नियुक्ती आदेश देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**अनिल भोसले :-**

माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका महासभा दि. २३/०३/२०१५ प्रकरण क्र. ७४, टेंबा इस्पितळासाठी नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी कर्मचारी ह्यांच्या नियुक्तीबाबत. उपरोक्त प्रकरण आपणांस सुचना करते की, ठाणे, मुंबई महानगरपालिका जी.आर नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका रुग्णालयातील कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना प्राधान्याने प्रथम वैद्यकिय आस्थापनेवर नियमानुसार कायम करण्यात यावे व त्यानंतर नविन सुरु होणाऱ्या टेंबा रुग्णालयाकरिता आपण निवड केलेल्या कर्मचाऱ्यांचा विचार करावा. जेणेकरुन सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही. वैद्यकीय विभागामध्ये काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचा-यांचे नाव |
|---|---|
| १. | श्रीम. नेहा निलेश वनमाळी |
| २. | श्रीम. अंजली अविनाश यादव |
| ३. | श्रीम. लिडीया अंतोन करास |
| ४. | श्रीम. स्विडल फर्नांडिस |

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचा-यांचे नाव |
|---|---|
| ५. | श्रीम. उज्वला दिनेश सोनावणे |
| ६. | श्रीम. जया नरेश पेडणेकर |
| ७. | श्रीम. लविना स्टीफन डाबरे |
| ८. | श्रीम. जेविता परेरा |
| ९. | श्रीम. रेखा रमेश कडू |
| १०. | श्रीम. स्नेहा राणे |
| ११. | श्रीम. गिता गोटे |
| १२. | श्री. गजानन राठोड |
| १३. | श्रीम. सय्यद सकिना चांदबाशा |
| १४. | श्री. शिवाजी व्यंकटराव वाकोरे |

उपरोक्त कर्मचाऱ्यांच्या प्रशासनाने प्राधान्याने विचार करावा अशी मी सुचना मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, सदरचा विषय हा मा. उच्च न्यायालयातील आदेशानुसार झालेली भरती आणि त्यानुसार निवडलेली यादी आपल्यासमोर ठेवण्यात आलेली आहे. विद्यमान कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करायचे असेल तर तो वेगळ्या प्रक्रियेचा भाग आहे. ही थेट सरळ सेवेने भरती केलेली भरती प्रक्रिया आहे. त्यामुळे उच्च न्यायालयातील कम्पलायन्ससाठी सदरचा गोषवारा आणि त्या अनुषंगाने आलेला प्रस्ताव आपण मंजूर करावा ही विनंती.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, ह्या थेट मुलाखती झालेल्या होत्या आणि थेट मुलाखतीमध्ये जे पूर्वीपासून काम करतात त्यांना देखील संधी दिली पाहिजे होती. परंतु ती संधी देखील दिली गेली नाही. थेट मुलाखतीसाठी ती इथे काम करणारी व्यक्ती असो की बाहेरची व्यक्ति असो त्याला संधी मिळाली पाहिजे होती मग इथल्या कर्मचाऱ्यांना संधी का दिली गेली नाही ठाणे आणि मुंबईच्या जी आर नुसार नियमानुसार आपण इथे काम करतो. मग ह्याच्यासाठी हे नियम का वापरले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, ह्या ठिकाणी उपायुक्त मुख्यालय ह्यांनी जो खुलासा केलेला आहे. महानगरपालिकेमध्ये जे कार्यरत कर्मचारी आहेत तर तेव्हा महानगरपालिकेनी सरळ सेवेची ॲडव्हटाईज काढली त्यावेळी जे इलिजिबल होते त्यांनी विभागामार्फत प्रस्ताव त्याच्यामध्ये अर्ज करायला हवा होता. ते जर इलिजिबल असतील तर त्याच्यामध्ये ते आले नसतील. परंतु मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे ही भरती आपण सरळ सेवा भरती केलेली आहे आणि तो प्रशासनाचा अधिकार आहे ती आम्ही भरती करुन विहित मार्गाने महासभेमध्ये मंजूरीसाठी आपल्यापूढे सादर केलेली आहे. आपले जे म्हणणे आहे त्या कर्मचाऱ्याला प्रमोशन द्यायला पाहिजे हा वेगळा विषय आहे. त्यामुळे ह्या विषयामध्ये हा विषय मिक्स करु नये ही माझी विनंती आहे. आपण हा जो प्रस्ताव पाठवला काकानी जो विषय वाचला आम्ही हे पण सांगितले आहे की आपले हॉस्पीटल आजपर्यंत रेडी झाले नाही आणि ह्या डॉक्टरना उद्या सकाळी अपॉइंटमेंट देणे योग्य होणार नाही. त्यामुळे ज्यावेळी हॉस्पीटल तयार होईल तेव्हा त्याचे आदेश निर्गमित केलेले महासभेकडे मंजूरीला येतील त्यानंतर त्यांना देण्यात येतील.

**निलम ढवण :-**

मा. आयुक्त साहेब त्यावेळची सिच्यूएशन जी होती ती देशमुख साहेबांना चांगली माहित आहे. त्यावेळे हे जे कर्मचारी आहेत त्यावेळी फॉर्म भरुन दिले गेले. थेट मुलाखती असल्यामुळे त्यांना थेट मुलाखतीसाठी घेतले गेले नाही. ठाणे आणि मुंबईच्या जी.आर नुसार जे कर्मचारी कार्यरत आहेत आम्ही असे म्हणत नाही की डायरेक्ट सामावून घ्या. त्यावेळी थेट मुलाखतीसाठी त्यांना घेतले गेले पाहिजे होते. ज्यावेळी ॲड काढली तेव्हा वयात बसत होते. मध्ये एकदा मुलाखती कॅन्सल केली गेली त्यानंतर पून्हा त्याची तारीख वाढवण्यात आली त्यामध्ये एक-दोन महिन्यांचा फरक पडला असेल वयामध्ये तर त्यानुसार जी.आर देखील अस सांगतो की, स्थानिक ह्याच्यात काम करत असतील तर त्यांना चार वर्षाचा एक्स्ट्रा वाढवून दिले आहेत मग आपल्या सोयीनुसार जी.आर. वापरायचे का? प्रत्येक वेळी आपल्या सोयीनुसार काम करायची का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, प्रस्तूत प्रकरणी जे उमेदवार आपल्याकडे मुलाखतीसाठी आले होते आणि ज्या उमेदवारांकडे महानगरपालिकेनी मंजूर केलेल्या उपविधीनुसार बायलॉजनुसार शैक्षणिक अर्हता होती अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी संधी देण्यात आलेली आहे. जे उमेदवार मुलाखतीमध्ये शैक्षणिक अर्हताकारी किंवा प्राप्त होते. ज्यांच्याकडे ती शैक्षणिक अर्हता होती अशा उमेदवाराचा मुलाखतीत विचार करण्यात आला होता. आणि ज्या उमेदवाराकडे शैक्षणिक अर्हता नव्हती त्यांना आपण मुलाखतीला बोलवू शकत नाही किंवा त्याची निवड होऊ शकत नाही त्यामुळे कदाचित त्यांची मुलाखत झाली नसेल किंवा त्यांची निवड झाली नसेल.

**निलम ढवण :-**

देशमुख साहेब त्यावेळी तुमच्या निदर्शनास आणून दिलेले होते. तरी तुम्ही असे दाखवले नाही की त्यांना आत घ्यावे किंवा त्यांच्या मुलाखतीसाठी उभे करावे किंवा फॉर्म भरून घ्यावे. ही औपचारिकता तुम्ही दाखवली नाही असे नाही ना जर तुम्ही नियमानुसार करतात तर सगळे विषय नियमानुसार होतात का? नियमानुसार करा ही आमची मागणी आहे. नियमाच्या बाहेर जाऊ नका. ह्याच्यापूढे बाकीच्या महानगरपालिकेचे जी.आर आणि बाकीचे नियम दाखवू नका. सोईनुसार कामे घेऊ नका.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, सोईनुसार काही अर्थ घेतलेले नाही आपले जे महानगरपालिकेनी बायलॉज मंजूर केले आहेत त्या बायलॉज नुसारच ती भरती झालेली आहे.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो देशमुख साहेब त्यांचे म्हणणे असे आहे जसे आयुक्तांनी सांगितले की विभागामार्फत त्यांनी जर त्या प्रवेश प्रक्रियेला फॉर्म भरला असता जी तुमची काही ओपन, खुला वर्ग आहे. पण तशी त्यांना माहिती नसेल तर त्यांना एक संधी द्यावी. कारण ते एवढी वर्ष आपल्या महानगरपालिकेच्या सेवेत आहेत आणि दुसरी गोष्ट टेंबा हॉस्पीटल ३१ मार्च २०१५ पर्यंत सुरु करायचे हायकोर्टाचे निर्देश आहेत. आपल्याला माहित असेल काही कामामुळे उशीर होत आहे. आम्ही स्थायी समितीने त्याच्यात तरतूद केली आहे की ते टेंबा हॉस्पीटल त्या मिरा भाईंदरच्या शहराकरिता खरोखर गोर-गरीबांकरिता हे रुग्णालय लवकर सुरु व्हावे अशी सगळ्यांची अपेक्षा आहे. कोणत्याही पक्षाचा त्याला विरोध नाही. परंतु त्या सेवेमध्ये करताना इकडचे जे कर्मचारी आहेत ते तुमच्या माध्यमातून पून्हा एकदा निवड प्रक्रिया घेतली तर त्याला काही हरकत नसणार असे आमचे म्हणणे आहे. पण त्या नियमानुसार आता जे डॉक्टर अपॉइंट करणार ते कॉलिफाईड असतीलच नसतील तर एम.बी.बी.एस आहेत का त्याची माहिती ह्याच्यात दिली नाही. ती सुध्दा माहिती द्यावी. कारण रुग्णालय कायमस्वरुपी आणि मोठ्या प्रमाणात चालवायची आहेत. सगळ्या नागरिकांच्या प्रशासनाकडून आणि आमच्याकडून भरपूर अपेक्षा आहेत. आणि मिलन म्हात्रे साहेबांनी उच्च न्यायालयात जाऊन वारंवार ह्या विषयी त्यांनी स्वतः ४ ते ५ वर्ष न्यायालयीन लढा लढत आहेत. आमची विनंती आहे लवकरात लवकर टेंबा हॉस्पीटल चालवण्यासाठी प्रयत्न करावा आणि निलम ढवण मॅडमनी जो प्रश्न उपस्थित केला त्याचा देखील मार्ग काढावा ही विनंती.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य दोघांनी जे उपस्थित केलेले मुद्दे आहेत त्याची मी माहिती देतो. सदरचे कर्मचारी मा. उच्च न्यायालयात रि-पिटीशन द्वारे दाखल झाले होते. त्यामुळे त्यांना ही भरती माहित नाही. किंवा भरती प्रक्रिया झाली नाही असे मूळीच नाही. मा. उच्च न्यायालयाने सुनावणी अंती त्यांच्याकडे शैक्षणिक अर्हता नसल्यामुळे त्यांची याचिका फेटाळली आहे. त्यामुळे विषय दिसतो तसा सोपा नाही आहे. प्रशासनाची देखील त्यांना सहानुभूती आहे. परंतु सेवा भरती नियमाला डावलून भरती करु शकत नाही.

**प्रभात पाटील :-**

सुहास रकवीनी सुचना केली आपण इतके डॉक्टर घेतले खुला वर्ग आहे, इतर मागासवर्गीय पण त्याचे कॉलिफिकेशन ते ॲलोपॅथिक मध्ये आहेत की काय त्यांची काहीच माहिती दिली नाही माहिती देण्यात यावी.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम, सदस्या निलम ढवण मॅडमनी जो विषय घेतला की, जे ऑलरेडी आपल्याकडे ठेका पध्दतीने काम करतात त्यांना प्राधान्य द्यावे तो त्यांनी बरोबर विषय मांडला आहे. त्यांना प्राधान्य दिले गेले पाहिजे. आमदाराचे म्हणणे आहे अच्छे दिन आनेवाले है। तर ह्या बाबतीत प्रशासनाकडे फॉलोअप करुन शासनाकडे फॉलोअप करुन ह्या बाबतीत सेवाशर्ती नियमात बदल करुन हा विषय महासभेपूढे घेऊन यावा की ह्या लोकांना कसे आपण कायमस्वरुपी करुन घेऊ ह्या बद्दल फॉलोअप करा.

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. ७४ टेंबा इस्पितळासाठी नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत सन्मा. सभागृह नेते ह्यांनी जो ठराव वाचन केला ते आम्हाला नक्की कळले नाही की, प्रशासनाची भुमिका वेगळी दिसते तुम्ही ठराव केलेला वेगळा दिसतो. त्यामुळे आम्ही सचिवांना विनंती करतो की ठरावाचे स्पष्ट वाचन करा. सभागृहात सर्व सदस्यांना कळले पाहिजे की काय चालले आहे. आपला गोषवारा आलाय वेगळा ठराव झाला वेगळा. मा. आयुक्त म्हणतील मी नंतर विखंडीत करायला पाठवतो असे करण्यापेक्षा जे आहे त्याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने प्रशासनाकडून जो विषय आला होता की, टेंबा हॉस्पीटल मा. उच्च न्यायालयानी आदेश दिले की ते लवकरात लवकर सुरु करा. मार्चपर्यंत सुरु करायचे होते. काही कारणामुळे आतापर्यंत सुरु झालेले नाही आणि ह्यासाठी नेमणूक प्रक्रिया, अपॉइंटमेंट प्रक्रिया सुरु झाली होती. आज जो विषय सादर केला गेला तो विषय पटलावर त्याचे सिलेक्शन झालेले आहे. त्याची नेमणूक फायनल करण्यासाठी हे प्रकरण दिले होते. नियुक्ती संदर्भात मा. आयुक्तांनी जेवढे विषय दिले आहेत त्या नियुक्ती प्रक्रियेस आम्ही मान्यता देतो. फक्त आम्ही सांगितले त्यांचे अपॉइंटमेंट ते हॉस्पीटल जेव्हा चालू होईल त्या

दिवशी करा. कारण अंदाजे एक वर्ष लागणार आहे किंवा दहा महिने तर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये आम्ही तेवढाच बदल केला आहे. प्रक्रियेला आम्ही मान्यता देतो त्यांची अपॉइंटमेंट आता केली तर ते १० महिने घरी बसून आपल्याला पगार द्यायला लागेल. ते लाखो नाही कोटीमध्ये जातील. त्यासाठी आम्ही तसा निर्णय घेतला आहे की त्यांची प्रक्रिया मान्य करतो परंतु अंतिम ज्या वेळेला नजीकच्या कालावधीत हॉस्पीटल चालू होईल त्याच वेळी त्या सभेत हे विषय आणा आणि अंतिम मान्यता घ्यावी असा आम्ही निर्णय घेतलेला आहे. निलम ताईनी जी सुचना केली नक्कीच आपण दरवेळी कॉन्ट्रॅक्ट सिस्टमनी वैद्यकिय अधिकारी किंवा वेद्यकिय कर्मचारी नाहीत. अनेक विभागामध्ये कर्मचारी आहेत. आज ह्यांना समाविष्ठ करण्याचे ठरले की ते आपले धरतीपूत्र आहेत किंवा त्यांनी अनेक काळ महानगरपालिकेला दिलेला आहे. पण शासनाचे अनेक धोरण आहेत आणि सत्ताधारी पक्षाने मागच्या वेळी सेवा प्रवेश नियम केला आणि सेवा प्रवेश नियमामध्ये आपण कुठल्याप्रकारे सुविधा ठेवलेली नाही आणि आपण जे बदल केले ते गर्व्हमेंटनी मान्य केले नाही आणि सेवा प्रवेश नियम मंजूर केले ते सेवा प्रवेश नियमाच्या विरोधात जाऊन आपल्याला काही करता येणार नाही. जे कम्प्युटर ऑपरेटर आपल्याकडे आहेत त्यासंदर्भात मा. महापौर, मी स्वतः मा. आयुक्त ह्या सर्वांची बैठक झाली आणि सरकार ह्यामध्ये पॉझिटिव्ह आहे. पण त्यांना पण अडचण आहे की हे करायचे कसे? तरी त्यांनी आम्हाला एक मार्ग दिलेला आहे तर पूढच्या १-२ महिन्यात आम्ही सभेमध्ये आणू आणि त्या सर्व कम्प्यूटर ऑपरेटरला कसे समाविष्ठ करण्यात येईल त्यामध्ये नक्कीच विचार केला जाईल. आणि आता जी सुचना मांडलेली आहे निलम ढवण मॅडमनी ठरावात अशी सुचना मांडली आहे की विचार करावा.

**निलम ढवण :-**

घेण्यात यावे.

**नरेंद्र मेहता :-**

माझे असे मत राहील की त्या सुचनेमध्ये सुधारणा करावी की त्याचा नक्की विचार करावा. कारण घेण्याचे आपण केले तर तो ठराव पूर्ण डिस्र्टब होऊन जाईल. कारण आपण नेमणूक प्रक्रियेप्रमाणे करावे तेही डिस्टब होऊन जाईल. म्हणजे हे ही करता येणार नाही तेही करता येणार नाही. निलम मॅडम, आपण जी सुचना मांडलेली आहे माझी विनंती राहील त्याचा विचार करावा.

**निलम ढवण :-**

मेहता साहेब जेवढ्या जागा आहेत तेवढी लोक पण आता नाहीत. म्हणजे उपस्थिती नाही आहेत. पून्हा एक वर्षाने भरती करेपर्यंत त्याच्यातले कमी होतील मग त्यावेळी ह्या लोकांचा पहिला विचार करण्यात यावा.

**नरेंद्र मेहता :-**

आपल्याकडे चार नगरसेवक नाहीत तर ते प्रक्रिया करुनच आणावे लागेल म्हणजे काही गोष्टीला प्रक्रिया आहे. निलम मॅडम आपली भावना चांगली आहे. सगळ्या सदस्याची हीच भावना आहे की अनेक विभागामध्ये अनेक कर्मचारी अधिकारी काम करतात ते आपल्या महानगरपालिकेमध्ये पेरोलवर आले पाहिजेत परंतु शासनाचे जे सेवा प्रवेश नियम केले त्याच्या पलिकडे तुम्हाला जाता येणार नाही. कोर्टमध्ये स्टॅन्ड होणार नाही. आपण जी सुचना मांडली त्याच्या पॉझिटिव्ह विचार करावा की असे घ्यावे.

**निलम ढवण :-**

त्यानुसार त्यांना घेणारच आहेत. त्यांना घेऊ नका असे आमचे मत नाही. थेट मुलाखती झाल्या त्यांना घेणारच आहेत. पण त्याच्यानंतर जे आहे उरलेले आहेत त्यामध्ये त्या लोकांचे ................

**सुहास रकवी :-**

आमदार साहेब २०० खाटांचे चालू करायचे आहे तुर्तास आपण ५० खाटांचे चालू करतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मी सभागृहाला विनंती करतो की १५ एप्रिलला आपल्याला काय-काय कारवाई केली ते हायकोर्टात सादर करायचे आहे. ५० बेडच्या हॉस्पीटलची ऑलरेडी मुदत गेली आहे. त्यामुळे सभागृहाला विनंती आहे की तात्काळ मंजूरी द्यावी तसेच ह्याच्यामध्ये टेंबा हॉस्पीटल, इंदिरा गांधी हॉस्पीटल आणि आरोग्य केंद्रात देखील काही पद आहेत त्याला तात्काळ मंजूरी द्यावी इंदिरा गांधी हॉस्पीटलला रोज मला प्रॉब्लेम आहे. २-३ डॉक्टर सोडून गेले आहे. त्यांना तत्काळ आदेश पण आवश्यक आहे. त्यामुळे सभागृहाला विनंती आहे ह्याला तत्काळ मान्यता देण्यात यावी.

**सुहास रकवी :-**

पानपट्टे साहेब ठराव काय आहे तोच समजला नाही ठरावाचे पून्हा वाचन करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आमदार साहेब हे असे चालणार नाही. हायकोर्टातील आदेश दिले आहेत. इंदिरा गांधी हॉस्पीटलची पद आहेत. आरोग्य केंद्राची पद आहेत, इंदिरा गांधी हॉस्पीटलची ४-५ डॉक्टर निघून गेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही काय करतो आम्हाला चांगले भान आहे. असे करता येणार नाही, तसे करता येणार नाही. ३-३ वर्ष हॉस्पीटल रखडवले ते तुम्हाला चालू करता आले नाही का? २००७ साली बिल्डींगचे काम चालू झाले २००८ साली पूर्ण झाले. आज २०१४ आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण हायकोर्टात पण गेलो.

**नरेंद्र मेहता :-**

ह्यांना पगार कोण देणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सुप्रिम कोर्टाने सांगितले की आता चालवा.

**नरेंद्र मेहता :-**

ह्यांची नेमणूक आज केली.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

सचिवांनी ठरावाचे वाचन करावे.

**नरेंद्र मेहता :-**

ठराव वाचन केले. वर नमूद केलेल्या ......................

**सुहास रकवी :-**

साहेब हा ठराव काय कळत नाही. त्यांची नियुक्ती करायची की नाही त्याचा स्पष्ट उल्लेख नाही.

**प्रमोद सामंत :-**

मिरारोडच्या डॉक्टरांची पण नियुक्ती आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मिरारोड आरोग्य केंद्र.

**नरेंद्र मेहता :-**

आपल्या गोषवाऱ्यामध्ये म्हटले आहे टेंबा हॉस्पीटल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जाहिरात काढली होती.

**नरेंद्र मेहता :-**

आपण गोषवाऱ्यात टेंबा म्हटले आहे. सभागृहाला आपण काय विनंती केली आहे टेंबा हॉस्पीटल.

**सुहास रकवी :-**

प्रशासनाने विषयाचा खुलासा करावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आस्थापनाकडून विषय गेला आहे त्यामुळे ते राहीले असेल.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

विषय कसला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

विषय टेंबाचा असला तरी पद सगळ्यांची आहेत.

**प्रमोद सामंत :-**

आपण मंजूरी द्यायला तयार आहोत ना किती लोक पाहिजेत सांगा. करेक्शन करु.

**नरेंद्र मेहता :-**

यादी द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

यादी देतो.

**नरेंद्र मेहता :-**

आपण जेव्हा इकडे उपस्थित आहेत विषयासंदर्भात माहिती घेऊन उपस्थित राहायला पाहिजे. मा. आयुक्त महोदय जो आपण विषय दिलेला गोषवारा दिल्याप्रमाणे आम्ही निर्णय घेतला आहे. मिरारोडसाठी वैद्यकिय कर्मचाऱ्याची आवश्यकता असेल सभागृहाची मान्यता असेल आम्ही कधी नाकारणार नाही. लोकांच्या जीवनाचा प्रश्न आहे. आपण ते पूढच्या सभेमध्ये द्या.

**प्रमोद सामंत :-**

पानपट्टे साहेब यादी आता द्या. आता मंजूरी घ्या.

**सुहास रकवी :-**

हा विषय नंतर घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब विषयाचा खुलासा करा हा जो गोषवारा दिलेला आहे तो टेंबा हॉस्पीटलचा आहे. आणि पानपट्टे साहेबाचे म्हणणे आहे की मिरारोडचे जे राजीव गांधी हॉस्पीटल आहे तिकडे डॉक्टर नाही आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मिरारोड हॉस्पीटलमध्ये वैद्यकिय अधिकारी व नर्सेसची आवश्यकता आहे. पण हे ही सत्य आहे किंवा अन्य ठिकाणी ज्या ठिकाणी गरज आहे सभागृहाच्या पटलावर तो निर्णय आला पाहिजे होता आणि आलेला नाही. ह्याच्यावर कोणाचा अभ्यास नाही. आपण दिले तरी एका सेकंदामध्ये आम्ही निर्णय घेऊ शकत नाही असेही सांगू शकत नाही सभा थांबवा माझी एक सुचना आहे ह्या यादीच्या मंजूरीचे अधिकार आम्ही स्थायी समितीला देतो. २८ तारखेला सभा आहे त्यामध्ये ते मंजूर करुन घेण्यात यावे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

ह्याला महासभेची मंजूरी लागेल ना त्याला स्थायी समितीची मंजूरी कशी असणार ती वैधानिक समिती आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुम्ही ठराव मांडणार आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मांडणार आहे. पानपट्टे साहेब म्हणतात डॉक्टरांची गरज आहे. राजीव गांधी हॉस्पीटलमध्ये डॉक्टर नाहीत, आरोग्य केंद्रात डॉक्टर नाहीत. मग त्यांची नियुक्ती केली पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम हा विषय प्रलंबित ठेवा लंचनंतर निर्णय घेऊ या.

**मा. महापौर :-**

हा निर्णय लंच नंतर घेऊ या.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम मिरा भाईंदर महानगरपालिकेत अनेक छोटे हॉस्पीटल आहेत. त्यासाठी दोन फार्मसी, १२ नर्सेस, ३ डॉक्टर्स ह्यांची आवश्यकता आहे ही सभा २ फार्मसी, १२ नर्सेस, ३ डॉक्टर्सची नेमणूक करण्यासाठी परवानगी देत आहे. आणि कोणाची नेमणूक करायची त्याचे पूर्ण अधिकार मा. आयुक्तांना देत आहे अशी सुचना ठरावात मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब त्याची माहिती तर आम्हाला पाहिजे. तुम्ही करा आम्ही मंजूर करतो माहिती द्या का लपवता?

**नरेंद्र मेहता :-**

मी लपवत नाही. मी त्याचवेळी सांगितले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

खुल्या दिलाने स्वागत करतो. आम्ही ते मंजूर करतो. कोणत्या हॉस्पीटलमध्ये डॉक्टर कमी आहेत, कोणत्या ओ.पीडी. मध्ये नर्स नाहीत त्याची माहिती द्या.

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला माहिती प्राप्त झाली नाही पण शहराची गंभीरता बघून आम्ही तो निर्णय घेतला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो आरोग्य केंद्र व इंदिरा गांधी हॉस्पीटल येथे मंडीकल ऑफिसर ३, नर्स १२ आणि फार्मसीस्ट ३ हे तात्काळ आदेश देणे आवश्यक आहे.

**सुहास रकवी :-**

साहेब कोणत्या ठिकाणी हवे ते विचारले आहे.

**जुबेर इनामदार :-**

ह्या पदांना शासनाची मंजूरी आहे ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विनंती आहे ठरावात जी शेवटची तीन वाक्य आहेत ती पुन्हा वाचून दाखवा.

**नरेंद्र मेहता :-**

टाईप करणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब ह्याच्यावर आपले काय म्हणणे आहे सभागृह नेत्यांनी जो ठराव मांडलेला आहे की नियुक्ती आपण करा पण हॉस्पीटल चालू करायच्या अगोदर केले पाहिजे. ह्या बद्दल आपले काय म्हणणे आहे आपल्याला ते मंजूर आहे का?

**आसिफ शेख :-**

ह्या ठिकाणी सन्मा. सभागृह जे त्यांनी तो ठराव मांडलेला आहे आणि आमदार साहेबांनी जी भुमिका व्यक्त केलेली आहे सभागृहाला एवढाच खुलासा करा की, ठरावामध्ये म्हटले आहे हॉस्पीटल सुरु झाल्यानंतर

पण मला अशी माहिती द्या आपण जे मा. उच्च न्यायालयात किंवा सर्वोच्च न्यायालयात जे प्रतिज्ञापत्र प्रशासनाच्या वतीने सादर केलेले आहे. त्यामध्ये आपण स्पष्ट म्हटले आहे की हॉस्पीटल चालू झाले आहे की होते आहे त्याचा खुलासा करा. कारण आम्ही ठराव वेगळा करायचा तुमची हाय कोर्टामधली सुप्रिम कोर्टामधली प्रशासनाची भुमिका वेगळी असायची अशी गफलत व्हायला नको. ह्या संदर्भात मा. आयुक्त साहेब खुलासा करा. पानपट्टे साहेब त्या विभागाच इनचार्ज आहेत त्यांना जास्त माहिती आहे. माहिती घेऊन खुलासा करा.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने जे टेंबा हॉस्पीटलचे बांधकाम सुरु आहे त्या ठिकाणी मी स्वतः व्हिजीट केलेली आहे. आणि अतिशय मंद गतीने ते काम चाललेले होते. त्याच्यामध्ये कोर्ट मॅटर झाले. आणि कोर्ट मॅटर झाल्यानंतर ३१ मार्च पर्यंत हे काम पूर्ण करावे असा कोर्टाचा आदेश असताना देखील ते काम ३१ तारखेपर्यंत पूर्ण होईल की नाही ह्या शंकेने आम्ही कोर्टाला विनंती केली की आम्ही त्याच्या मध्ये कालावधी वाढवून मागितला आहे. आणि कोर्टाची पण हीच भुमिका आहे की चांगल्या पध्दतीचे काम करुन घ्या आणि गडबडीत काहीतरी थातूरमातूर काम करुन घेणे आम्हाला पटणार नाही आणि कोर्टाला देखील पटणार नाही. त्यामुळे आम्ही कोर्टाच्या आदेशाचे पालन केलेले आहे. आणि कोर्टाने जो आदेश दिलेला आहे त्या आदेशाच्या अनुषंगाने आम्ही कर्मचाऱ्यांची विहीत मार्गाने आणि आपल्याकडे जे कॉलिफाईड उमेदवार उपलब्ध झाले होते त्याची भरती विहीत पध्दतीने केलेली आहे आणि आता आपल्या सगळ्याना माहित आहे की आता शिपायाची भरती जरी करायची असेल तर त्याची तोंडी परिक्षा घ्यावी लागते. एखादे काम डिले झाले तरी चालते किंवा ते दपून जाते परंतु भरतीच्या बाबतीत आम्हाला माफी नाही. भरतीमध्ये काही सावळा गोंधळ झाला किंवा काही कर्मचाऱ्याचे तोंड बघून कोणाची भरती केली असा काही प्रकार झाला तर आम्हाला माफ होऊ शकत नाही त्यामुळे आमच्या अधिकाऱ्यानी जी भरती केली आहे ती नियमाचे काटेकोर पालन करुन भरती केलेली आहे. आता एक प्रश्न राहीला की महासभेमध्ये नविन जी कायद्यामध्ये सुधारणा झाली आपल्या सगळ्यांना माहित असेल मागच्या वर्षात सुधारणा झाली. २०११-१२ मध्ये त्या नुसार वर्ग ३ आणि वर्ग ४ चे कर्मचारी भरण्याचा अधिकार हे महाराष्ट्रातील जेवढ्या महानगरपालिका आहेत त्यांच्या आयुक्तांना देण्यात आलेला आहे. आणि वर्ग १ आणि २ चे जे कर्मचारी आहेत तर त्या सर्व कर्मचाऱ्यांची भरती केल्यानंतर त्याला महासभेची मान्यता लागते आणि महासभेच्या मान्यतेनंतरच आपण आदेश निर्गमीत करतो. आता एकच प्रश्न राहीला सन्मा. नगरसेवक आणि मा. आमदार साहेबांनी ह्या ठिकाणी सांगितले की आपण टेंबा हॉस्पीटलचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आदेश देणार की अगोदर आदेश देणार हा प्रश्न होता. त्याच्यामध्ये महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये ह्या दृष्टीकोनातून मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. परवा १ तारखेला हॉस्पीटल चालू होणार आहे. ३ दिवस किंवा जास्तीत जास्त ८ दिवस अगोदर आदेश निर्गमित करुन पाठवून देऊ. आज जर सभेने मान्यता दिली आणि उद्या आदेश निर्गमित केले तर महानगरपालिकेचा खर्च व्यर्थ जाणार आहे. पानपट्टे साहेबांनी सांगितले की काही नर्सेस आहेत इंदिरा गांधी हॉस्पीटलमध्ये त्यांची नितांत आवश्यकता आहे. त्याच्यामुळे काही नर्सेस आणि डॉक्टर लागणार आहेत त्याची पण मान्यता देण्यात आली आहे. टेंबा हॉस्पीटलमध्ये जी डॉक्टर नर्सेसची संख्या आहे त्याचे आदेश आम्ही यथावकाश निर्गमीत करु फक्त मा. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आपण ही भरती केलेली आहे १५ तारखेला एफिडेव्हिट कोर्टामध्ये करायचे आहे की आम्ही ही प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. आणि युध्द पातळीवर हे काम चालू केलेले आहे. हे हॉस्पीटल जेवढ्या लवकरात लवकर सुरु होईल आणि इथल्या गरिबातल्या गरिब नागरिकांना त्याचा फायदा होईल हा आमचा उद्देश आहे.

**सुहास रकवी :-**

साहेब टेंबा हॉस्पीटल माझ्या वॉर्डमध्ये येते. तुम्ही आता खुलासा केला की तिकडचे काम मंदगतीने चालू आहे. ॲक्चूली ते काम केव्हाच पूर्ण झालेले ......................

**मा. आयुक्त :-**

सध्या जे काम चालू आहे ते मंदगतीने चालू होत आता गती प्राप्त झालेली आहे.

**सुहास रकवी :-**

अजूनही फर्निचरचे काम चालू नाही. त्याच्यानंतर आम्ही ती फर्निचरसाठी ६ कोटीची तरतूद केली त्याचे टेंडर पण झाले नाही.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्याला ह्या कामाबद्दल बोललो जे सिव्हील वर्क सध्या तिथे चालू आहे नविन आर्किटेक्चरनी दिलेल्या नकाशाप्रमाणे चालू आहे. ते मी स्वतः पाहिलेले आहे. मी सभागृहाला खोटी माहिती देणार नाही.

**सुहास रकवी :-**

मा. आयुक्त साहेब मी स्वतः तिथे राहतो. आता तिथे कम्पाऊंड व्हॉल्वचे काम झालेले आहे. दुसरी गोष्ट मंद गतीने काम झाले किंवा नाही प्रशासनानी हायकोर्टात असे स्टेटमेंट दिले की सदर इस्पितळ आपण चालवू शकत नाही हे मोठे खर्चिक काम आहे असे पहिले ॲफिडेव्हीट हाककोर्टात आहे. त्यानंतर माजी नगरसेवक मिलन म्हात्रे साहेब त्यांनी त्याच्यावर रि-पिटीशन करुन ती ऑर्डर त्याच्यानंतर हायकोर्टातून नंतर सुप्रिम कोर्टातून पण आणलेली आहे. आमची अशी विनंती आहे की आपण जो डॉक्टर आणि नर्सचा ठराव केलेला आहे त्याचा अर्थ असा नाही की तुम्ही ८ महिन्यांनी चालू करणार त्याच्याकरता विलंब लागणार आमचे

असे म्हणणे आहे की, दोन महिन्यात ते हॉस्पीटल युध्द पातळीवर काम करुन हॉस्पीटल सुरु करावे अशी आमची विनंती आहे. त्याचप्रमाणे हायकोर्टात जी एफिडेव्हीट दिलेली आहे त्याच्यात ३१ मार्च २०१५ हे बायडिंग होत तुम्ही ते सुरु करायच परंतु ते झाले नाही त्याला विलंब झाला तुमच्या म्हणण्याप्रमाणे ते काम चांगले झाले पाहिजे. निश्चितपणे एकदा काम केले की तिथे आयुष्यभर आपल्याला सुविधा पुरवायच्या आहेत आमची विनंती आहे तुम्ही जे काही कराल आम्ही तिकडच्या वॉर्डचे नगरसेवक आहोत तर आम्हाला माहिती देण्याकरिता पानपट्टे साहेबांना सांगावे ही विनंती आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, ह्याठिकाणी जो कर्मचाऱ्याच्या नियुक्तीला मान्यता दिलेली आहे. त्याच बरोबर जे कर्मचारी इंदिरा गांधी आणि राजीव गांधी हॉस्पीटलमध्ये २-३ वर्षापासून डॉक्टर नर्सेसचे काम करतात त्यांना कायम करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. त्याचप्रमाणे माझी एक सुचना आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर जे १० इंजिनियर भरती केलेले आहेत त्यापैकी ३ सोडून गेले आणि ७ कार्यरत आहेत तर त्या ७ इंजिनियर्सना कायम करावे अशी माझी सुचना आहे. सगळ्यांना सामावून घेऊन विषय मार्गी लावा.

**प्रकरण क्र. ७४ :-**

टेंबा इस्पितळासाठी नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्ती बाबत.

**ठराव क्र. ७५ :-**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये टेंबा इस्पितळाकरीता आवश्यक असलेले अधिकारी/कर्मचारी पद भरतीची मोहिम राबविण्यांत आली. घेण्यात आलेल्या थेट मुलाखती व मुलाखती अंती निवडण्यात आलेले विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची निवड यादी व प्रतिक्षा यादी मुलाखत घेतलेल्या दिवशी प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार "महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे- मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत-त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल" आणि उक्त अधिनियमाच्या कलम ५३(३) नुसार, त्या व्यतीरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते कायम असो किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल. त्या अनुषंगाने सहा. आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा सवंर्गातील उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी ची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

**निवड यादी**

| अ. क्र. | संवर्ग | निवडलेला उमेदवार | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी<br>(स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र) | १. डॉ.सरीता अरुण चन्नावर | खुला |
| २. | वैद्यकीय अधिकारी | १. डॉ. दिनेश पुनमचंद प्रजापती<br>२. डॉ. वंदना सत्यनारायण गुंडला<br>३. डॉ. संजय दशरथ गईवाले<br>४. डॉ. प्रणिल राजेंद्र पढयार<br><br>५. डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी<br>६. डॉ. संदिप प्रधान<br>७. डॉ. मोहन गोविंदा गायकवाड<br>८. डॉ. तानाजी दशरथ म्हारनूर<br>९. डॉ. प्रणव नरेश शिरभाते | खुला-१<br>खुला-२<br>खुला-३<br>खुला-४<br>(अपंग)<br>अ.जा.१<br>अ.जा.२<br>अ.ज.१<br>भ.ज.(क)१<br>इ.मा.व.१ |

**प्रतिक्षा यादी**

(जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. १२/०२/२०१५ ची प्रत्यक्ष यादी खालील प्रमाणे.)

| अ.क्र. | संवर्ग | प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमे उमेदवार | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी<br>(स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र) | १. डॉ. आशिष विद्याधर श्यामकुल | खुला |
| २. | वैद्यकीय अधिकारी | १. डॉ. प्रशांत मारुती बोडके<br>२. शिल्पा व्ही. नाईक<br>३. डॉ. मनाली प्रमोद राउत<br>४. डॉ. विजय कारभारी कवर<br>५. डॉ. राजु बी. सुळे | खुला<br>खुला<br>खुला<br>अ.ज.<br>भ.ज.(क) |

वर नमूद केलेल्या संवर्गासाठी महासभा नियुक्ती प्राधिकारी आहे. त्यामुळे प्रस्तुत निवड यादीस व प्रतिक्षा यादीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(१) नुसार महासभेची मान्यता आवश्यक आहे. सबब निवडलेल्या व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या नियुक्तीस ही महासभा मंजूरी देत आहे. तथापि इस्पितळ सुरू झाले नसल्यामुळे इस्पितळ सुरू होण्यापूर्वी नजदीकच्या महासभेमध्ये प्रस्तुत वैद्यकिय उमेदवारांची नियुक्ती आदेश देण्याच्या मान्यतेच्या प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करावा. तथापी आरोग्य केंद्र व इंदिरा गांधी हॉस्पीटल येथील वैद्यकिय अधिकारी ३, नर्स १२, फार्मासिस्ट ३ यांचे नियुक्तीस ही सभा मंजूरी देत आहे. व त्यांचे नियुक्ती आदेश देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

इंदिरा गांधी आणि राजीव गांधी हॉस्पीटलमध्ये २-३ वर्षापासून डॉक्टर, नर्सेसचे काम करतात त्यांना कायम करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. त्यामध्ये सुचना आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये जे १० इंजिनिअर भरती केलेले आहेत. त्यापैकी ३ सोडून गेलेले आहेत आणि ७ कार्यरत आहेत. तर त्या ७ इंजिनियर्सना कायम करावे अशी मी सुचना मांडत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७५, श्री. स्वप्नील सावंत (सहा. आयुक्त) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ निलंबन कायम करणेबाबत.

**प्रशांत केळुसकर :-**

श्री. स्वप्निल सावंत हे प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.०१ येथे कार्यरत होते. महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित करण्याची व नव्याने कोणतीही अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण होऊ न देण्याची जबाबदारी प्रभाग अधिकारी यांची आहे. सदर जबाबदारी सक्षमतेने पार पाडता यावी यासाठी प्रभाग अधिकारी यांना पदर्निदेशित अधिकारी म्हणून शासन राजपत्र क्रमांक मिभा/मनपा/आयुक्त/४३/२०१४ दि.१० सप्टेंबर, २०१३ नुसार घोषित करण्यांत आले आहे. अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणांस आळा न घालणारे प्रभाग अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहेत.

प्रभाग क्र.१ मधील कार्यक्षेत्रात मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे उभी राहीली असून निष्कासित करण्यात आलेली बांधकामे सुध्दा पुन्हा नव्याने उभी राहीली आहेत. श्री. स्वप्निल सावंत, प्रभाग अधिकारी यांनी आपल्या कर्तव्यात कसुर केली असून अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण यास एक प्रकारे संरक्षण दिले आहे. त्याअनुषंगाने जा.क्र.मिभामपा/सा.प्र./३५८/२०१४ दि.१०/११/२०१४ रोजी त्यांचे निलंबन केले आहे.

श्री. स्वप्निल सावंत यांचे मुळ नियुक्ती पद (सहा.आयुक्त) असून सद्यस्थितीत प्रभाग क्षेत्रिय अधिकारी, प्रभाग क्र.१ यांची नियुक्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अन्वये करण्यांत आलेली असल्याने त्यांचे निलंबन व त्यासंबंधीची कारणे आयुक्तांनी निलंबन तारखेपासून सहा महिन्याच्या मुदतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ब) अन्वये महासभेत कळविणे बंधनकारक आहे. श्री. स्वप्निल सावंत यांना निलंबित करून ५ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने व महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग २ च्या अधिकाऱ्यांची कमतरता असल्याने श्री. स्वप्निल सावंत (सहा.आयुक्त) यांना प्रशासनाने त्वरीत कामावर घेवुन त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करावी.

२. प्रभाग समिती क्र. १ येथे कार्यरत असलेले दिलीप भगवान जगदाळे, प्रभाग अधिकारी (वर्ग २) यांनी गार्डन कोर्ट सत्संग मार्ग या इमारतीच्या रेफ्यूजी क्षेत्रात झालेले अतिक्रमण काढण्यास विलंब लावुन कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा व कसूर केलेला आहे. तसेच याबाबतची माहिती अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीस कळवून सदर अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीस मा. न्यायालयाकडून स्थगिती आदेश अवगत करण्यास सहकार्य केलेले आहे. याकरीता दिलीप भगवान जगदाळे, प्रभाग अधिकारी (वर्ग २) यांना मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील कलम ५६ प्रमाणे निलंबीत करीत आहोत.

३. तसेच प्रशासनामार्फत प्रतिनियुक्तीवर आलेले उपायुक्त श्री. दिपक कुरळेकर यांच्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

क्रमाशः १. जाहीरात विभागातील जाहीरातींचे दरवाढ न केल्याने तसेच जाहीरात विभागाची मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. बाजार वसुली लिलाव निविदांची पुर्तता वेळेत न केल्यामुळे मिरा-भाईंदर शहरात बाजार वसुली पुर्णपणे विस्कळीत झालेली असुन मनपाच्या कर्मचाऱ्यांमार्फत तोटयामध्ये वसुली करण्यात येत आहे. या सर्व आर्थिक नुकसानास पूर्णतः दिपक कुरळेकर जबाबदार आहेत.

३. वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये कुठल्याही प्रकारची व कोणाचीही परवानगी न घेता स्वताःच्या निर्णयाने अवास्तव खर्च करण्यात आला. अशाप्रकारे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान श्री. दिपक कुरळेकर यांनी जाणूनबुजून केलेले आहे.

४. दिपक कुरळेकर हे वारंवार कामात कसूर करण्यासाठी काही ना काही कारणाने आजारी असल्याचे सांगून रजेवर राहतात. परंतु रजेच्या कालावधीत नगरभवन येथील वृक्ष प्राधिकरणाच्या कार्यालयात वैयक्तीक फायद्यासाठी हजर असल्याचे दिसुन आलेले आहे. त्यामुळे अशा बेजबाबदार अधिकाऱ्यास देखील आपल्या महानगरपालिकेतुन कार्यमुक्त करून चौकशी लावण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**राकेश शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम ह्याठिकाणी सन्मा. सदस्य प्रशांत केळुसकर ह्यांनी जो विषय मांडलेला आहे. स्वप्नील सावंत ह्यांच्या निलंबनाविषयी त्यासोबत उपायुक्त कुरळेकर ह्यांची चौकशी लावून हा संपूर्ण विषय प्रशासनाचा आहे. ह्या संदर्भात मा. आयुक्तांनी निर्णय घ्यायचा असतो. आणि सभागृहाला अवगत करायचे असते. सन्मा. आयुक्त प्रशासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यांना निलंबित केलेले आहे. ते माहितीसाठी ह्या ठिकाणी सादर केलेले आहे. प्रशांत केळुसकर ह्यांची ही पहिली टर्म आहे पण ह्या पूर्वीचा इतिहास असा आहे अधिकाऱ्याच्या निलंबना संदर्भात त्यांना पाठीशी घालायचे की नाही घालायचे त्या संदर्भात ह्या पूर्वीच्या महासभेत विषय आला होता. संपूर्ण राज्य शासनाने ह्या संदर्भात सर्व सदस्यांना दोषी धरले होते. संपूर्ण सभागृह नगरसेवक पण निलंबन, नगरपरिषद बरखास्त करण्यात आली होती. तर अशा प्रकारचे ठराव येत असताना आमचे असे म्हणणे आहे हा संपूर्ण विषय प्रशासनाचा आहे. सन्मा. आयुक्तांनी ह्या संदर्भात योग्य तो निर्णय घ्यायला पाहिजे. अशा प्रकारे ठराव करण्याची पध्दती चूकीची आहे. कायद्याला धरुन नाही असे आमचे स्पष्ट मत आहे. कृपया मा. आयुक्तांनी खुलासा करावा त्यानंतर सन्मा. नगरसेवक, सभागृह ठरवेल त्याप्रमाणे निर्णय होईल.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, जब सन्मा. सदस्य बोलते है की यह विषय किसका है। चुकीचा विषय आहे यह बोलने के पहले सोच लेना चाहिए। उसपे गुन्हा दाखल करने का गुन्हा दाखल करने के बाद पोलिस ही डिसीजन ले सकती है। वो अधिकार पोलिस का है तो यह बोलना की किसी का आयुक्त का प्रशासन का हम यहा चर्चा करने बैठे है। हमने प्रस्ताव रखा है यह प्रस्ताव कायम करेंगे लेकिन यह बोलना की चर्चा कौन करे किसका विषय है, किसका विषय नही यह हमें मत समझाइए।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हमने आयुक्त को बोला है आपको किधर समझाया है।

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य राजेंद्र जैन ह्यांनी आता सांगितले आम्ही मा. महापौरांना उद्देशून बोलतो. सभागृहात ज्या गोष्टी सांगायच्या आहेत त्या मा. महापौरांना उद्देशून सांगतो. त्यांनी ह्या प्रमाणे खुलासा करायला पाहिजे. मागे बोलताना त्यांनी आमच्या संदर्भात एक शायरी सांगितली होती. आम्ही त्यांना उत्तर ह्या संदर्भात देतो. कही पे निगाहे कही पे निशाना जिने दो जालीम बनाओ दिवाना. म्हणजे तुमचे काम कोणते आहे आणि करता काय. विषयामध्ये विषय घूसवायचे आणि ही परंपरा मा. महापौर आणि मा. आयुक्त योग्य नाही. सभागृहाला समजून द्यायची जबाबदारी मा. आयुक्तांची आहे. मा. आयुक्तांनी कायदेशीर नियमाप्रमाणे खुलासा करावा.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेखनी जी निलंबना संदर्भात माहिती दिली त्यानंतर त्यांनी शायरी सांगितली कही पे निगाहे कही पे निशाना खर म्हणजे ते त्यांच्या बद्दलच बोलतात. त्यांची अडचण आहे पूर्ण बोलता येत नाही. म्हणून त्यांचे मत आहे कुठे निगाहे किधर निशाना. मा. महापौर मॅडम हा जो स्वप्नील सावंत साहेबांचा विषय आहे त्याला सभागृह निलंबन करत नाही. मा. आयुक्त महोदयांनीच केलेले आहे आणि ६ महिन्यांपेक्षा जास्त निलंबन कायम करता येत नाही त्यानंतर कायम करायचे असेल तर महासभेचा तो अधिकार आहे. तो विषय महासभेपूढे दिलेला आहे पण देताना मध्ये त्रूट्या राहील्या की त्याचा चौकशी अहवालच दिलेला नाही. मग मधल्या काळात आपण चौकशी करुन ते अंतिम निर्णय म्हणजे प्रायमरी स्टेजवर आपण निलंबन करतो. प्राथमिकता त्यानंतर चौकशी करुन पूर्ण अहवाल आम्हाला द्यायला पाहिजे की ह्याचा अंतिम निर्णय घ्या ते प्रशासनाकडून राहीले आहे. म्हणून आम्ही सांगितले की स्वप्नील सावंतची प्रोसेस आहे ती पूर्ण करा ती प्रोसेस पूर्ण केली नाही तर ते निलंबन पूढे राहणारच नाही. आम्ही त्याला पाठीशी घालत नाही हा मा. आयुक्तांकडून विषय आलेला आहे ती प्रोसेस पूर्ण करा आपले काय मत आहे तो दोषी आढळतो नाही आढळतो त्यावर आपण निर्णय घ्यावा. राहीला प्रश्न जगदाळे साहेबांचा उपायुक्त त्याला विटनेस आहेत सभागृहात आयुक्तांसमोर माफी मागितली एक रेफ्यूजी फ्लोर एक सोसायटी गेली ६ वर्षे कोर्टात केस भांडते. एक वर्षा अगोदर त्याचा निर्णय झाला की तुम्ही ड्यू प्रोसेस ऑफ लॉ करा त्याचा ड्यू प्रोसेस ऑफ लॉ केला गेला सोसायटीने कोर्टात लाखो रुपये खर्च केला कारण रेफ्यूजी फ्लोर बिल्डरनी विकून टाकलेला त्याला फायर एन ओसी रिनिव्हल होत नाही आपलेच अधिकारी सांगतात फायर एन ओसी रिनिव्हल नही हुवा तो आपका

रेफ्यूजी फ्लोर एक कोजेस. एका बाजूला सोसायटीला एन ओसी रिनिव्हल करत नाही रेफ्यूजी फ्लोर काढत नाही. आपल्या अधिका-यांनी वेळोवेळी कारवाई केली नाही. त्यामुळे तो रेफ्यूजी बंदीस्त झाला आणि त्यामध्ये फ्लॅट बांधला गेला हे ३-४ वर्ष कोर्टाकडून निर्णय आणला आणि जगदाळे साहेबांनी अक्षरशः मैं अभी पोहोच रहा हूँ, एक घंटे में पोहोच रहा हूँ। असे करत-करत ८ दिवस काढले आम्ही त्यांना सांगितले की तुम्ही स्टेसाठी मुद्दामहून करता शेवटी त्यांनी काय केले एक सोसायटीकडे ताब्यात होता एक बिल्डरकडे होता त्यांनी जाऊन सोसायटीचे तोडून आला बोला अरे वो किसने तोडने बोला साहेब त्यात कोणी राहत नाही पूर्ण घर खाली आहे. खाली एक बाई होती कमीत कमी एक दरवाजा तरी काढा आणि बोलतो मी संध्याकाळी जातो. संध्याकाळी बोलतो सकाळी जातो असे त्यांनी ८ दिवस काढले. उपायुक्त साहेब तुम्ही आयुक्त दालनात होते त्यांनी हे कबूल केले की माझी चूक झाली. म्हणजे मुद्दामहून परत तो बिल्डर कोर्टात गेला आणि स्टे आणला त्याला फायर एन.ओ.सी. देणार नाही उद्या काय गडबड झाली आग लागली त्याला जबाबदार कोण? हे मुद्दाम केले म्हणून ही शिक्षा आम्ही दिली. त्याच्यावर मा. आयुक्तांनी चौकशी करावी. शेवटी आम्ही घेतले तरी तो अधिकार मा. आयुक्तांचा आहे. मा. आयुक्तांनी पूर्ण तपासणी करावी माझ्या माहितीप्रमाणे आपण त्याला शोकस नोटिस सुध्दा दिलेला आहे. ह्या बाबतीत त्यांनी खुलासा त्यांनी केला की नाही केला आम्हाला माहित नाही. तो निर्णय घेणे गरजेचे होते. आपण घेतला नाही. दिपक कुरळेकर साहेब हे सभागृह ह्या शहराच्या विकासासाठी येथे येतो. दिपक कुरळेकर महानगरपालिकेचे किती कोटीमध्ये नुकसान केले. १ ऑगस्टपासून ह्या शहरात जाहिरातीचे नविन दर लागू केले गेले. आज ८ महिने झाले त्याचे इम्पलमेन्ट झाले नाही त्यामध्ये महानगरपालिकेचा कमीत कमी ५० लाख रेव्हेन्यू बाकी आहे. त्यांनी उद्या नाही भरला तर? एक वर्षापासून ९० होर्डिंग्जचे जाहिरात प्रलंबित आहे ती काढली गेली नाही. ह्या ठरावात एक मुद्दा आला नाही पार्किंगचे २० लाखाचे टेंडर आहे. गेल्या दोन वर्षापासून मुदतवाढ चाललेले आहे. त्याच्याकडे ६५ लाख म्हणजे नविन रेट आपल्याला ६५ लाख त्यांच्या निविदा त्यांच्या कपाटात आहे. मी उपायुक्तांना सांगेन तुम्ही तरी उघडा. सहा महिन्या अगोदर ६५ लाखाची नविन निविदा आली आहे ती अजून कपाटात ठेवली आहे. आणि २० लाखामध्ये मूदत वाढ चालली आहे. महिन्याला किती नुकसान झाले. ६ महिन्यामध्ये ३० लाख त्यांनी नुकसान केले. वृक्ष प्राधिकरणमध्ये त्यांनी ५० लाखाचे ह्या सभेत बिल दिले. रोडचे सुशोभिकरण करणे माझ्याकडे मुख्यमंत्री येणार होते तेव्हा लॉन तयार करायचे होते मी ९ रु. फुटने लॉन आणले त्यांनी आम्हाला रेट दिला ६५ रु. रस्त्यावरची छोटी छोटी झाड, २००-३०० रु. आहेत. त्यांनी आम्हाला रेट दिला १२००-१४०० रु. असा रेट दिला. त्याला कुठलीही पूर्वमान्यता नाही. टेंडर मान्यता नाही करुन टाका खर्च किती मोठे नुकसान त्यांनी केलेले आहे. जाहिरातमध्ये नुकसान पार्किंगमध्ये नुकसान फेरिवाल्यांचे काय हाल झाले. फेरिवाल्यांची १० ते २० लाख वसूली आहे. ह्या व्यक्तिने वेळेवर निविदा प्रोसेस केली नाही म्हणून २० लाख डेली डूबतात. दोन करोडच्या निविदेमध्ये १ करोड २४ लाख ठेकेदाराचे बाकी त्यावेळी झोपत होते का? ठेकेदारानी पैसे द्यायला हात वर केले. देशमुख साहेबांनी दाबून-दाबून आपण पण त्यावेळी निर्णय घेतला शेवटी बोलले पी.डीसी. चेक दे महापालिका अभी नही तो बाद का चेक तो दे। देशमुख साहेबांचे म्हणणे चेक रिटर्न जातो तर घर विकू १ कोटी २४ लाख २ करोडच्या टेंडरमध्ये बाकी. उद्या पैसे नाही आले तर त्याला जबाबदार कोण? महानगरपालिकेकडे वसूलीसाठी यंत्रणा नाही. आज नविन टेंडर काढणार प्रोसेस करणार अजून १५-२० दिवस जाणार. २० लाख रुपये नुकसान. आसिफ शेखजी आमचे अधिका-याबद्दल वेगळे मत नाही पण महानगरपालिकेनी किती खपवून घ्यायचे. ६-६ महिने टेंडरची कॉपी कपाटात ठेवण्याचे कारण काय? त्यांनी स्टँडिंगपुढे सादर करायचे मान्य किंवा अमान्य ह्या सगळ्या चुका दिपक कुरळेकरनी केल्या आहेत. आज ५ दिवसापासून ते फोन बंद करुन बसले आहेत ते ह्यासाठी की नयना वसाणी मॅडमनी बूथ संदर्भात आपल्याकडे बूथच्या परवानग्या बंद आहेत आम्हाला बोरसे जे अधिकारी आहेत ते विचारतात बूथ लागला कसा तर परवानगी दिली. बंद आहेत तर परवानगी आली कशी एक वर्षा अगोदर आपल्याकडे पाच वर्षापासून बंद आहेत. ह्याच्याकडे परवानग्या आहेत. आम्हाला आश्चर्य वाटले नयना वसाणींना बोरसे साहेबांना आश्चर्य वाटले. परवानगी आली कशी त्याला जवाब नाही म्हणून त्यांनी सांगितले मी आजारी आहे आणि पाच दिवसापासून तो कोणाच्याही संपर्कात नाही. एक उपायुक्त दर्जाचे व्यक्ती महानगरपालिकेचा वा-यावर सोडून निघून जातो त्याचे कर्तव्य नाही का? आपल्याकडे सुट्टी घ्यायची रजा मागायची. आज सकाळी मला मॅसेज पाठवतो साहेब मी आजारी आहे मला सांभाळून घ्या. पूर्ण शहराला त्यांनी आजारी केले. अशा व्यक्तिला आयुक्त महोदय आम्ही कार्यमुक्त करण्याचा निर्णय घेतला आमचा अधिकार नसला तरी सभागृहाची भावना आहे. आणि ह्या शहराचे आर्थिक नुकसान केले आहे. ह्या अनुषंगाने कार्यमुक्त करुन चालणार नाही. ह्यासाठी ते जबाबदार आहेत. कायद्यात जी काही तरतूद असेल त्या कायद्याप्रमाणे त्याच्यावर कारवाई व्हावी अशी सभागृहाची विनंती आहे. मा. महापौर मॅडम आम्ही पूर्ण अभ्यास करुन निर्णय दिलेला आहे. मा. आयुक्त ह्याचे पालन करावे ही विनंती.

**भगवती शर्मा :-**

आपने कहाँ दिपक कुरळेकर को कार्यमुक्त कर रहे हो अच्छी बात है। जो भी व्यक्ति दोषी है जो महानगरपालिका का आर्थिक नुकसान करता है इस शहर का भला नही करता आप सबका करीए। एक नही अनेक है उनको भी लिजीए। रही बात दिपक कुरळेकर की आपने बोला उसने आर्थिक नुकसान किया उसे मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब उनसे वसूल किया जाना चाहिए। इन्होंने डिमांड किया ९० होर्डिंग्ज के बारे में उस ९० होर्डिंग्ज के बारे में तत्कालीन आयुक्त साहब को कुरळेकर को निवेदन दिया था उस समय

के आमदार गिल्बर्ट मेंन्डोंसा भी निवेदन दिया था की जीस व्यक्ती की टर्म खत्म हो चुकी है वो व्यक्ती नही जा रहा है। तो वो अवैध होर्डिंग्ज को तत्काल काट दिया जाए। अन्यथा उसके उपर के अंदर में किसी भी व्यक्ति द्वारा उसका दुरुपयोग नहीं होना चाहिए होता है तो उसके उपर केस दर्ज किया जाना चाहिए। जो आर्थिक नुकसान होता है वह वसूल किया जाना चाहिए। मा. महापौर आपके निर्देश में बताना चाहता हूँ उन ९० होर्डिंग्ज के उपर में पिछले कुछ दिनो के अंदर में कुछ व्यक्तियों द्वारा अवैध होर्डिंग्ज लगाई गई थी। उसकी भी तक्रार दिपक कुरळेकर साहब को की गई थी। मैं ठराव के अंदर में सुचना करना चाहता हूँ की उस समय के अंदर में जो-जो चिजों का दुरुपयोग किया था, और कुरळेकर साहब ने उसकी फोटो भी निकाली थी, प्रभाग अधिकारी को जाके कम्पलेंट करने को भी कहाँ था। जो-जो व्यक्ति ने दुरुपयोग किया, उन व्यक्ती से जुर्माना वसूल किया जाए। कुरळेकर साहब को आजही मुक्त कर दो।

**प्रेमनाथ पाटील :-**

जगदाळे साहेबांबद्दल ३/०२/१५ ला पत्र दिलेले की मौजे राई १९१/1 सर्व्हे मध्ये अतिक्रमण बांधकाम झालेले आहे. त्या जागा मालकाला थातूर-मातूर उत्तर देऊन पळवत होते. तेव्हा मी स्वतः त्यांच्याकडे गेलो. गेल्यानंतर मला सांगतात मी बघून घेतो. नंतर काय ती कारवाई करतो. सेम डे ज्यांनी इलिगल बांधकाम केले ती व्यक्ती १०.०० वाजता माझ्या घरी आली. काय काम आहे तर मला जगदाळे साहेबांनी पाठवले आहे. कशाबद्दल ते आमच इललिगल बांधकाम आहे त्याची तुम्ही तक्रार केली म्हणून. ठीक आहे मी महानगरपालिकेत माझे पत्र दाखवावे. ज्या व्यक्तीने ७/१२ दिला आहे जागेचा नकाशा दिला त्या व्यक्तिने तक्रार केली आहे. मी फक्त त्याच्या बरोबर गेलो की ही कारवाई का करत नाही. ते त्यांच्या घरी बघून आले की इलिगल आहे आणि प्रेमनाथ पाटीलची तक्रार आहे म्हणून माझ्या घरी पाठवले. हे कितपत योग्य आहे. मा. आयुक्त साहेब कारवाई होणार का त्याचा खुलासा करा.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, सदर ठरावाच्या अनुषंगाने आलेले मुद्दे तीन आहेत एक म्हणजे स्वप्नील सावंत ह्यांचे निलंबन रद्द करुन कामावर घेणे. प्रभाग अधिकारी जगदाळे ह्यांना निलंबीत करणे आणि तिसरा विषय दिपक कुरळेकर ह्यांना कार्यमुक्त करुन त्याच्या विविध विषयावर चौकशी लावणे. ह्या तिन्ही विषयावर प्रशासनाची भुमिका अशी आहे. स्वप्नील सावंत हे महानगरपालिकेचे कलम ४५ अन्वये नियुक्त केलेले अधिकारी आहे. त्यांना निलंबन करण्याचा पूर्ण अधिकार मा. आयुक्तांना आहे. मा. आयुक्तांनी केलेल्या कारवाईला सहा महिन्यांच्या आत जर मा. महासभेने मान्यता दिली नाही तर ते निलंबन आपोआप रद्द होते. निलंबन कायम करण्यासाठी मा. महासभेसमोर आज सादर करण्यात आला होता. महासभेने जे काही निर्णय घेतलेला की त्यांचे निलंबन रद्द करुन परत कामावर घेण्याचा हा सर्वस्वी अधिकार महासभेचा असल्यामुळे त्याला निलंबन रद्द करुन कामावर घेण्यास प्रशासनाची हरकत नाही. ह्या मधला दुसरा विषय आहे त्याच्या चौकशी अहवालाबद्दल त्यातला फोर्थ पार्ट असा आहे की चौकशी बाबतचा पुन्हा कलम ४५ चे अधिकारी ह्याचे नियुक्ती प्राधिकारी महासभा असल्यामुळे त्यांचा चौकशी अहवाल सुध्दा अंतिम शास्तीसाठी महासभेपूढेच येणार आहे. त्यांची चौकशी प्रक्रिया सुरु आहे चौकशीचे चार्जशीट दिलेले आहे. परंतु चौकशी अहवाल पूर्ण झालेला नाही हा अहवाल पूर्ण झाल्यानंतर उचित शास्ती देण्यासाठी सुध्दा महासभेसमोर हा प्रस्ताव पाठवला जाईल. दुसरा पार्ट आहे जगदाळे ह्यांना निलंबीत करण्याचा ह्याबद्दल प्रशासनाची भुमिका किंवा प्रशासनाने कर्तव्य अधिकार असा आहे की एखाद्या अधिकारी कर्मचा-यावर काय आरोप झाले तर चौकशी निश्चित व्हायला पाहिजे परंतु निलंबीत करुन चौकशी करायची की चौकशी करुन निलंबीत करायचे हे सर्वस्वी मा. आयुक्तांनी ठरवायचे आहे. सदर प्रकरणी जे काही दोषारोप श्री. जगदाळे ह्याच्यावर सन्मा. सदस्यांनी सभागृहात केले आहेत त्याच्या अनुषंगाने त्याची चौकशी करुन मा. आयुक्त महोदय त्याच्यावर उचित निर्णय घेतील. तिसरा विषय दिपक कुरळेकर त्यांना कार्यमुक्त करण्याचा दिपक कुरळेकर हे शसनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी आहेत. त्यामुळे महासभेत झालेला ठराव त्याच्यावरील दोषारोप हा सगळा पत्रव्यवहार अति तातडीने शासनाच्या निर्दशनास आणून पूढची कारवाई करण्यात येईल.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, ह्याच विषयाला धरुन माझा विषय आहे. मा. आयुक्त महोदय आपण नव्हता त्यावेळेस कृष्णा मोहिते हे अतिक्रमण विभागाचे प्रमुख होते. त्यांचे शिक्षण तेवढ नव्हते, पदवी नव्हती तरी आपल्या महानगरपालिकेमध्ये अधिका-याची कमी असल्यामुळे त्यांना ठेवल असे म्हटले गेले होते. आम्ही सत्ताधा-यामध्ये होतो आमच्या महापौर होत्या कॅटलीन परेरा आम्ही बरेचदा सांगितले की ह्यांना निलंबित करा. माझी सुचना घ्या कृष्णा मोहिते ह्यांना निलंबीत करा असे पेपर मी महानगरपालिकेला दिले आहेत. उपायुक्त साहेब आपल्याकडे पेपर आले आहेत. ठराव झाला तो ठीक आहे.

**वंदना चक्रे :-**

मी पत्र टाकलेले आहे त्या पत्राची चौकशी करा. मला न्याय मिळवून द्या. अशी माझी मागणी आहे. आणि ही माझी सुचना आहे. मी काय-काय पत्र टाकली आहेत त्याची जाच करा. माझी सुचना घ्या आणि मला उत्तर पण द्या.

**लियाकत शेख :-**

आत्ताच मा. उपमहापौरांनी सांगितले की कलम ४५ अन्वये कमिशनर साहेब नियुक्ती करतील. कलम ५६ (२) अन्वये निलंबनाची कारवाई कमिशनर करतील. असा खुलासा केलेला आहे ह्या ६ महिन्याच्या मुदतीत

ती कारवाई महासभेच्या समोर आली पाहिजे नाहीतर ते निलंबन आपोआप रद्द होते. माझ्या माहितीप्रमाणे सुनिल यादव प्रभाग अधिकारी होते. त्यांचे निलंबन होऊन सव्वा वर्ष झालेले आहे. त्याच्यावर ५६ (२) अन्वये कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यांचे निलंबन आपोआपच रद्द झालेले आहे. त्यांनाही तुम्ही कामावर समावेश करुन घ्यावा. असे आणखी कोणी असतील त्यांनाही कामावर सामावून घेण्यात यावे. जर ते महासभेसमोर आलेच नाहीत त्याची कारवाई ५६ (२) खाली पूर्ण करण्यात आली नाही. तर आपोआप त्यांचे निलंबन रद्द झालेले आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सुनिल यादव ह्याच्याबद्दल जी सुचना आली आहे. ह्या सुचनेबद्दल मी खुलासा करु इच्छितो.

**वंदना चक्रे :-**

साहेब मी माझा शब्द मागे घेते ह्याच्यावर पण निलंबनाची कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

**मा. आयुक्त :-**

मॅडम आपले ऐकून घेतले आहे. प्रशासनाचा खुलासा ऐकून घ्या ही आपल्याला विनंती आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सुनिल यादव हे अॅन्टी करप्शन द्वारे टॅप झालेल्या आणि त्याद्वारे निलंबन झालेल्या कर्मचाऱ्यांपैकी आहेत.

**मा. आयुक्त :-**

कर्मचाऱ्यांचे प्रकरण काय आहे ते समजून घ्या. सभागृहाला माहिती देण्याचे कर्तव्य प्रशासनाचे आहे आणि आपल्या प्रश्नाचे उत्तर देतात.

**प्रमोद सामंत :-**

मा. आयुक्त साहेब ७१ नंबर विषयाची माहिती द्यायची. प्रशासनाचे आम्ही ऐकतो.

**मा. आयुक्त :-**

४-४ नगरसेवक एकत्र बोलतील तर सर्वांचे ऐकून घेतल्यावर उत्तर देणार.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम, सगळ्या प्रश्नाचे प्रशासन एकत्र उत्तर देतील. आमचे पण काही प्रश्न आहेत. आता जो विषय क्र. ७५ आला आहे श्री. स्वप्नील सावंत (सहा. आयुक्त) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ निलंबन कायम करणेबाबत ह्या विषयानुसार तो विषय त्यांच्यापूर्ती मर्यादित होतो नंतरचा विषय त्यांनी कनेक्टिव्हिटी देऊन जगदाळेचे निलंबन केले. आमचे असे म्हणणे आहे असे कितीतरी अकार्यक्षम प्रभाग अधिकारी आहेत. शिरवळकर साहेब त्यांचे का निलंबन नको. आता त्या म्हणाल्या मोहितेचे आहे. मग जे अकार्यक्षम अधिकारी आहेत त्यांना कसे घ्यायचे ६ महिन्यात मा. महासभेनी ठराव केला नाही असे लियाकत शेख म्हणाले तर त्याचे निलंबन आपोआप कायम होते. परंतु त्यांनी सांगितले की ते अॅन्टी करप्शनमध्ये पकडल्यामुळे त्यांची केस पेंडींग आहे. कदाचित तो विषय वेगळा असू शकतो. पण काही जे अकार्यक्षम अधिकारी आहेत शिरवळकर म्हणून ते फूल इंडस्ट्री इस्टेट खालचे गाळे तसेच ठेवले डेन्जर कंस्ट्रक्शन म्हणून तुम्ही १९५ ची नोटिस देता ती तुम्ही खालची ठेवता वरची पाडता हा नियम कुठला? त्या अधिकाऱ्याला आम्ही पत्र दिले आहे त्याच्यावर देखील कारवाई करावी अशी मी सुचना मांडतो.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, ज्या विषयावर एवढा उहापोह चालू आहे चर्चा चालू आहे. तो विषय आहे अतिक्रमण आणि अतिक्रमणाला सहकार्य करणारे अधिकारी आणि त्याचे निलंबन. पण मेन विषयच राहतो. एवढे सगळे ह्या पूर्वीच्या महासभेत देखील अतिक्रमण ह्या विषयावर बरीच चर्चा झाली बरेच त्याच्यावर वादविवाद आणि प्रत्येकाने आपले विषय मांडले. पण त्यानंतर अतिक्रमण हा भाग थांबला का? प्रत्येक प्रभागात मोठमोठ्या प्रमाणात अतिक्रमण चालू आहे. विषय जरी अतिक्रमणाचा नसला तरी त्याला धरुनच निलंबनाचा विषय आहे. जर तेच झाले नाही पूढे निलंबनाचा विषयच येणार नाही. एवढा मोठा विषय झाल्यानंतर अजूनही प्रत्येक प्रभागामध्ये मोठ-मोठ्या चाळी बांधल्या जातात. त्यावर अधिकाऱ्याचा अंकुश नाही का? मग ते का परत त्याचे प्रस्तावित करायचे. त्यांना जागा कुठून देणार. एवढी वर्ष लोक इकडे तिकडे फिरतात त्याच्या अजून प्रस्तावित करता येत नाही त्यांना जागा देता येत नाही आहे त्यानंतर अजूनही मोठमोठ्या चाळी बांधल्या जातात असे ह्या महानगरपालिकेचे दुर्दैव आहे की वेळोवेळी हे विषय घेऊन देखील राजरोसपणे ही बांधकाम चालू आहे. मग प्रत्येक अधिकाऱ्यांना निलंबीत करणार का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, सुनिल यादव ह्यांच्या बद्दल चर्चा झाली. सुनिल यादव हे कलम ४५ अन्वये नियुक्त केलेले कर्मचारी अधिकारी नाहीत त्यामुळे त्यांचा प्रस्ताव महासभेसमोर निलंबन कायम करण्यासाठी सादर करण्यात आलेला नाही. ही पहिला बाब. ह्यामधला दुसरा पार्ट असा आहे की हे ज्या गुन्ह्याखाली निलंबीत झालेले आहेत तो म्हणजे लाचलूचपत प्रतिबंधक कायद्यान्वये नोंदविलेला गुन्हा आहे. अशा कायद्यान्वये गुन्हा दाखल झाल्यानंतर निलंबन अनुशंगीक बाब आहे. आणि निलंबीत झालेल्या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यासाठी शासनाने एक प्रक्रिया करण्याचा निर्देश दिलेले आहे. त्या निर्देशानुसार निलंबन आढावा समिती केवळ अॅन्टी करप्शन मधील केसेस रिव्ह्यू करण्यासाठी नियुक्त झालेले आहे. त्या शासन निर्णयानुसार

निलंबन झाल्यापासून दोन वर्षांच्या आत जर न्यायालयामध्ये दोषारोप पत्र दाखल झाले नसेल तर जाणीवपूर्वक समितीने निर्णय घ्यावयाचा आहे ही प्रक्रिया अजून पूर्ण झालेली नाही त्यामुळे त्याच्या निलंबनाबद्दल समितीने निर्णय घेतलेला नाही. दरम्यानच्या काळात जून महिन्यात निलंबन आढावा समितीने ह्याचे निलंबन चालू ठेवावे अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रश्नाला उत्तर ह्याच्यापूढे सर्व अधिका-यांना अशीच कारवाई होणार का?

**मा. महापौर :-**

ह्यासंबंधी आपला प्रश्न नाहीच आहे आपला प्रश्न स्वप्निल सावंत आणि जगदाळे ह्यांनी जे केले आहे त्याचा आहे.

**सुहास रकवी :-**

मॅडम ह्याच्यात जगदाळेंचा विषयच नाही.

(सभागृहात गोंधळ)

**सुहास रकवी :-**

मग आम्ही इतर विषयाची सुचना देतो ना.

**प्रमोद सामंत :-**

मॅडम १५/११ च्या महासभेत मी वेगवेगळे १७ पॉईंट दिलेले मग त्या १७ डिपार्टमेंट लोकांना तुम्ही निलंबीत करणार का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, मी श्री. जगदाळेच्या केसमध्ये जाणीवपूर्वक शब्द वापरलेला आहे की, निलंबन करुन चौकशी करायची की चौकशी करुन निलंबन करायचे हे मा. आयुक्तांचे अधिकार आहेत. निलंबीत करणार नाही हे मी बोललेलो नाही.

**प्रमोद सामंत :-**

मा. आयुक्तांनी सांगावे.

**मा. आयुक्त :-**

माझ्या वतीने गणेश देशमुख साहेबांनी खुलासा केला तो माझाच खुलासा आहे.

**निलम ढवण :-**

साहेब मी अतिक्रमणबद्दल बोलले होते की त्याच्यावर फक्त खुलासा करा. बाकीच्या विषया................

**मा. आयुक्त :-**

अतिक्रमणाचा विषयच नाही.

**निलम ढवण :-**

विषय नाही. विषय त्याला संबंधित आहे. हे सगळे त्याच्यामुळेच झाले आहे ना. मग ही अतिक्रमण का चालू आहेत. अतिक्रमण बंद करा नाहीतर प्रत्येकावर कारवाई करायला लागेल.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, ह्या ठिकाणी सन्मा. सदस्य निलम ढवण ताई ह्यांनी जो विषय मांडलेला आहे तो अत्यंत योग्य असा विषय आहे. संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये ६ प्रभाग आहेत त्या ६ प्रभागात अनधिकृत बांधकामाचा सूळसूळाट आहे आणि ह्या सभागृहाची अत्यंत तीव्र भावना आहे अनधिकृत बांधकाम नकोच असायला पाहिजे. अशा अधिका-यांना पाठीशी घालू नका. परंतु दुर्देव तसे होत नाही. अनधिकृत बांधकाम होत आहेत प्रभाग अधिकारी त्याला जबाबदार आहेत त्यांना जाणून बूजून नोटिस देतात. कोर्टात जायला मूभा देतात. कारवाई करतच नाही. माझे स्पष्ट म्हणणे आहे ना रहेगा बाज ना बजेगी बासूरी. आजच्या महासभेत निर्णय घ्या. अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आहे तो बंद करुन टाका. म्हणजे सगळ्यांना मूभा देऊन टाका. तुम्ही बिनधास्त अनधिकृत बांधकाम करा आम्ही काही कारवाई करणार नाही. आपल्याकडे अशीच पध्दत आहे. अधिकारी काय करतात अनधिकृत बांधकामाला संरक्षण देतात त्यांना टॅक्स लावतात. त्यांना विजेचे कनेक्शन देतात आणि राजरोज अनधिकृत बांधकाम वाढत जाते. कोणाचा अंकुश नाही. आम्ही कित्येक वेळा महासभेत बोलत असतो.

**मा. महापौर :-**

आसिफ शेख साहेब मी विनंती करते की टॉपीकला धरुन बोला नाहीतर बसून घ्या.

**निलम ढवण :-**

अतिक्रमणकडे का दुर्लक्ष आहे हे मला विचारायचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

माझी मागणी आहे की अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग बंद करावा आणि तिकडचा कर्मचारी वर्ग नगररचना विभागात देऊन टाका.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम, कारवाई करावयाची तर सगळ्यांवर करावी.

**आसिफ शेख :-**

आमचे असे स्पष्ट म्हणणे आहे अनधिकृत बांधकाम व्हायलाच नाही पाहिजे. त्यांना पाठीशी नाही घातले पाहिजे. त्या विभागामध्ये एवढे अधिकारी आहोत त्यांना लाखो रुपये पगार देतो. कारवाई होत नसेल तर बंद करुन टाका ही आमची रास्त मागणी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मागणी चांगली आहे. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त महोदय ह्याच्यावर गांर्भियाने विचार करा. वारंवार अधिका-याच्या विरोधात ठराव आणणे आम्हालाही बरोबर वाटत नाही. सभागृहाने वारंवार चक्रे मॅडम असतील सावंत साहेब असतील वारंवार हे सगळे भोगावे लागते. अधिका-याने ठरवले तर व्यक्ति एक वीट सुध्दा देऊ शकत नाही. आपण त्या पध्दतीने त्याच्यावर कंट्रोल आणावे आणि डे टू डे माहिती घ्यावी. हे एकदा आपल्या कंट्रोलमध्ये आले की अशा प्रकारचे विषय येणार नाहीत सभागृहाची भावना सुध्दा एवढी तीव्र होणार नाही ह्यासाठी मा. महापौर आम्ही ठराव दिलेला आहे. सभागृहाने आमची विनंती आपल्याला दिलेली आहे. जे कोणीही अधिकारी असतील त्यांना पाठीशी घालण्याचे कारण नाही. ते दोषी असतील त्याचा मा. आयुक्तांनी निर्णय घ्यायचा. मा. आयुक्तांना अजून विनंती की मधल्या काळात सिमा मिश्रा त्यांचाही ठराव महासभेच्या पटलावर आलेला होता. महासभेने त्याला निलंबन कायम केल. त्यानंतर माहित पडले की ज्या कामात ती दोषी आढळली तो विभाग त्यांना देऊ नये असा निर्णय झाला होता आणि परत त्याच विभागाला तीची दोन वर्षांनंतर नेमणूक करण्यात आली. आपण नविन आहात आपल्याला माहित नसेल तर माझी विनंती राहील सभागृहाने घेतलेला निर्णय, सभागृहाचे काही निर्णय कायद्याप्रमाणे विसंगत असतील पण ही सर्वांची भावना आहे की ह्या सभागृहात जे अधिकारी ज्या पध्दतीने कामकाज करतात त्या पध्दतीने सभागृह आपली भावना व्यक्त करत असते. भावना लक्षात घ्या त्याबद्दल माहिती घेऊन योग्य ते निर्णय घ्या. मा. महापौर दुसरा विषय घ्यावा अशी विनंती.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम प्रशासनाला उत्तर द्यायला सांगा.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्या ठरावावर आमची सुचना आहे.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांची सुचना असेल तर आम्ही विनंती करतो की आमच्या ठरावामध्ये सुचना घ्यायचे कारण नाही. त्यांना काय सुचना मांडायची असेल ..................

**सुहास रकवी :-**

असे कसे तुमचा अधिकार आहे तर तुम्ही सांगा. एखादा अधिकारी काम करत नाही तर तुम्हाला काम करत नाही ते दिसते आणि आम्ही सांगितले तर काम करायचे नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुम्हाला सुचना मांडायची असेल तर बोला.

**ध्रवुकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता ह्यांनी ठराव मांडला. प्रभाग अधिकारी जगदाळे ह्यांना निलंबीत करा ते काम करत नाही. सन्मा. सदस्य सुहास रकवीनी सांगितले की अजित शिरवळकर पण काम करत नाही. मग त्यांची पण सुचना घ्या. ते पण ठराव मांडतात. आमचे प्रभाग अधिकारी वसंत राणे रोडवर फेरिवाले बसले आहेत ते अजिबात काम करत नाही. त्यांच्यावर पण कारवाई झाली पाहिजे.

**मा. महापौर :-**

तुम्हाला ठराव मांडायचा तर मांडा नाहीतर मी हा ठराव मंजूर करते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही ठराव मांडतो.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, मी जो विषय मांडला त्यावर प्रशासनाने फक्त उत्तर द्यावे. मला त्या विषयावर उत्तर दिले नाही.

**मा. आयुक्त :-**

सगळ्यांचे उत्तर द्यायचे की आपले एकटयाचे उत्तर द्यायचे.

**निलम ढवण :-**

नाही साहेब जेवढे विषय झाले त्याची उत्तर दिली गेली. मला अतिक्रमण विषयावर उत्तर द्या मी खाली बसते.

**सुहास रकवी :-**

मॅडम, अतिक्रमण आणि ते प्रभाग अधिकारी संबंधित आहे. ढवण मॅडम आता प्रभाग अधिकारीचा विषय काढला. अतिक्रमण पण त्यांच्या संबंधी विषय आहे, जे अधिकारी कार्यक्षम नाहीत त्यांच्यावर काय कारवाई करतात किंवा निलंबन करतात..................

**निलम ढवण :-**

जो एवढा विषय झाला त्याच्यावर प्रशासनाची भुमिका काय राहील. त्याच्यावर उत्तर पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, अतिक्रमण बाबत बरीच चर्चा झालेली आहे. मी पहिल्याच महासभेत सभागृहात सांगितले आहे की विषयांतर करुन बोलले तर आम्हाला सुध्दा कळत नाही कशाचे उत्तर काय द्यायचे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

प्रशासनानी आपल्याला विषय दिलेला आहे. विषय आपल्याला समजून सांगितला. माझ्या वतीने उपायुक्त (मु.) ह्यांनी मुद्देसूद उत्तर दिलेले आहे. ह्याकडे बारकाईने लक्ष न दिल्यामुळे उपप्रश्न आपल्या मनात निर्माण झाले असा माझा ग्रह झालेला आहे. ह्याच्यामध्ये आम्ही एकदम स्पष्ट भुमिका मांडली आहे की स्वप्निल सावंतचा निलबनाचा असा प्रस्ताव आहे. त्याच्यामध्ये ६ महिन्याच्या आत निलंबन झाले नाही तर महासभेची मान्यता लागते. सध्या त्याची चौकशी चालू आहे. त्याला चौकशीच्या अधीन राहून कामावर घेऊ शकतो असे सांगितले आहे. त्याच्यानंतर इथे सभापती महोदयांनी भावना व्यक्त केलेली आहे की जगदाळे ह्यांच्याबद्दल चौकशी करण्यात येईल असे गणेश देशमुख ह्यांनी सभागृहात सांगितले आहे. आपल्याला सभागृहात विषय मांडण्याचा कोणाला निलंबित करा कोणाला बडतर्फ करा बोलण्याचा अधिकार आहे. परंतु सदर प्रकरणाबद्दल कोणत्याही कर्मचा-याबद्दल तुम्ही जरी बोललात तरी आम्ही त्याची चौकशी करुन त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे सगळ्यांच्या प्रश्नाला एक उत्तर आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब आमचे पण हेच म्हणणे आहे आणि आम्हाला पण हेच अपेक्षित आहे.

**निलम ढवण :-**

साहेब त्याला धरुन अतिक्रमणावर काय कारवाई करणार ते सांगा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

कोणत्याही अधिका-याला किंवा कर्मचा-याला मी पाठीशी घालणार नाही. जे अधिकारी, कर्मचारी काम करणार नाहीत मी परवा उत्तनला गेलो होते. एक गरिब गृहस्थ आहे त्याची जागा बाजूच्या माणसाने खालेली आहे. असे प्रथमदर्शनी माझ्या निदर्शनास आले. म्हणून चौकशी करिता त्या संबंधीत इंजिनियरला मी निलंबीत केले आहे मला येऊन एकच महिना झालेला आहे. नंतर तुम्हीच बोलू नका साहेब जास्त निलंबीत करु नका

**निलम ढवण :-**

निलंबीत नाही अतिक्रमण होऊन देऊ नका अशी आमची मागणी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

प्रभाग समिती क्र.२ प्रभाग अधिकारी श्री. वसंत राणे हेसुध्दा आपल्या कर्तव्यात कसूर करत असून त्यांच्या प्रभागात ना फेरीवाला क्षेत्रात शेकडो फेरीवाले बसत असून महत्वांच्या रस्त्यांवर हे फेरीवाले बसलेले असल्याने रहदारीस अथडळे निर्माण होत आहे व अनधिकृत बांधकामे पण असल्याने त्यांना ही निलंबित करावे अशी सुचना मांडतो.

**सुहास रकवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव आहे की सुचना आहे.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही सांगितले की सुचना आम्ही घेत नाही सुचना घेत असाल तर आम्ही सुचना देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही पार्शलिटी करता तुम्हाला पाहिजे तो अधिकार तुम्ही सक्षम करता अनधिकृत बांधकाम करणा-या अधिका-याला पाठीशी घालता असा आमचा आरोप आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, विषय स्वप्निल सावंतचा असताना प्रशासनाने स्पष्ट गोषवारा दिलेला आहे. त्याच्यामध्ये जगदाळे, दिपक कुरळेकर ह्यांच्या निलंबनाची नावे समावेश करण्यात आली तुम्ही ठराव ठेवणार की विखंडीत करणार.

**मा. आयुक्त :-**

आम्ही तुम्हाला एकदम क्लियर खुलासा केला आहे.

**शरद पाटील :-**

ठराव देत नसतील तर दुसरा विषय घ्या.

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्त महोदय जे विषयपत्रिकेवर विषय आहेत त्याला अनुसरुनच ठराव झाले पाहिजेत. आमदार साहेब आपल्याला पण चांगली कल्पना आहे. मा. आयुक्तांनी विषय काय दिला. स्वप्निल सावंत ह्यांचे निलंबन कायम करण्यावर विषय दिलेला आहे. त्या विषयात निलंबन रद्द करा, कामावर घ्या. मोहितेना सस्पेंड करा,

हरिभाऊना सस्पेंड करा चालले काय. सगळ्या अधिका-यांना सस्पेंड केले तर कोण राहणार. आपल्याला विनंती केलेली आहे ते डिपार्टमेंट बंद करुन टाका.

**मा. महापौर :-**

मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण ७५ करिता दोन ठराव आले आहेत पहिला ठराव सुचक श्री. प्रशांत केळूसकर, अनुमोदक श्री. राकेश शहा, दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदक श्री. सुहास रकवी. अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. प्रभाग समिती क्र.२ प्रभाग अधिकारी श्री. वसंत राणे हेसुध्दा आपल्या कर्तव्यात कसूर करत असून त्यांच्या प्रभागात ना फेरीवाला क्षेत्रात शेकडो फेरीवाले बसत असून महत्वांच्या रस्त्यांवर हे फेरीवाले बसलेले असल्याने रहदारीस अथडळे निर्माण होत आहे व अनधिकृत बांधकामे पण असल्याने त्यांना ही निलंबित करावे अशी सुचना मांडतो. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. श्री. स्वप्निल सावंत हे प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.०१ येथे कार्यरत होते. महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित करण्याची व नव्याने कोणतीही अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण होऊ न देण्याची जबाबदारी प्रभाग अधिकारी यांची आहे. सदर जबाबदारी सक्षमतेने पार पाडता यावी यासाठी प्रभाग अधिकारी यांना पदर्निदेशित अधिकारी म्हणून शासन राजपत्र क्रमांक मिभा/मनपा/आयुक्त/४३/२०१४ दि.१० सप्टेंबर, २०१३ नुसार घोषित करण्यांत आले आहे. अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणांस आळा न घालणारे प्रभाग अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहेत.

प्रभाग क्र.१ मधील कार्यक्षेत्रात मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे उभी राहीली असून निष्कासित करण्यात आलेली बांधकामे सुध्दा पुन्हा नव्याने उभी राहीली आहेत. श्री. स्वप्निल सावंत, प्रभाग अधिकारी यांनी आपल्या कर्तव्यात कसुर केली असून अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण यास एक प्रकारे संरक्षण दिले आहे. त्याअनुषंगाने जा.क्र.मिभामपा/सा.प्र./३५८/२०१४ दि.१०/११/२०१४ रोजी त्यांचे निलंबन केले आहे.

श्री. स्वप्निल सावंत यांचे मुळ नियुक्ती पद (सहा.आयुक्त) असून सद्यस्थितीत प्रभाग क्षेत्रिय अधिकारी, प्रभाग क्र.१ यांची नियुक्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अन्वये करण्यांत आलेली असल्याने त्यांचे निलंबन व त्यासंबंधीची कारणे आयुक्तांनी निलंबन तारखेपासून सहा महिन्याच्या मुदतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ब) अन्वये महासभेत कळविणे बंधनकारक आहे. श्री. स्वप्निल सावंत यांना निलंबित करून ५ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने व महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग २ च्या अधिका-यांची कमतरता असल्याने श्री. स्वप्निल सावंत (सहा.आयुक्त) यांना प्रशासनाने त्वरीत कामावर घेवुन त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करावी.

२. प्रभाग समिती क्र. १ येथे कार्यरत असलेले दिलीप भगवान जगदाळे, प्रभाग अधिकारी (वर्ग २) यांनी गार्डन कोर्ट सत्संग मार्ग या इमारतीच्या रेफ्यूजी क्षेत्रात झालेले अतिक्रमण काढण्यास विलंब लावुन कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा व कसूर केलेला आहे. तसेच याबाबतची माहिती अतिक्रमण करणा-या व्यक्तीस कळवून सदर अतिक्रमण करणा-या व्यक्तीस मा. न्यायालयाकडून स्थगिती आदेश अवगत करण्यास सहकार्य केलेले आहे. याकरीता दिलीप भगवान जगदाळे, प्रभाग अधिकारी (वर्ग २) यांना मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील कलम ५६ प्रमाणे निलंबीत करीत आहोत.

३. तसेच प्रशासनामार्फत प्रतिनियुक्तीवर आलेले उपायुक्त श्री. दिपक कुरळेकर यांच्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

क्रमाशः १. जाहीरात विभागातील जाहीरातींचे दरवाढ न केल्याने तसेच जाहीरात विभागाची मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. बाजार वसुली लिलाव निविदांची पुर्तता वेळेत न केल्यामुळे मिरा-भाईंदर शहरात बाजार वसुली पुर्णपणे विस्कळीत झालेली असुन मनपाच्या कर्मचा-यांमार्फत तोटयामध्ये वसुली करण्यात येत आहे. या सर्व आर्थिक नुकसानास पूर्णतः दिपक कुरळेकर जबाबदार आहेत.

३. वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये कुठल्याही प्रकारची व कोणाचीही परवानगी न घेता स्वताःच्या निर्णयाने अवास्तव खर्च करण्यात आला. अशाप्रकारे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान श्री. दिपक कुरळेकर यांनी जाणूनबुजून केलेले आहे.

४. दिपक कुरळेकर हे वारंवार कामात कसूर करण्यासाठी काही ना काही कारणाने आजारी असल्याचे सांगून रजेवर राहतात. परंतु रजेच्या कालावधीत नगरभवन येथील वृक्ष प्राधिकरणाच्या कार्यालयात वैयक्तीक फायद्यासाठी हजर असल्याचे दिसुन आलेले आहे. त्यामुळे अशा बेजबाबदार अधिका-यास देखील आपल्या महानगरपालिकेतुन कार्यमुक्त करून चौकशी लावण्यात यावी असा ठराव मांडत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सचिव साहेब, एक मिनिट मा. महापौर महोदया कुठल्याही कर्मचारी, अधिका-याला निलंबीत करायचे किंवा नाही करायचे हा बहुमताचा विषयच नाही. तुमच्या भावना कळल्या आम्ही चौकशी करुन उचित कारवाई करु. योग्य वाटले तर निलंबीत करु नाहीतर करणार नाही.

**नगरसचिव :-**

सुचक श्री. प्रशांक केळूसकर, अनुमोदक श्री. राकेश शहा ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत, ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**आसिफ शेख :-**

सन्मा. उपायुक्तांनी सांगितले आहे की मतदानाची गरज नाही काय करणार ते प्रशासन करणार आहे. (सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

मतदानाची प्रक्रिया चालू झाली आहे.

**प्रशांत दळवी :-**

सभागृहाचा अवमान करतात.

**नगरसचिव :-**

सुचक श्री. प्रशांत केळूसकर ह्यांच्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

तटस्थ असतील त्यांनी हात वर घ्यायचे आहेत.

**मा. महापौर :-**

श्री. प्रशांत केळूसकर ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४१, विरोधात २१ तटस्थ १३ इतकी मते पडली आहेत. श्री. प्रशांत केळूसकर ह्यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यात येत आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौरांना विनंती आहे की ठराव मंजूर झालेला परंतु आयुक्त महोदय स्वतःचा ठराव शासनाला अभिप्रायासाठी पाठवा अभिप्राय घेऊनच कारवाई करा.

**प्रकरण क्र. ७५ :-**

श्री. स्वप्नील सावंत (सहा. आयुक्त) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ निलंबन कायम करणेबाबत

**ठराव क्र. ७६ :-**

श्री. स्वप्निल सावंत हे प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.०१ येथे कार्यरत होते. महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित करण्याची व नव्याने कोणतीही अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण होऊ न देण्याची जबाबदारी प्रभाग अधिकारी यांची आहे. सदर जबाबदारी सक्षमतेने पार पाडता यावी यासाठी प्रभाग अधिकारी यांना पदर्निदेशित अधिकारी म्हणून शासन राजपत्र क्रमांक मिभा/मनपा/आयुक्त/४३/२०१४ दि.१० सप्टेंबर, २०१३ नुसार घोषित करण्यांत आले आहे. अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणांस आळा न घालणारे प्रभाग अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहेत.

प्रभाग क्र.१ मधील कार्यक्षेत्रात मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे उभी राहीली असून निष्कासित करण्यात आलेली बांधकामे सुध्दा पुन्हा नव्याने उभी राहीली आहेत. श्री. स्वप्निल सावंत, प्रभाग अधिकारी यांनी आपल्या कर्तव्यात कसुर केली असून अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण यास एक प्रकारे संरक्षण दिले आहे. त्याअनुषंगाने जा.क्र.मिभामपा/सा.प्र./३५८/२०१४ दि.१०/११/२०१४ रोजी त्यांचे निलंबन केले आहे.

श्री. स्वप्निल सावंत यांचे मुळ नियुक्ती पद (सहा.आयुक्त) असून सद्यस्थितीत प्रभाग क्षेत्रिय अधिकारी, प्रभाग क्र.१ यांची नियुक्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अन्वये करण्यांत आलेली असल्याने त्यांचे निलंबन व त्यासंबंधीची कारणे आयुक्तांनी निलंबन तारखेपासून सहा महिन्याच्या मुदतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ब) अन्वये महासभेत कळविणे बंधनकारक आहे. श्री. स्वप्निल सावंत यांना निलंबित करून ५ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने व महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग २ च्या अधिका-यांची कमतरता असल्याने श्री. स्वप्निल सावंत (सहा.आयुक्त) यांना प्रशासनाने त्वरीत कामावर घेवुन त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करावी.

**२.** प्रभाग समिती क्र. १ येथे कार्यरत असलेले दिलीप भगवान जगदाळे, प्रभाग अधिकारी (वर्ग २) यांनी गार्डन कोर्ट सत्संग मार्ग या इमारतीच्या रेफ्यूजी क्षेत्रात झालेले अतिक्रमण काढण्यास विलंब लावुन कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा व कसूर केलेला आहे. तसेच याबाबतची माहिती अतिक्रमण करणा-या व्यक्तीस कळवून सदर अतिक्रमण करणा-या व्यक्तीस मा. न्यायालयाकडून स्थगिती आदेश अवगत करण्यास सहकार्य केलेले आहे. याकरीता दिलीप भगवान जगदाळे, प्रभाग अधिकारी (वर्ग २) यांना मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील कलम ५६ प्रमाणे निलंबीत करीत आहोत.

**३.** तसेच प्रशासनामार्फत प्रतिनियुक्तीवर आलेले उपायुक्त श्री. दिपक कुरळेकर यांच्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

क्रमाशः **१.** जाहीरात विभागातील जाहीरातींचे दरवाढ न केल्याने तसेच जाहीरात विभागाची मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे.

**२.** बाजार वसुली लिलाव निविदांची पुर्तता वेळेत न केल्यामुळे मिरा-भाईंदर शहरात बाजार वसुली पुर्णपणे विस्कळीत झालेली असुन मनपाच्या कर्मचाऱ्यांमार्फत तोटयामध्ये वसुली करण्यात येत आहे. या सर्व आर्थिक नुकसानास पूर्णतः दिपक कुरळेकर जबाबदार आहेत.

**३.** वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये कुठल्याही प्रकारची व कोणाचीही परवानगी न घेता स्वताःच्या निर्णयाने अवास्तव खर्च करण्यात आला. अशाप्रकारे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान श्री. दिपक कुरळेकर यांनी जाणूनबुजून केलेले आहे.

४. दिपक कुरळेकर हे वारंवार कामात कसूर करण्यासाठी काही ना काही कारणाने आजारी असल्याचे सांगून रजेवर राहतात. परंतु रजेच्या कालावधीत नगरभवन येथील वृक्ष प्राधिकरणाच्या कार्यालयात वैयक्तीक फायद्यासाठी हजर असल्याचे दिसुन आलेले आहे. त्यामुळे अशा बेजबाबदार अधिकाऱ्यास देखील आपल्या महानगरपालिकेतुन कार्यमुक्त करून चौकशी लावण्यात यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदन :- श्री. राकेश शहा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | १ | प्रभात प्रकाश पाटील |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | २ | पाटील सुनिता कैलास |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | ३ | झिनत रऊफ कुरेशी |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ४ | विराणी रेखा अनिल |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | शिल्पा भावसार | ५ | पिसाळ मनिषा नामदेव |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | ६ | डिसा मर्लिन मर्विन |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | काझी रशीदा जमील |
| ८ | डॉ. नयना मनोज वसानी | ८ | दक्षता राजेंद्र ठाकूर | ८ | बगाजी शर्मिला विल्सन |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पाटील वंदना विकास | ९ | इनामदार जुबेर |
| १० | जैन गिता भरत | १० | वंदना रामदास चक्रे | १० | वेतोसकर राजेश शंकर |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | अनिता जयवंत पाटील | ११ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | रकवी सुहास माधवराव | १२ | सामंत प्रमोद जयराम |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | खण्डेलवाल सुरेश | १३ | पांडे हंसूकुमार कमलकुमार |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | डॉ. आसिफ शेख | | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | लियाकत ग. शेख | | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | नरेश तुकाराम पाटील | | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | भोईर कमलेश यशवंत | | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | रविंद्र भिमदेव माळी | | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | अशोक तिवारी | | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | | | | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | | | | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | | | | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | | | | |
| २८ | परमार अनिता भरत | | | | |
| २९ | पाटील प्रणाली संदिप | | | | |
| ३० | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | | |
| ३१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३५ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | | |
| ३७ | केळुसकर प्रशांत नारायण | | | | |
| ३८ | भोईर भावना राजू | | | | |
| ३९ | जाधव मोहन महादेव | | | | |
| ४० | मुन्ना सिंग | | | | |
| ४१ | ॲड. रवि व्यास | | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७६, शहरातील पावसाळ्या पूर्वी कच्चे पक्के नाले सफाई करणे व इतर आरोग्य विभागाच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**रोहिदास पाटील :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार अ) शहरातील पावसाळ्या पूर्वी कच्चे पक्के नाले सफाई/खोदाई करणे सदर कामातून निघालेल्या गाळ/माती/कचरा वाहतुक करणे, पावसाळ्या दरम्यान साचणाऱ्या पावसाळी पाण्याचा उपसा व निचरा करणे कामी सहा प्रभाग समितीनिहाय लागणारे जे.सी.बी. मशीन, पोकलन मशीन, बोटसह पोकलन मशीन, क्रेन मशीन, हायड्रा मशीन, डंपर, टोरस व कंत्राटी मजूर, विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेणे तसेच विविध व्यासाचे आर.सी.सी. पाईप खरेदी करणे, तसेच नाले सफाई ठेकेदारामार्फत करण्यात यावी. प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यातील "अ" मध्ये नमुद केलेल्या कामाच्या निविदा मागविण्याकरीता रक्कम रु. १ कोटी ५० लाख एवढ्या रक्कमेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे व आरोग्य विभागाची इतर कामासाठी सादर केलेल्या "ब" बाबत संपूर्ण माहितीसह आवश्यकतेनुसार त्या त्या वेळी प्रस्ताव मा. महासभेसमोर सादर करुन मंजूरी घेण्यात यावी, असा ठराव मांडत आहे.

**सुमन कोठारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब पूर्ण गोषवारा दिला आहे आणि विचारले आहे आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी द्या. किती अमाऊंटला आम्ही आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी द्यायची. तुम्ही ह्याच्यात म्हटलेच नाही. मोघम गोषवारा आहे. दीड करोड आणले कसे त्यांनी इस्टीमेंट केले कसे. आम्ही पास कसे करायचे ते सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो महासभेची आर्थिक प्रशासकीय मंजूरी घेतो निविदेचे रेट्स मंजूर करुन घेतो नालेसफाईला मंजूर किती लागतील, जे.सी.बी. किती लागतील अंदाज दीड दोन कोटी लागतात.

**आसिफ शेख :-**

आता तुम्हाला मजेशीर गोष्ट सांगतो. सदरचा विषय मागच्या वर्षाच्या महासभेत होता. सन्मा. कॅटलीन परेरा ह्या महापौर असताना आता सत्तांतर झाल्यानंतर इकडची लोक तिकडे गेली तिकडची लोक इकडे आली इकडची लोक जी तिकडे गेली त्यांचे मन परिवर्तन झाले तेव्हा सन्मा. विरोधी पक्षनेता आताचे आमदार नरेंद्र मेहता ह्या विषयावर काय बोलले. एकात्मिक नाला प्रकल्पामध्ये बरीच काम सुरु आहेत. संपूर्ण सभागृहाला माहित आहे. अडीज ते तीन कोटीचे काम होते. सन्मा. सदस्यांनी कमी-कमी करुन ते एक ते सव्वा कोटीवर ते काम आणले. तेव्हा गोषवाऱ्यामध्ये किती खर्च होणार ते लिहीले. परंतु आता ह्याच्यात काही दिलेच नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब ह्यापूर्वी पण असाच गोषवारा होता.

**आसिफ शेख :-**

महासभेपूढे रितसर या असा त्यावेळी ठराव झाला होता. आता संपूर्ण सभागृहाची मंजूरी घेता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मंजूरीचे रेट वाढतात. जे.सी.पी. चे रेट्स वाढतात.

**मा. महापौर :-**

तुमचा खुलासा झाला तुम्हाला ठराव मांडायचा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब तुम्ही हा गोषवारा वाचा ह्याच्यात क्लियर म्हटले आहे आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी पाहिजे. पानपट्टे साहेब दरवर्षी मंजूर करुन घेता तेव्हा त्याच्यामध्ये अमाऊंट असते ह्याच्यामध्ये अमाऊंट नाही. तुम्ही हा चुकीचा गोषवारा दिलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, विषय जे.सी.पी, मजूर, डम्पर इतर लागणार साफसफाई, खोदकाम करण्यासाठी लागणारी साम्रगी. त्याची आपण रितसर निविदा मागवणार आहोत, त्याचे दर येणार आहेत आणि दर आल्यानंतर एखादी एक्झॅक्टली इस्टीमेंट कॉस्ट सांगता येईल की किती इस्टीमेंट कॉस्ट असणार आहे. प्रशासनाने इस्टीमेंट कॉस्ट अंदाजित दिली पाहिजे होती खरे आहे. ह्याच्यात काही दूमत नाही. पण येणा-या पावसाचा गंभीरता बघता कारण आता केले तर टेंडर कॉल करुन मान्यता देणे आणि नाले खोदणे त्याला खूप मोठा काळ लागणार आहे. निविदेच्या माध्यमातून हे रेट आल्यानंतरच येईल. सन्मा. आसिफ शेखनी त्यावेळी अडीज कोटी मागितले आम्ही अभ्यास करुन दीड कोटी दिले. आताही दीड कोटीचेच दिले. आता अडीज दिले नाही. जेसीपीचा रेट स्वस्त आला तर दीड कोटी पडणार नाही. स्वस्त पडणार आहे. एखादा रि-ॲप्रोप्रिएशनसाठी तुम्हाला यावे लागणार आम्ही अंदाजित खर्चाला एवढी मान्यता देतो ह्यापेक्षा जास्त तुम्हाला करता येणार नाही. काय लागल्यास रि-ॲप्रोप्रिएशनसाठी यावे लागेल. मा. महापौर मॅडम आम्ही विषय दिला आहे. पूढचा विषय घ्या.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. ७६ :-**

शहरातील पावसाळ्या पूर्वी कच्चे पक्के नाले सफाई करणे व इतर आरोग्य विभागाच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ७७ :-**

प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यानुसार अ) शहरातील पावसाळ्या पूर्वी कच्चे पक्के नाले सफाई/खोदाई करणे सदर कामातून निघालेल्या गाळ/माती/कचरा वाहतुक करणे, पावसाळ्या दरम्यान साचणा-या पावसाळी पाण्याचा उपसा व निचरा करणे कामी सहा प्रभाग समितीनिहाय लागणारे जे.सी.बी. मशीन, पोकलन मशीन, बोटसह पोकलन मशीन, क्रेन मशीन, हायड्रा मशीन, डंपर, टोरस व कंत्राटी मजूर, विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेणे तसेच विविध व्यासाचे आर.सी.सी. पाईप खरेदी करणे, तसेच नाले सफाई ठेकेदारामार्फत करण्यात यावी. प्रशासनाने सादर केलेल्या गोषवा-यातील "अ" मध्ये नमुद केलेल्या कामाच्या निविदा मागविण्याकरीता रक्कम रु. १ कोटी ५० लाख एवढ्या रक्कमेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे व आरोग्य विभागाची इतर कामासाठी सादर केलेल्या "ब" बाबत संपूर्ण माहितीसह आवश्यकतेनुसार त्या त्या वेळी प्रस्ताव मा. महासभेसमोर सादर करुन मंजूरी घेण्यात यावी, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्रीम. सुमन कोठारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७७, मोबाईल टॉवर्सना अग्निशमन दलाचा नाहरकत दाखला देणेकामी फी ची आकारणी निश्चित करणेबाबत.

**निलम ढवण :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी इमारतीवर मोबाईल टॉवर्स उभारणेकामी अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला मिळणेकामी अर्ज अग्निशमन विभागास प्राप्त झाले आहेत.

अग्निशमन फी करीता मा. महासभा दि. १८/०२/२०१२ प्र. क्र. १०८ ठराव क्र. ११४ अन्वये पारित केलेल्या ठरावात मोबाईल टॉवर्सना अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला देतेसमयी आकारवयाच्या फी बाबत कोणताही उल्लेख अथवा निर्णय नसल्याने अग्निशमन विभागास प्राप्त झालेले मोबाईल टॉवर्स करीता नाहरकत दाखला मागणी केलेली सर्व प्रकरणे अद्यापपर्यंत प्रलंबीत आहेत. सदर बाब लक्षात घेता व सादर केलेल्या गोषवा-यानुसार मोबाईल टॉवर करिता **अग्निशमन दलाचा ना हरकत दाखला देणेकामी आकारावयाची फी निश्चीत करणे गरजेचे आहे.**

गोषवा-यात नमुद केल्यानुसार ठाणे महानगरपालिकामध्ये सदर नाहरकत दाखल्या करीता रु. १०००/- इतकी फी आकरण्यात येत आहे. सदरची फी ही अत्यंत कमी आहे. मोबाईल कंपन्या हे टॉवर्स जरी ग्राहकांच्या सुविधेकरीता उभारत असली तरी त्यांचे मुख्य उद्दीष्ट हे वाणिज्यीक सबळता प्राप्त करणे हाच आहे. या कारणास्तव मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून देण्यात येणा-या मोबाईल टॉवर्सच्या नाहरकत दाखल्याकरीता खालील प्रमाणे शुल्क आकारणी करणे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

याच प्रमाणे मोबाईल टॉवर्सची नागरीकांच्या दृष्टीने सुरक्षिततेला महत्व देणे आवश्यक आहे. मोबाईल टॉवरकरीता असलेल्या जनरेटरवर कोणत्याही प्रकारचे सामान ठेवण्यात येवू नये. जनरेटरची देखभाल दुरुस्ती

वेळेवर करण्यात यावी. सुरक्षितेबाबत सोसायटीने संबंधित मोबाईल टॉवर कंपनीकडून हमीपत्र घ्यावे. इतर कोणत्याही कारणास्तव अपघात झाल्यास सोसायटी व मोबाईल कंपनीस दंड आकारून त्यांची परवानगी रद्द करण्यात यावी. दंडात्मक रक्कम अथवा थकबाकी वसुली करीता त्यांची जंगम मालमत्ता व सामान जप्त करून वसुली करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशील | आकारावयाचे शुल्क |
|---|---|---|
| १. | नवीन मोबाईल टॉवर्स करीता देण्यात येणाऱ्या नाहरकत दाखल्याकरीता आकारावयाची फि | रु. २१,०००/- |
| २. | दरवर्षी दिलेल्या नाहरकत दाखल्याचे नुतनीकरण करणेकामी | रु. १०,०००/- |

तरी उपरोक्त तक्त्यातील नमुद प्रस्तावीत दराप्रमाणे फी ची आकारणी करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महासभा दि. १५/०१/२०१३, प्रकरण क्र. ४३ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोबाईल टॉवर्स / यंत्रणा बसविणे बाबतचे सुधारीत धोरण निश्चित करणेबाबतचा ठराव झाला होता. त्या ठरावाच्या अनुषंगाने प्रशासनाने आवश्यक ती कारवाई केली नाही. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. टीपीएस-१८१०/१९७५/प्र.क्र.२४१७/१०/नवि-१३, दि. २६/०७/२०११ अन्वये मोबाईल टॉवर्स बाबत राज्यातील सर्व महानगरपालिकांसाठी सर्वकष धोरणाचे प्रारुप प्रसिध्द केले आहे. परंतु सदर धोरण अंतिम झालेले नाही. नागरीकांच्या आरोग्याला मोबाईल टॉवर्समुळे धोका निर्माण होत असल्याने नागरीकांत असंतोष पसरलेला आहे. त्यामुळे प्रशासनाने नविन मोबाईल टॉवर्सना परवानगी देऊ नये. तुर्त सदर विषय स्थगित ठेवावा असा मी ठराव मांडत आहे.

**वंदना चक्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब मिरा भाईंदरमहानगरपालिकेमध्ये आपण जो ठराव केला तो फायर एन.ओ.सी. कारण प्रत्येक टॉवरला जनरेटर असतो मधल्या काळात एका बिल्डींगमध्ये फ्लॅटचे काम चालू होते त्याचे जे स्पॉट पडतात तेथे आग लागली. त्याच्यात डिझेल वैगेरे असते म्हणून फायर एन.ओ.सी. त्यांना कम्पलसरी करतो. फायर एन.ओ.सी. त्यांनी घ्यावी. मागच्या काळात एक ठराव झालेला की मोबाईल टॉवरचे भाडे आकरण्यात यावे. वार्षिक रुपये आपण ठरवले आहे. त्या अनुषंगाने आतापर्यंत कुठल्याही प्रकारची वसूली झालेली नाही. त्यामध्ये शासनाने काही वेगळे निर्देश दिले का ते आपण तपासून घ्या. करोडो रुपयांमध्ये रेव्हेन्यू बाकी आहे. मोबाईल टॉवर १० मिनिटांसाठी जरी बंद केले तरी येऊन पैसे भरतात तर आपण कठोरपणे कारवाई करण्यात यावी. महानगरपालिकेच्या आवारात रिलायन्सचा एक टॉवर उभा केला गेला. त्या वेळी विक्रम कुमार साहेब कमिशनर असताना विषय आलेला त्यावेळी सभागृहाने एक मताने निर्णय घेतला. महानगरपालिका जागा देणार नाही. त्यांना रस्त्यावर उभे करण्यासाठी पाहिजे होते. पण त्या दिवसापासून आजपर्यंत तो टॉवर पार्किंगमध्ये उभा आहे त्याला परवानगी नाही तो त्वरीत काढण्यात यावा. मा. आयुक्त महोदय ह्या मोबाईल टॉवरला कनेक्टीव्हिटीला फायबर यूज केला जातो. आपण मिरा भाईंदर शहरात बघितले तर इलेक्ट्रीसीटी पोलच्या व्यतिरिक्त अनेक पोल उभे केले आहेत. त्याच्यावर हँगींग वापर वायर ले करुन मोबाईल टॉवर कनेक्ट केले आहेत. शासनाचे जी.आर आणि धोरण आहे की प्रत्येक पोलची कर आकारणी नक्की केलेली आहे वार्षिक १०० की महिन्याला १०० मला माहित नाही पण गेल्या १०-१२ वर्षापासून ते पैसे बाकी आहेत. जेवढे फायबर ले केले आहेत पोल टू पोल कि.मी. व्हाईज शासनाने पैसे नक्की केलेले आहेत की एवढ्या कि.मी वर तुम्हाला महानगरपालिकेला एवढे पैसे भरायला लागतील हा शासनाचा जी.आर आहे. पण आपल्याकडे अनेकदा चर्चा होऊन ते पैसे घेतले नाहीत. कमीत कमी करोडोमध्ये रिलायन्सचे पैसे बाकी आहेत. आपली जमीन तो कायमस्वरुपी वापरतो. आपल्या महानगरपालिका डिपार्टमेंटकडून ते घेतात टाटासाठी परवानगी एक पोल टाकायला खोदायचे तेवढेच असते टाकतो १० पोल आपल्याला माहित नाही त्यालाही माहित नाही सगळ्या जेवढ्या कंपनी आहेत कारण भविष्यात आपण सिमेंट रोडकडे जाणार आहोत. आपल्या अंडरग्राऊंड सिव्हरेजचे काम पूर्ण होणार आहे. आपल्याला त्यांचा ले आऊट प्लान माहित पाहिजे. कोणी किती परवानग्या आपल्याकडून घेतल्या त्यांनी ब्लू प्रिंट आपल्याकडे द्यायला पाहिजे. त्याला रिपेयरींग परवानगी देण्यासाठी ते आपल्या ह्याच्यात आहेत की नाहीत त्या व्यतिरिक्त मा. आयुक्त साहेब रिलायन्सकडे करोडो रुपये थकबाकी आहे. ती सगळी वसूल करुन घेण्यात यावी. इलिगल मोबाईल टॉवर असतील ते रद्द करावे. एकीकडे आपण फायरचा विषय करतो माहित पडते की त्यांनी मूळ परवानगी घेतलेलीच नाही. महानगरपालिकेच्या आवारात जो टॉवर आहे तो काढण्यात यावा. मा. महापौर मॅडम आपल्याकडे दोन ठराव आहेत आपण निर्णय घ्यावा.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम, अग्निशमन दलाला मोबाईल टॉवर परवाने देण्यासाठी परवानगी द्यायची आहे. महसूलाचा विषय आहे. आपल्या शहरात जे मोबाईल टॉवर्स लागले आहेत ती किती आहेत किती अनधिकृत आहेत. त्यांना किती टॅक्स लागला आहे. त्याची माहिती द्यावी. कोणत्या डिपार्टमेंटकडे आहे ते तरी सांगा.

**जुबेर इनामदार :-**

मोबाईल टॉवर्सचा विषय असल्यानंतर महासभेत प्रश्न उपस्थित होणारच. माहिती तर पाहिजे हा विभाग कोण बघतो.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, माहिती माझ्याकडे आहे. आज हा विषय महासभेपूढे आलेला आहे. गेली अडीज वर्ष मी ह्या सभागृहात आहे दोन वर्ष स्टँडिंगमध्ये होतो. विधी मॅडम होत्या, धनेगावे साहेब होते. माझ्याकडे लिस्ट आहे. २५०० ते ३००० अनधिकृत मोबाईल टॉवर मिरा भाईंदर क्षेत्रात आहेत. गेल्या वेळची परंपरा ती चालूच राहीली. अनधिकृत बिल्डींगवर सुध्दा मोबाईल टॉवर लावण्यात आले आहेत. पूर्ण लिस्ट माझ्याकडे दिलेली आहे. आम्ही जेव्हा विचारतो तेव्हा एकच उत्तर दिले जाते की प्रभाग अधिकाऱ्यांना ते आदेश देण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे हेयरिंग चालू आहे. १४-१५ दिवसांनी त्याच्यावर कारवाई होईल परंतु गेल्या अडीज वर्षापासून एकही मोबाईल टॉवरवर कारवाई झाली नाही. विधी मॅडमचा माझ्याकडे रेकॉर्ड आहे. स्टॅन्डिंग कमिटी दोन वर्षाचा प्रत्येक वेळेला पूढच्या महिन्यात होईल. जानेवारीत होईल, फेब्रुवारीत होईल पण आज अडीज वर्ष निघून गेली मला सांगाव त्यांनी मा. महापौर मॅडम तुमच्या समोर सांगावे की आजमितीस ती कारवाई झाली की नाही झाली. आपल्या महानगरपालिकेचा करोडो रुपयांचा महसूल बूडतो. नगररचना डिपार्टमेंटकडून त्यांनी परवानगी घ्यावी. त्यानंतर टॅक्स विभागाकडून टॅक्स आकारणी होते. परवाना विभागाची फी मिळत नाही. टॅक्सचा महसूल तोही घेतला जात नाही. आज शांतीनगरमध्ये प्रत्येक सेक्टरमध्ये ४० ते ५० बिल्डींग आहेत त्याच्यात २५ इमारतीवर हे टॉवर उभारण्यात आलेले आहेत. मग आम्ही काय समजायचे नगरपालिकेचे अधिकारी आणि त्या बिल्डींगचे सेक्रेटरी चेअरमनच्या संगनमताने उभारण्यात आलेले आहेत. उद्या जर पहिल्या माळ्यावर शेड टाकली आज आपण पत्रे टाकायला परवानगी दिली आहे. त्याचे ७५०० फी आकारतो. पत्रे दिसले की आपले अधिकारी तेथे जातात. आज मोठमोठे मोबाईल टॉवर्स उभे करण्यात आले ते कोणाच्या संगनमताने चालू आहे. आज दोन वर्ष झाली प्रभाग अधिकारी पण तेच उत्तर देतात. माझा स्पष्ट आरोप आहे की महानगरपालिकेचे अधिकारी आणि संबंधीत प्रभाग अधिकारी आणि त्या बिल्डींगचे सेक्रेटरी चेअरमन ह्यांच्या संगनमतानेच हे मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले आहेत. प्रत्येक वेळी आमची दिशाभूल केली जाते की कोर्टात स्टे आहे २-२ वर्ष कोर्टाचा स्टे व्हेकेन्ट होत नाही. मा. महापौर मॅडम ह्याच्यापूढे असे होता कामा नये. आपल्यामार्फत अधिकाऱ्यात आदेश देण्यात यावे की संबंधीत २५००-३००० यादी जी माझ्याकडे आहे त्याच्यावर कारवाई करण्यात यावी.

**अशरफ शेख :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, आता दळवी साहेबांनी सांगितले की २५०० ते ३००० अनधिकृत मोबाईल टॉवर आहेत मी मागच्या वर्षी पत्रव्यवहार केला होता. जे अधिकृत टॉवर्स लावले आहेत त्याच्यात ७० टक्के त्या लोकांनी नूतनीकरण केलेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा जो विषय आहे. सभागृहाची भावना आहे मा. आयुक्त साहेब अत्यंत गांर्भियाने घ्यायचा विषय आहे. हे सभागृहाचे दुर्देव आहे. अधिकाऱ्यांचे दुर्देव आहे, जनतेचे दुर्देव आहे. कारण बोलणारे चारही लोक आम्ही स्टँडिंगमध्ये दोन वर्ष हया विषयावर नीटनेटके भांडत होतो. कधीही उत्तर मिळाले नाही आज सभागृहाचे डायसवरचे चित्र आहे ते शहराचे दुर्देव आहे. असे नाही व्हायला पाहिजे. पक्ष कोणताही असू दे सत्ताधारी असू दे, विपक्ष असू दे हे शहराच्या विकासासाठी नागरिकांच्या सुरक्षेचा आरोग्याचा विषय, महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा विषय जर उत्पन्न वाढेल तर सोयी देणार आणि उत्पन्नाचे जे स्त्रोत आहे त्या ठिकाणीच आपले नाकर्तेपणा असेल अधिकाऱ्यांना जाणीवच नसेल किंवा त्याची पर्वाच नसेल की, आम्हाला कोण विचारणारच नाही मग सभागृह कशासाठी आहे. अशी आमची भावना होणार. सभागृहातल्या १०० नगरसेवकांची बाहेर पत्रकाराची, जनतेची होईल आमची तुम्हाला विनंती आहे मी सभागृह नेता म्हणून तुम्हाला विनंती करतो तुम्हाला हा विषय जितका काळजीने घेता येईल तितका घ्यावा. आपली सभा संपल्यावर तुमचे मंत्रीमंडळ बसवा. काहीच नाही केले तर कोणावर जबाबदारी.

**दिलीप घेवारे :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो. आपण पाच वर्षापूर्वी २१४ मोबाईल टॉवर्सना परवानगी दिली आहे. त्या सर्वांची मुदत संपलेली आहे. आतापर्यंत एकानेही रिनिव्ह्यूल घेतले नाही.

**प्रमोद सामंत :-**

रिनिव्ह्यूल घेतले नाही तर काढून टाका मा. आयुक्त साहेब काढून टाकायला सांगा.

**दिलीप घेवारे :-**

ज्या सर्व कंपन्या आहेत त्यांची एक समिती आहे. ती हायकोर्टात गेलेली आहे. हायकोर्टाने ह्याला बंधन केलेले आहे. कोर्टाने ऑर्डर दिली आहेत. त्याच्यात डी.ओ.टी आहे डिपार्टमेंट ऑफ टेली कम्यूनिकेशन त्याच्याकडे १०-११ कंडीशन दिल्या आहेत. तुम्ही कंडीशन फूलफिल करा. त्याच्यात अनेक एन.ओ.सी. आहेत

ते सर्व पूर्तता करा आणि परवानगी घ्या. आणि आपले सगळे पैसे भरा असेही हायकोर्टाने सांगितले आहे. अनेक कंपन्या आपली पूर्तता करण्यात फेल होतात. त्याच्यामुळे ते काम राहीले. गर्व्हमेंट आणि हायकोर्ट असे दोन्हीकडे मॅटर सुरु आहे त्याच्यात लवकर निर्णय लागेल.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम घेवारे साहेब आता आले आहेत. त्यापूर्वी धनेगावे साहेब होते. मला दोन वर्षाची विधी विभाग मॅडमनी जी माहिती दिली आहे ती माहिती परत ह्या सभागृहाला द्यावी. विधी विभागाला त्याची इत्यंभूत माहिती आहे. दोन वर्ष जी कॅसेट त्यांनी लावली आहे तीच त्यांनी इकडे वाजवायची. आणि सभागृहाला सांगावे की दोन वर्ष झाली तरी कारवाई का करण्यात आली नाही.

**सई वडके :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलते सर ह्याच्यात इश्यू इनव्हॉल्व आहेत. सन २००८ मध्ये मा. महासभेने एक ठराव केला होता. २००७ मध्ये जस्टीस खांडेपारकर ह्यांनी असा निर्णय दिला होता की मोबाईल टॉवर हे स्ट्रक्चर आहे. त्यामुळे त्याला डी.सी. रुल प्रमाणे कारवाई करावी. पण स्टेट गर्व्हमेंट ॲज वेल ॲज सेन्ट्रल गर्व्हमेंटकडून कोणतीही पॉलिसी तयार झाली नव्हती. म्हणून आपण २००८ ला ठराव केला की, आपण त्याच्याकडून कशाप्रकारे डेव्हलपमेंट चार्जेस घ्यावेत. त्यांचे रिनिव्हूल चार्जेस किती असतील स्क्रूटीनी चार्जेस किती असतील तो २००८ चा ठराव २००९-१० मध्ये हायकोर्टात चॅलेंज झाला. २०१० मध्ये कोर्टाने त्याच्यामध्ये कारवाई करु नका. कारण स्टेट गर्व्हमेंटची जी ड्राफ्ट पॉलिसी होती त्याच्याशी विसंगत असल्यामुळे कोर्टाने त्याच्यानुसार कारवाई करु नका म्हणून स्टे दिला. त्या दरम्यान २०१४ मध्ये स्टेट गर्व्हमेंटची पॉलिसी आली. मोबाईल टॉवरला कशा प्रकारे परवानगी द्यायची त्याचे रेडीएशन एम.पी.सी.बी. बोर्डाकडून परवानगी किती घ्यावी, फायर एन.ओ.सी. कशी घ्यावी. ह्याच्याप्रकारे ८ मार्च २०१४ ला त्यांची पॉलिसी फायनल झाली. नोव्हेंबर २०१४ला ही पॉलिसी पून्हा हायकोर्टात चॅलेंज झाली. त्याच्यामध्ये हायकोर्टाने अजून स्टे दिलेला आहे. त्या पिटीशनमध्ये कुठल्याही कॉर्पोरेशनला पार्टी करण्यात आलेला नाही. त्याच्यात एकच म्हणण होत की स्टेट गर्व्हमेंटची जी पॉलिसी आहे सेंट्रल गर्व्हमेंटच्या टेली कम्यूनिकेशन डिपार्टमेंटनी जी फ्रेम केलेली पॉलिसी आहे. त्याच्याशी विसंगत असल्यामुळे स्टेट गर्व्हमेंटच्या पॉलिसीला स्टे देण्यात आला त्यामुळे आता सद्यस्थितीत स्टेट गर्व्हमेंटच्या पॉलिसीनुसार आपल्याला कारवाई करता येत नाही. त्याचबरोबर हायकोर्टाने असेही म्हटले आहे की त्याचे जे काही अर्ज असतील ते तुम्ही एक्सेप्ट करा. त्यामुळे हायकोर्टाचे निर्णय झाल्यानंतर स्टेट गर्व्हमेंटच्या पॉलिसीनुसार कारवाई करायची की नाही त्याच्यानुसार कारवाई करण्यात येईल.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, ह्या मॅडम सभागृहाची दिशाभूल करतात. मी तुमच्या निदर्शनास आणू इच्छितो की त्यांनी स्टॅंडिंग कमिटीमध्ये जी गेल्या ८ महिन्यापूर्वी रुलिंग दिली होती ती अशी होती की आम्ही प्रभाग अधिकारी त्याची हेयरींग घ्यावी आणि सदरचे अनधिकृत मोबाईल टॉवर निष्कासीत करण्यात यावे. आणि त्या आजही ह्याच्यावर ठाम आहे की कोर्टाचा स्टे आहे. गेली ६ वर्षापासून आपला महसूल बुडतो. कोर्टाच्या नावाखाली चालू आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय मला आता असे नक्की जाणवते की आता प्रशासनाकडे सुध्दा उत्तर नाही. प्रशासनानी ठरवले तर सर्व काही होईल. हायकोर्टाने सगळ केले आहे पण जिथपर्यंत हे निर्णय होत नाही तिथपर्यंत नविन टॉवर लावा हेही म्हटले नाही ना. त्याला तिकडे बंधनकारक करा की तुम्हाला हे लावता येत नाही कारण ते त्याच्यात स्थगिती आहे. अशाप्रकारे बंधनकारक करा. प्रॉपर्टी टॅक्स डी.सी. रूलप्रमाणे करा बट प्रॉपर्टी हॅज बीन रेन्टल. ती जागा भाड्यावर दिली आहे. सोसायटीबरोबर करारनामा झाला आहे त्याचे रेन्टल ॲक्ट लागते त्या ॲक्टमध्ये आणा. सोसायटी त्यांच्याकडून वसूल करतील. ज्यावेळी कोर्टाचा निर्णय असेल पैसे परत देऊ. तुम्हाला दोन्ही मार्ग आहेत. जिथपर्यंत कोर्टाचा निर्णय होत नाही तिथपर्यत त्यांनी नविन टॉवर लावता कामा नये. रेन्टल जे आहेत जी जागा त्यांनी भाड्यावर दिली आहे ज्यावेळी आपण एखाद्या सोसायटीचे प्रिमायसेस भाड्यावर देतो त्याला वेगळे ॲग्रीमेंट लागणार आहे त्या अंडरमध्ये त्यांना आणा. काढायला गेलो तर आपल्याकडे पण बरेचसे ॲक्ट आहेत त्या ॲक्टमध्ये त्यांना बसवा. अशी आपणास विनंती राहील. सभागृहाला जे जे टॉवर आहेत त्यामधले डीपली विचार करावा आणि मोबाईल कंपनीशी बसून चर्चा करावी आपला रेव्हेन्यू आपल्याला आला पाहिजे. मा. महापौर मॅडम आपल्याकडे दोन ठराव आले आहेत त्याच्यावर आपण निर्णय द्यावा.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम, मला सुचना मांडायची आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव आला आहे.

**बर्नड डिमेलो :-**

ठरावात सुचना देतो तुम्ही ठराव पास करा नापास करा तो तुमचा अधिकार आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव आहे मी मतदानाला घेते.

**बर्नड डिमेलो :-**

माझ्या ठरावात सुचना घ्या.

**मा. महापौर :-**

तुमच्या ठरावातच मांडा.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, मघाशी सांगितले त्याचे होणारे धोके आपण अग्निशमन दलाची फी घेणार आहोत. त्या व्यतिरिक्त माझी सुचना अशी होती. महानगरपालिकेचे प्रत्येक ठिकाणी आपली कार्यालय आहेत इमारती आहे, उघडे भूखंड आहेत, पडीक जमिनि आहेत तर असा एक नियम लावा की शहरामध्ये लोक जिथे राहतात तिथे टॉवर लावू नये आणि लावायचा असेल तर शासकीय इमारतीवर लावावा. कारण तिथे लहान मुल किंवा आजारी लोक नसतात आणिआपल्या आमदाराची इच्छा आहे रेव्हेन्यू वाढला पाहिजे तर इलिगल असेल त्यांना परवाना देऊ शकत नाही. परवाना घ्यायला आले तर फी कशी घेणार हे प्रश्न उद्भवणार आहेत. महासभेला मी अशी विनंती करीन सर्वांनी असा ठराव करुन शहरासाठी एक नियम करा ज्या कंपनीला मग ती एअरटेल, एअरसेल असो, टाटा, रिलायन्स त्यांनी फक्त महानगरपालिकेच्या जमिनि किंवा इमारती असतील तेथे टॉवर उभारावे.

**मा. महापौर :-**

सुचना तुमच्या ठरावात इन्क्लूड करुन घ्यायची का?

**बर्नड डिमेलो :-**

आमच्या घ्या तुमच्या घ्या. सुचना तुम्हाला चांगली वाटते. प्रशासनाला उत्पन्न वाढवायचे असेल तर ही सुचना लक्षात घ्यावी.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७० करिता दोन ठराव आलेले आहेत.

**प्रमोद सामंत :-**

अधिकृत किती त्याची माहिती द्या.

**मा. महापौर :-**

माहिती घेऊन सांगणार.

**प्रमोद सामंत :-**

कधी देणार. आज विषय आहे. माहिती करुन घ्यायची ना.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. आज नाही घेतली तर पूढच्या वेळी माहिती देणार. मतदान चालू करा. मतदानाची प्रक्रिया चालू झाली आहे विरोधी पक्षनेता बसून घ्या.

**नगरसचिव :-**

सुचक श्रीम. निलम ढवण, अनुमोदन श्री. नरेंद्र मेहता, दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदन श्रीम. वंदना चक्रे. मा. महासभा दि. १५/०१/२०१३, प्रकरण क्र. ४३ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोबाईल टॉवर्स / यंत्रणा बसविणे बाबतचे सुधारीत धोरण निश्चित करणेबाबतचा ठराव झाला होता. त्या ठरावाच्या अनुषंगाने प्रशासनाने आवश्यक ती कारवाई केली नाही. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. टीपीएस-१८१०/१९७५/प्र.क्र.२४१७/१०/नवि-१३, दि. २६/०७/२०११ अन्वये मोबाईल टॉवर्स बाबत राज्यातील सर्व महानगरपालिकांसाठी सर्वकष धोरणाचे प्रारुप प्रसिध्द केले आहे. परंतु सदर धोरण अंतिम झालेले नाही. नागरीकांच्या आरोग्याला मोबाईल टॉवर्समुळे धोका निर्माण होत असल्याने नागरीकांत असंतोष पसरलेला आहे. त्यामुळे प्रशासनाने नविन मोबाईल टॉवर्सना परवानगी देऊ नये. तुर्त सदर विषय स्थगित ठेवावा असा मी ठराव मांडत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हातवर करायचे आहे. मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी इमारतीवर मोबाईल टॉवर्स उभारणेकामी अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला मिळणेकामी अर्ज अग्निशमन विभागास प्राप्त झाले आहेत.

अग्निशमन फी करीता मा. महासभा दि. १८/०२/२०१२ प्र. क्र. १०८ ठराव क्र. ११४ अन्वये पारित केलेल्या ठरावात मोबाईल टॉवर्सना अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला देतेसमयी आकारवयाच्या फी बाबत कोणताही उल्लेख अथवा निर्णय नसल्याने अग्निशमन विभागास प्राप्त झालेले मोबाईल टॉवर्स करीता नाहरकत दाखला मागणी केलेली सर्व प्रकरणे अद्यापपर्यंत प्रलंबीत आहेत. सदर बाब लक्षात घेता व सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मोबाईल टॉवर करिता **अग्निशमन दलाचा ना हरकत दाखला देणेकामी आकारावयाची फी निश्चीत करणे गरजेचे आहे.**

गोषवाऱ्यात नमुद केल्यानुसार ठाणे महानगरपालिकामध्ये सदर नाहरकत दाखल्या करीता रु. १०००/- इतकी फी आकरण्यात येत आहे. सदरची फी ही अत्यंत कमी आहे. मोबाईल कंपन्या हे टॉवर्स जरी ग्राहकांच्या सुविधेकरीता उभारत असली तरी त्यांचे मुख्य उद्दीष्ट हे वाणिज्यीक सबळता प्राप्त करणे हाच आहे. या कारणास्तव मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून देण्यात येणाऱ्या मोबाईल टॉवर्सच्या नाहरकत दाखल्याकरीता खालील प्रमाणे शुल्क आकारणी करणे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

याच प्रमाणे मोबाईल टॉवर्सची नागरीकांच्या दृष्टीने सुरक्षिततेला महत्व देणे आवश्यक आहे. मोबाईल टॉवरकरीता असलेल्या जनरेटरवर कोणत्याही प्रकारचे सामान ठेवण्यात येवू नये. जनरेटरची देखभाल दुरूस्ती वेळेवर करण्यात यावी. सुरक्षितेबाबत सोसायटीने संबंधित मोबाईल टॉवर कंपनीकडून हमीपत्र घ्यावे. इतर कोणत्याही कारणास्तव अपघात झाल्यास सोसायटी व मोबाईल कंपनीस दंड आकारून त्यांची परवानगी रद्द करण्यात यावी. दंडात्मक रक्कम अथवा थकबाकी वसुली करीता त्यांची जंगम मालमत्ता व सामान जप्त करून वसुली करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशील | आकारावयाचे शुल्क |
|---|---|---|
| १. | नवीन मोबाईल टॉवर्स करीता देण्यात येणाऱ्या नाहरकत दाखल्याकरीता आकारावयाची फि | रु. २१,०००/- |
| २. | दरवर्षी दिलेल्या नाहरकत दाखल्याचे नुतनीकरण करणेकामी | रु. १०,०००/- |

तरी उपरोक्त तक्त्यातील नमुद प्रस्तावीत दराप्रमाणे फी ची आकारणी करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हातवर करायचे आहे.

**मा. महापौर :-**

श्रीम. निलम ढवण ह्यांच्या बाजूने ४०, विरोधात १९, तटस्थ १३ इतकी मते पडली आहेत. श्रीम. निलम ढवण ह्यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**जुबेर इनामदारः-**

मा. महापौर मॅडम, दोन ठराव झाले आम्ही तटस्थ बसलो त्याला कारण एका बाजूने महसूल उत्पन्नाचा विषय होतो. पालिकेचे महसूल उत्पन्न वाढले पाहिजे. ही आमची भुमिका आहे. प्रशासनाने काटेकोरपणे त्याच्यावर कारवाई करावी. कुठे आपल्या चुका होतात काय मोबाईल टॉवर लागले नाहीत त्यांचे नुतनीकरण होत नाही त्याला कारण काय, प्रशासन अधिकारी कुठे कमी पडतात का? दुसऱ्या ठरावामध्ये विषय असा होता आम्ही तटस्थ बसलो त्याला कारण एकच मोबाईल टॉवरमुळे आरोग्याला धोका निर्माण होतो म्हणून त्यांनी त्याचा विरोध केला आपण हातामध्ये, खिशामध्ये मोबाईल घेऊन फिरतो त्याला कुठलेही रेडीएशन नाही आहे. आज पर्यंत सिध्द होऊ शकले नाही. मा. आयुक्त महोदय ह्या शहरामध्ये ११-१२ ज्य काही मोबाईल कंपन्या असतील त्यांनी पोल उभे करुन केबल लावलेल्या आहेतच. त्याचबरोबर त्यांचे अंडरग्राऊंड लेन्थचे काम चालू आहे. त्यांना डी.आय.टी.ने परमीशन दिलेली आहे. पालिकेकडे येत नाही परस्पर राज्य शासनाकडे जातात. त्यांच्याकडून त्यांना परवानगी मिळते. ह्या शहरामध्ये पिट परमिशन देण्यात आली आहे. पिट करण्यासाठी पिट करणे म्हणजे खड्डा करणे त्याच्यामध्ये त्यांनी त्यांचे काम कराव आणि तो पिट परत बंद केला पाहिजे. त्याच्याऐवजी त्यांनी तिकडे चेंम्बर्स तयार केलेले आहेत. १ X १ मिटरचा चेंबर. साधा फेरिवाला साधा फेरी करतो. त्याच्याकडून आपण २५ रुपये घेतो. आपण कायमस्वरुपी आपली मालमत्ता मोबाईल कंपनीला वापरायला देतो आणि त्यांच्याकडून आपण काहीच घेणार नाही. त्यांना पीटचे परमिशन आहे पीट म्हणजे खड्डा करायचा परत बंद करायचे त्यांना त्या चेम्बर्सच्या माध्यमातून त्यांना सर्विसेस प्रोव्हाईड करायची असेल तर आपल्याला त्यांच्या कडून काही शुल्क आकारला पाहिजे. तोही आपल्या महानगरपालिकेला उत्पन्नाचा स्त्रोत होईल ह्या विषयावर आपण गांर्भियपूर्वक विचार करावा. गरज लागल्यास महासभेसमोर हा विषय आणावा. आम्ही तुम्हाला मंजूरी देऊ.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्यांच्या भुमिकेशी मी सहमती दर्शविते की, आम्ही तटस्थ राहीलो परंतु ह्याबाबत आमची भुमिका स्पष्ट आहे. ह्या शहरामध्ये सर्वसामान्य नागरिकांनी टॅक्स भरला नाही तर त्याला आपण ५६ नोटिसा देता. ह्या शहरामध्ये त्यांचे पाणी बंद करण्याची मोहिम चालू आहे. परवाच्या महासभेत आमदारांनी प्रश्न मांडला मोकळ्या जागेच्या टॅक्स बाबत किती मोळ्या जागेचा टॅक्स आपण इतक्या वर्षात वसूल केला नाही. ह्या दोन वर्षात महानगरपालिकेचा किती टॅक्स वसूल झाला आहे. किती प्रमाणामध्ये त्याची वसूली बाकी राहीली आहे. पाण्याची वसूली किती कमी झाली आहे. एल.बी.टी. वर आपले सगळे काही चालते मोकळ्या जागेचा टॅक्स झालेला नाही आपण मोबाईल टॉवरना परमिशन देतो अनधिकृतपणे लागतात तिथे आपले सगळे उत्पन्न बुडीत निघाले आहे. आताच्या सरकारने एलबीटी बंद करण्याचे धोरण अवलंबविले आपल्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले की ह्यापूढे आमचे पगार कसे होतील त्यांची भुमिका एकदम रास्त आहे. परंतु एल.बी.टी.चे उत्पन्न हे महानगरपालिकेचे उत्पन्न आहे असे नाही. असे किती तरी उत्पन्न आपण बूडवतो आहोत.आणि हे बूडवण्याचे काम फक्त प्रशासन करते आहे. ह्याच्याकडे आयुक्त साहेब मी आपले लक्ष वेधते की असे कितीतरी टॅक्सचे प्रकार आहेत जे तुम्ही वसुल करत नाही. त्याच्यामुळे महानगरपालिका डबघाईला आलेली आहे. उदया तुमच्या कर्मचाऱ्याचे पगार थांबले तर त्याला हे प्रशासन हे सभागृह जबाबदार असणार नाही ह्याची तुम्ही दखल घ्या. मा. महापौर मॅडम मी तर आपल्याला सागते आपण प्रत्येक विषयामध्ये वसूली किती आहे आणि किती झाली आहे किती होणार आहे. त्याबाबत स्ट्रिक्ट धोरण अवलंबा. कारण एक-एक पैशावर ह्या नागरिकांचा हक्क आहे. त्यांना आपण पाण्याचे दर वाढवतो. लोकांना वेठीस धरतो ह्यांना कोण वेठीस धरणार? प्रशासनाला वेठीस धरले गेले पाहिजे.

**मा. महापौर :-**

सुधारणा नक्कीच करु, पूढचा विषय घ्या.

**निलम ढवण :-**

प्रभात ताईने मांडलेला विषय १०० टक्के बरोबर आहे. त्याचबरोबर ठेकेदारामुळे देखील आपल्या पालिकेचे बरेचसे नुकसान होते. त्याकडे देखील आपण लक्ष द्यावे आणि महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्याकडे लक्ष केंद्रित करावे.

**प्रकरण क्र. ७७ :-**

मोबाईल टॉवर्सना अग्निशमन दलाचा नाहरकत दाखला देणेकामी फी ची आकारणी निश्चित करणेबाबत.

**ठराव क्र. ७८ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी इमारतीवर मोबाईल टॉवर्स उभारणेकामी अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला मिळणेकामी अर्ज अग्निशमन विभागास प्राप्त झाले आहेत.

अग्निशमन फी करीता मा. महासभा दि. १८/०२/२०१२ प्र. क्र. १०८ ठराव क्र. ११४ अन्वये पारित केलेल्या ठरावात मोबाईल टॉवर्सना अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला देतेसमयी आकारवयाच्या फी बाबत कोणताही उल्लेख अथवा निर्णय नसल्याने अग्निशमन विभागास प्राप्त झालेले मोबाईल टॉवर्स करीता नाहरकत दाखला मागणी केलेली सर्व प्रकरणे अद्यापपर्यंत प्रलंबीत आहेत. सदर बाब लक्षात घेता व सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मोबाईल टॉवर करिता **अग्निशमन दलाचा ना हरकत दाखला देणेकामी आकारावयाची फी निश्चीत करणे गरजेचे आहे.**

गोषवाऱ्यात नमुद केल्यानुसार ठाणे महानगरपालिकामध्ये सदर नाहरकत दाखल्या करीता रु. १०००/- इतकी फी आकरण्यात येत आहे. सदरची फी ही अत्यंत कमी आहे. मोबाईल कंपन्या हे टॉवर्स जरी ग्राहकांच्या सुविधेकरीता उभारत असली तरी त्यांचे मुख्य उद्दीष्टे हे वाणिज्यीक सबळता प्राप्त करणे हाच आहे. या कारणास्तव मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून देण्यात येणाऱ्या मोबाईल टॉवर्सच्या नाहरकत दाखल्याकरीता खालील प्रमाणे शुल्क आकारणी करणे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

याच प्रमाणे मोबाईल टॉवर्सची नागरीकांच्या दृष्टीने सुरक्षिततेला महत्व देणे आवश्यक आहे. मोबाईल टॉवरकरीता असलेल्या जनरेटरवर कोणत्याही प्रकारचे सामान ठेवण्यात येवू नये. जनरेटरची देखभाल दुरूस्ती वेळेवर करण्यात यावी. सुरक्षितेबाबत सोसायटीने संबंधित मोबाईल टॉवर कंपनीकडून हमीपत्र घ्यावे. इतर कोणत्याही कारणास्तव अपघात झाल्यास सोसायटी व मोबाईल कंपनीस दंड आकारून त्यांची परवानगी रद्द करण्यात यावी. दंडात्मक रक्कम अथवा थकबाकी वसुली करीता त्यांची जंगम मालमत्ता व सामान जप्त करून वसुली करण्यात यावी.

| अ.क्र. | तपशील | आकारावयाचे शुल्क |
|---|---|---|
| १. | नवीन मोबाईल टॉवर्स करीता देण्यात येणाऱ्या नाहरकत दाखल्याकरीता आकारावयाची फि | रु. २१,०००/- |
| २. | दरवर्षी दिलेल्या नाहरकत दाखल्याचे नुतनीकरण करणेकामी | रु. १०,०००/- |

तरी उपरोक्त तक्त्यातील नमुद प्रस्तावीत दराप्रमाणे फी ची आकारणी करणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. निलम ढवण अनुमोदन :- श्री. नरेंद्र मेहता**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | १ | प्रभात प्रकाश पाटील |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | २ | पाटील सुनिता कैलास |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | डिमेलो बर्नट अल्बर्ट | ३ | झिनत रऊफ कुरेशी |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो | ४ | विराणी रेखा अनिल |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | शिल्पा भावसार | ५ | पिसाळ मनिषा नामदेव |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | ६ | डिसा मर्लिन मर्विन |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | ७ | काझी रशीदा जमील |
| ८ | डॉ. नयना मनोज वसानी | ८ | दक्षता राजेंद्र ठाकूर | ८ | बगाजी शर्मिला विल्सन |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पाटील वंदना विकास | ९ | इनामदार जुबेर |
| १० | जैन गिता भरत | १० | वंदना रामदास चक्रे | १० | वेतोसकर राजेश शंकर |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | अनिता जयवंत पाटील | ११ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | खण्डेलवाल सुरेश | १२ | सामंत प्रमोद जयराम |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | १३ | पांडे हंसूकुमार कमलकुमार |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | डॉ. आसिफ शेख | | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | नरेश तुकाराम पाटील | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | भोईर कमलेश यशवंत | | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | रविंद्र भिमदेव माळी | | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | वंदना मंगेश पाटील | | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | अशोक तिवारी | | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | | | | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | | | | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | | | | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | | | | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | | | | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | | | | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | | | | |
| २८ | परमार अनिता भरत | | | | |
| २९ | पाटील प्रणाली संदिप | | | | |
| ३० | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | | |
| ३१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | | |
| ३५ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | | |
| ३७ | केळुसकर प्रशांत नारायण | | | | |
| ३८ | भोईर भावना राजू | | | | |
| ३९ | मुन्ना सिंग | | | | |
| ४० | ॲड. रवि व्यास | | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७८, वाहने वाहन चालकासह भाडे तत्वावर इंधनासह (संपूर्ण सेवा) ठेक्याने घेणेकामी निविदा मागविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची एकूण ६४ वाहने असून सदरची वाहने महानगरपालिकेचे अधिकारी यांचे वापराकरीता विविध विभागात कार्यरत आहेत. अधिकारी व विविध विभाग, अत्यावश्यक सेवा इत्यादी ठिकाणी सदर वाहनांची संख्या अपूरी असल्याने सामान्य प्रशासन, मालमत्ता कराची वसुली करणेकामी, आरोग्य विभाग पल्स पोलिओ मोहिमेसाठी, आपत्कालीन सेवेकरीता व इतर विभागात आवश्यकतेनुसार खाजगी वाहने वाहन चालकासह सेवा भाड्याने घेणे आवश्यक आहे. याकामी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता ठेका वाहने पुरवठा करणे कामी दि. ०५/०३/२०१४ रोजी वार्षिक कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कार्यादेशाची मुदत दि. ०४/०३/२०१५ रोजी संपत असल्याने खाजगी गाड्या भाड्याने घेणेबाबत नव्याने निविदा मागवून ठेका निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१४-१५ या वर्षात सदर कामी मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांना जा.क्र. मनपा/वाहन/२५०/२०१३-१४ दि. ०५/०३/२०१५ अन्वये वार्षिक कार्यादेश देण्यात आलेला होता. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात खाजगी वाहने वाहन चालकासह भाडेतत्वावर (संपूर्ण सेवा) ठेका घेणे या लेखाशिर्षात १.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

मागील निविदेची मुदत मार्च २०१५ मध्ये संपुष्टात येत असून नविन निविदा मंजूर झाल्यानंतर सन २०१५-१६ मध्ये निविन अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद उपलब्ध होणार असून खाजगी गाड्या भाड्याने घेणेकरीता एक वर्षाकरीता निविदा मागविणेसाठी ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुनिला शर्मा :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद सामंत :-**

साहेब गाड्याची काय परिस्थिती आहे किती नविन गाड्या येणार आहेत? किती आल्या आहेत.

**मा. महापौर :-**

पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ७८ :-**

वाहने वाहन चालकासह भाडे तत्वावर इंधनासह (संपूर्ण सेवा) ठेक्याने घेणेकामी निविदा मागविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ७९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची एकूण ६४ वाहने असून सदरची वाहने महानगरपालिकेचे अधिकारी यांचे वापराकरीता विविध विभागात कार्यरत आहेत. अधिकारी व विविध विभाग, अत्यावश्यक सेवा इत्यादी ठिकाणी सदर वाहनांची संख्या अपूरी असल्याने सामान्य प्रशासन, मालमत्ता कराची वसुली करणेकामी, आरोग्य विभाग पल्स पोलिओ मोहिमेसाठी, आपत्कालीन सेवेकरीता व इतर विभागात आवश्यकतेनुसार खाजगी वाहने वाहन चालकासह सेवा भाड्याने घेणे आवश्यक आहे. याकामी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता ठेका वाहने पुरवठा करणे कामी दि. ०५/०३/२०१४ रोजी वार्षिक कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कार्यादेशाची मुदत दि. ०४/०३/२०१५ रोजी संपत असल्याने खाजगी गाड्या भाड्याने घेणेबाबत नव्याने निविदा मागवून ठेका निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१४-१५ या वर्षात सदर कामी मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांना जा.क्र. मनपा/वाहन/२५०/२०१३-१४ दि. ०५/०३/२०१५ अन्वये वार्षिक कार्यादेश देण्यात आलेला होता. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात खाजगी वाहने वाहन चालकासह भाडेतत्वावर (संपूर्ण सेवा) ठेका घेणे या लेखाशिर्षात १.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

मागील निविदेची मुदत मार्च २०१५ मध्ये संपुष्टात येत असून नविन निविदा मंजूर झाल्यानंतर सन २०१५-१६ मध्ये निविन अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद उपलब्ध होणार असून खाजगी गाड्या भाड्याने घेणेकरीता एक वर्षाकरीता निविदा मागविणेसाठी ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्रीम. सुनिला शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७९, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करणे.

**निलम ढवण :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भाडयाने देण्यात येत असलेल्या मालमत्तेचे भाडे हे अत्यल्प असल्याने सदर मालमत्तांची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्तेचे भाडेवाढ प्रशासनाने प्रस्तावित करुन सदर प्रस्ताव दि.२५/११/२०१४ रोजीच्या मा. महासभेपुढे ठेवला होता. मा.महासभा दि. २५/११/२०१५ ठराव क्र. ३९ अन्वये प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या मालमत्तेचे भाडे ठरविण्यासाठी प्रथम सर्व सन्माननीय गटनेत्याची बैठक बोलावून तद्नंतर प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत निर्णय झाला. त्याअनुशंगाने सुधारीत दर प्रस्तावित करीत आहे.

| अ.क्र | मालमत्ता प्रकार | सध्याचे दर प्रतिदिन | प्रस्तावित दर प्रतिदिन | प्रस्तावित केलेले दर प्रति दिन |
|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर – १६ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १०००/- |
| २ | भाईंदर (पूर्व) खारीगांव हॉल- १ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ३ | भाईंदर (प.) विनायक नगर हॉल – ०१ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १५,०००/-प्रति दिन | रु. ५०००/ |
| ४अ | नगरभवन मंगल कार्यालय (वातानुकूलीत) | - | रु. २५,०००/-प्रति दिन | रु. ६५००/- |
| | ओपन टॅरेस | रु. १५००/-प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. २०००/- |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. १०/- प्रति युनिट | रु. १५/- प्रति युनिट | रु. १५/- |
| | खुर्ची भाडे | रु. ५.००/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग | रु. ५/- |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- | रु. ५००/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. १०००/- | रु. १०००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- | रु. ५०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. ३०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (शालेय / महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/) | | | |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क(अन्य संस्था) | रु. १०/-<br>रु.१००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन |
| ६ | मैदाने (आरक्षणे व आर.जी जागा) | | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा | रु. १००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु.३०००/- प्रति दिन |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) शैक्षणिक वापरासाठी | रु. २५०/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु. १.००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. १.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ५.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न/इतर उत्सव) | रु. ०.५० प्रति चौ.फूट प्रति दिन | रु.०.५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु.१.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शेक्षणिक संस्था) | रु. २५०/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. २५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. १०००/- प्रति गेट/प्रति दिन |
| | ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. ५००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. ५००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ३०००/- प्रति /प्रति दिन |
| ९ | जैसलपार्क चौपाटीवरील मैदान (जिल्हाधिकारी यांच्या पुर्व परवानगीने) | रु.१०००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| १० | शुटींग साठी मालमत्ता / रस्ते भाडयाने देणे | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १५,०००/- प्रति दिन |
| ११ | नवघर शाळा मैदान भाडयाने देणे | | | रु. ३,०००/- प्रति दिन |
| १२ | शांतीनगर सेक्टर नं. १० मधील मैदान | | | रु. ३,०००/- प्रति दिन |
| १३ | शांतीनगर सेक्टर नं. ३ मधील मैदान | | | रु. ३,०००/- प्रति दिन |

वरील प्रमाणे भाडे व दर आकारण्यास परवानगी देण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या मालमत्ता सकाळी ८.०० ते रात्री १०.०० या वेळेतच भाड्याने द्याव्यात.

**शरद पाटील :-**

माझे ठरावाला अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एक सुचना मांडायची आहे. नवघर शाळेचे मैदान भाड्याने देण्याचे प्रयोजन केले. नवघर शाळा हे शाळेचे मैदान आहे. इथे आपली शाळा आहे. ही गोष्ट ध्यानात घेऊन सुट्टीच्या दिवसात तुम्ही द्यावे याला काही बंधन नाही. परंतु तिथे शाळा भरते, आणि शाळेच्या मुलांसाठीचे राखीव मैदान आहे त्यातूनही तुम्ही आता ठराव केला असेल मला माहित नाही. मी "ज" खाली प्रस्ताव आणून तिथे ते भाड्याने देण्याविषयी मना केली होती पण तुम्ही केला असेल ठराव तुमच्याकडे सत्ता आहे. सुट्टीच्या दिवशी द्या ना. पण आता त्यांनी रेग्युलर केल आहे की काय मला माहित नाही. तरी तुम्हाला मी सांगते तुमचा नियम बोलतोय बघा की कोणत्याही विकास योजनेच्या आराखड्यामध्ये किंवा कोणत्याही अंतिम विकास योजनेमध्ये क्रिडांगणाच्या प्रयोजनाचा राखून ठेवलेल्या नामाउद्दिष्ट केलेल्या किंवा वाटप केलेल्या राज्यशासनाच्या किंवा नियोजन प्राधिकरणाच्या ताब्यातील कोणत्याही भूखंडाच्या संदर्भात हा अधिनियम त्या-त्या वेळी अमलात आलेला असा कोणताही कायदा किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणत्याही न्याय निर्णय आदेश किंवा निर्देश किंवा विकास योजनेचा आराखडा अथवा अशी अंतिम योजना ह्यामध्ये काहीही अंतर्भूत केले तरी राज्य शासन किंवा नियोजन प्राधिकरण ह्या संदर्भात वेळोवेळी काढलेल्या आदेशान्वये ह्या आदेशामध्ये यथास्थिती राज्यशासनाने किंवा नियोजन प्राधिकरणाने विर्निदिष्ठ केलेल्या अटी व शर्तीवर एका वेळी १२ दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या आणि कोणत्याही परिस्थितीत एका कॅलेंडर वर्षामध्ये एकूण ३० दिवसापेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीसाठी कोणत्याही संघटनेला व्यक्तिच्या किंवा संघाला अशा कोणत्याही क्रिडांगणाचा वापर,

स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आणि त्या प्रकारच्या राष्ट्रीय महत्वाच्या प्रसंगावर राष्ट्रीय महापुरुषाच्या जयंतीच्या व पूण्यतिथीच्या प्रसंगी आयोजित करण्यात येणार सामारंभासाठी किंवा धार्मिक समारंभासाठी वापरायची परवानगी देऊ शकेल. म्हणजे असा वापर म्हणजे वापर अदाकरातील बदल असल्याचे मानण्यात येणार नाही. हा प्रशासनासाठी नियम सांगितला आहे.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, हा नियम बघूनच हे रेट करताना हा विचार आणि ही चर्चा झाली होती.

**प्रभात पाटील :-**

तरी सुध्दा आपण काही ठिकाणी परवानग्या दिल्या आहेत. आपण तपासून पहा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भाडयाने देण्यात येत असलेल्या मालमत्तेचे भाडे हे अत्यल्प असल्याने सदर मालमत्तांची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्तेचे भाडेवाढ प्रशासनाने प्रस्तावित करुन सदर प्रस्ताव दि.२५/११/२०१४ रोजीच्या मा. महासभेपुढे ठेवला होता. मा.महासभा दि. २५/११/२०१५ ठराव क्र. ३९ अन्वये प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या मालमत्तेचे भाडे ठरविण्यासाठी प्रथम सर्व सन्माननीय गटनेत्याची बैठक बोलावून तद्‌नंतर प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत निर्णय झाला. त्याअनुशंगाने मा. महापौर यांच्या दालनात दि. ३१/०३/२०१५ रोती सन्मा. गटनेत्यांची बैठक आयोजित करण्यात आली. तथापी सदर बैठक होऊ शकली नाही. तद्‌नंतर सदर बैठक दि. ०४/०२/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत खालील गटनेते उपस्थित होते.

१) श्री. बर्नट डिमेलो, गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
२) श्री. जुबेर इनामदार, गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस
३) श्री. राजु भोईर, गटनेता, बहुजन विकास आघाडी

| अ.क्र | मालमत्ता प्रकार | सध्याचे दर प्रतिदिन | प्रस्तावित दर प्रतिदिन | प्रस्तावित केलेले दर प्रति दिन |
|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर – १६ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १०००/- |
| २ | भाईंदर (पूर्व) खारीगांव हॉल- १ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ३ | भाईंदर (प.) विनायक नगर हॉल – ०१ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १५,०००/-प्रति दिन | रु. ४०००/ |
| ४अ | नगरभवन मंगल कार्यालय (वातानुकूलीत) | - | रु. २५,०००/-प्रति दिन | रु. ५०००/- |
| | ओपन टॅरेस | रु. १५००/-प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. २०००/- |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. १०/- प्रति युनिट | रु. १५/- प्रति युनिट | रु. १५/- |
| | व्हीडीओ शुटींग वापर आकार | रु. १००/- प्रति युनिट | रु. ३००/- प्रति युनिट | रु. १००/- |
| | खुर्ची भाडे | रु. ५.००/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग | रु. ५/- |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- | रु. २००/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. १०००/- | रु. ५००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- | रु. ५०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय / महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/) | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. १५००/- |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क(अन्य संस्था) | रु. १०/-<br>रु.१००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन |
| ६ | मैदाने (आरक्षणे व आर.जी जागा) | | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा | रु. १००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु.३०००/- प्रति दिन |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) शैक्षणिक वापरासाठी | रु. २५०/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु. १.००/- प्रति | रु. १.००/- प्रति | रु. ५.००/- प्रति |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | चौ.फूट प्रति दिन | चौ.फूट/प्रति दिन | चौ.फूट/प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न/इतर उत्सव) | रु. ०.५० प्रति चौ.फूट प्रति दिन | रु.०.५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु.१.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शेक्षणिक संस्था) | रु. २५०/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. २५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. १०००/- प्रति गेट/प्रति दिन |
| | ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. ५००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. ५००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ३०००/- प्रति /प्रति दिन |
| ९ | जैसलपार्क चौपाटीवरील मैदान (जिल्हाधिकारी यांच्या पुर्व परवानगीने) | रु.१०००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| १० | शुटींग साठी मालमत्ता / रस्ते भाडयाने देणे | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १५,०००/- प्रति दिन |

सेक्टर ,३ ६, ९ आर.जी. भाड्याने देण्यात येऊ नये. उपरोक्त तक्त्यानुसार मा. गटनेत्यांच्या झालेल्या निर्णयाप्रमाणे भाडे आकारावे असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७९ करिता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक निलम ढवण, अनुमोदन श्री शरद पाटील, दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भाडयाने देण्यात येत असलेल्या मालमत्तेचे भाडे हे अत्यल्प असल्याने सदर मालमत्तांची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्तेचे भाडेवाढ प्रशासनाने प्रस्तावित करुन सदर प्रस्ताव दि.२५/११/२०१४ रोजीच्या मा. महासभेपुढे ठेवला होता. मा.महासभा दि. २५/११/२०१५ ठराव क्र. ३९ अन्वये प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या मालमत्तेचे भाडे ठरविण्यासाठी प्रथम सर्व सन्माननीय गटनेत्याची बैठक बोलावून तद्नंतर प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत निर्णय झाला. त्याअनुशंगाने मा. महापौर यांच्या दालनात दि. ३१/०३/२०१५ रोती सन्मा. गटनेत्यांची बैठक आयोजित करण्यात आली. तथापी सदर बैठक होऊ शकली नाही. तद्नंतर सदर बैठक दि. ०४/०२/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत खालील गटनेते उपस्थित होते.

१) श्री. बर्नट डिमेलो, गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
२) श्री. जुबेर इनामदार, गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस
३) श्री. राजु भोईर, गटनेता, बहुजन विकास आघाडी

| अ.क्र | मालमत्ता प्रकार | सध्याचे दर प्रतिदिन | प्रस्तावित दर प्रतिदिन | प्रस्तावित केलेले दर प्रति दिन |
|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर – १६ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १०००/- |
| २ | भाईंदर (पूर्व) खारीगांव हॉल- १ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ३ | भाईंदर (प.) विनायक नगर हॉल – ०१ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १५,०००/-प्रति दिन | रु. ४०००/ |
| ४अ | नगरभवन मंगल कार्यालय (वातानुकूलीत) | - | रु. २५,०००/-प्रति दिन | रु. ५०००/- |
| | ओपन टॅरेस | रु. १५००/-प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. २०००/- |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. १०/- प्रति युनिट | रु. १५/- प्रति युनिट | रु. १५/- |
| | व्हीडीओ शुटींग वापर आकार | रु. १००/- प्रति युनिट | रु. ३००/- प्रति युनिट | रु. १००/- |
| | खुर्ची भाडे | रु. ५.००/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग | रु. ५/- |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- | रु. २००/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. १०००/- | रु. ५००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- | रु. ५०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय / महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/) | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. १५००/- |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क(अन्य संस्था) | रु. १०/-<br>रु.१००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मैदाने (आरक्षणे व आर.जी जागा) | | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा | रु. १००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु.३०००/- प्रति दिन |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) शैक्षणिक वापरासाठी | रु. २५०/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु. १.००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. १.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ५.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न/इतर उत्सव) | रु. ०.५० प्रति चौ.फूट प्रति दिन | रु.०.५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु.१.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शेक्षणिक संस्था) | रु. २५०/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. २५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. १०००/- प्रति गेट/प्रति दिन |
| | ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. ५००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. ५००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ३०००/- प्रति /प्रति दिन |
| ९ | जैसलपार्क चौपाटीवरील मैदान (जिल्हाधिकारी यांच्या पुर्व परवानगीने) | रु.१०००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| १० | शुटींग साठी मालमत्ता / रस्ते भाडयाने देणे | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १५,०००/- प्रति दिन |

सेक्टर ,३ ६, ९ आर.जी. भाड्याने देण्यात येऊ नये. उपरोक्त तक्त्यानुसार मा. गटनेत्यांच्या झालेल्या निर्णयाप्रमाणे भाडे आकारावे असा मी ठराव मांडत आहे. श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भाडयाने देण्यात येत असलेल्या मालमत्तेचे भाडे हे अत्यल्प असल्याने सदर मालमत्तांची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्तेचे भाडेवाढ प्रशासनाने प्रस्तावित करुन सदर प्रस्ताव दि.२५/११/२०१४ रोजीच्या मा. महासभेपुढे ठेवला होता. मा.महासभा दि. २५/११/२०१५ ठराव क्र. ३९ अन्वये प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या मालमत्तेचे भाडे ठरविण्यासाठी प्रथम सर्व सन्माननीय गटनेत्याची बैठक बोलावून तद्नंतर प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत निर्णय झाला. त्याअनुशंगाने सुधारीत दर प्रस्तावित करीत आहे.

| अ.क्र | मालमत्ता प्रकार | सध्याचे दर प्रतिदिन | प्रस्तावित दर प्रतिदिन | प्रस्तावित केलेले दर प्रति दिन |
|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर – १६ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १०००/- |
| २ | भाईंदर (पूर्व) खारीगांव हॉल- १ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ३ | भाईंदर (प.) विनायक नगर हॉल – ०१ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १५,०००/-प्रति दिन | रु. ५०००/ |
| ४अ | नगरभवन मंगल कार्यालय (वातानुकूलीत) | - | रु. २५,०००/-प्रति दिन | रु. ६५००/- |
| | ओपन टॅरेस | रु. १५००/-प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. २०००/- |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. १०/- प्रति युनिट | रु. १५/- प्रति युनिट | रु. १५/- |
| | खुर्ची भाडे | रु. ५.००/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग | रु. ५/- |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- | रु. ५००/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. १०००/- | रु. १०००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- | रु. ५०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय / महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/) | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. ३०००/- |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क(अन्य संस्था) | रु. १०/-<br>रु.१००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मैदाने (आरक्षणे व आर.जी जागा) | | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा | रु. १००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु.३०००/- प्रति दिन |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) शैक्षणिक वापरासाठी | रु. २५०/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु. १.००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. १.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ५.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न/इतर उत्सव) | रु. ०.५० प्रति चौ.फूट प्रति दिन | रु.०.५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु.१.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शेक्षणिक संस्था) | रु. २५०/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. २५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. १०००/- प्रति गेट/प्रति दिन |
| | ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. ५००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. ५००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ३०००/- प्रति /प्रति दिन |
| ९ | जैसलपार्क चौपाटीवरील मैदान (जिल्हाधिकारी यांच्या पुर्व परवानगीने) | रु.१०००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| १० | शुटींग साठी मालमत्ता / रस्ते भाडयाने देणे | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १५,०००/- प्रति दिन |
| ११ | नवघर शाळा मैदान भाडयाने देणे | | | रु. ३,०००/- प्रति दिन |
| १२ | शांतीनगर सेक्टर नं. १० मधील मैदान | | | रु. ३,०००/- प्रति दिन |
| १३ | शांतीनगर सेक्टर नं. ३ मधील मैदान | | | रु. ३,०००/- प्रति दिन |

वरील प्रमाणे भाडे व दर आकारण्यास परवानगी देण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या मालमत्ता सकाळी ८.०० ते रात्री १०.०० या वेळेतच भाड्याने द्याव्यात. सौ. निलम ढवण ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी आहेत का?

**मा. महापौर :-**

श्रीम. निलम ढवण ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४१, विरोधात २९ इतकी मते पडलेली आहेत. श्रीम. निलम ढवण ह्यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ७९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करणे.

**ठराव क्र. ८० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भाडयाने देण्यात येत असलेल्या मालमत्तेचे भाडे हे अत्यल्प असल्याने सदर मालमत्तांची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्तेचे भाडेवाढ प्रशासनाने प्रस्तावित करुन सदर प्रस्ताव दि.२५/११/२०१४ रोजीच्या मा. महासभेपुढे ठेवला होता. मा.महासभा दि. २५/११/२०१४ ठराव क्र. ३९ अन्वये प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या मालमत्तेचे भाडे ठरविण्यासाठी प्रथम सर्व सन्माननीय गटनेत्याची बैठक बोलावून तद्नंतर प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत निर्णय झाला. त्याअनुषंगाने सुधारीत दर प्रस्तावित करीत आहे.

| अ.क्र | मालमत्ता प्रकार | सध्याचे दर प्रतिदिन | प्रस्तावित दर प्रतिदिन | प्रस्तावित केलेले दर प्रति दिन |
|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर – १६ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १०००/- |
| २ | भाईंदर (पूर्व) खारीगांव हॉल- १ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ३ | भाईंदर (प.) विनायक नगर हॉल – ०१ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १५,०००/-प्रति दिन | रु. ५०००/ |
| ४अ | नगरभवन मंगल कार्यालय (वातानुकूलीत) | - | रु. २५,०००/-प्रति दिन | रु. ६५००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ओपन टॅरेस | रु. १५००/-प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. २०००/- |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. १०/- प्रति युनिट | रु. १५/- प्रति युनिट | रु. १५/- |
| | खुर्ची भाडे | रु. ५.००/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग | रु. ५/- |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- | रु. ५००/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. १०००/- | रु. १०००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- | रु. ५०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय / महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/) | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. ३०००/- |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क(अन्य संस्था) | रु. १०/-<br>रु.१००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन |
| ६ | मैदाने (आरक्षणे व आर.जी जागा) | | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा | रु. १००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु.३०००/- प्रति दिन |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) शैक्षणिक वापरासाठी | रु. २५०/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु. १.००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. १.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ५.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न/इतर उत्सव) | रु. ०.५० प्रति चौ.फूट प्रति दिन | रु.०.५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु.१.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शेक्षणिक संस्था) | रु. २५०/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. २५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. १०००/- प्रति गेट/प्रति दिन |
| | ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. ५००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. ५००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ३०००/- प्रति /प्रति दिन |
| ९ | जैसलपार्क चौपाटीवरील मैदान (जिल्हाधिकारी यांच्या पुर्व परवानगीने) | रु.१०००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| १० | शुटींग साठी मालमत्ता / रस्ते भाडयाने देणे | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १५,०००/- प्रति दिन |
| ११ | नवघर शाळा मैदान भाडयाने देणे | | | रु. ३,०००/- प्रति दिन |
| १२ | शांतीनगर सेक्टर नं. १० मधील मैदान | | | रु. ३,०००/- प्रति दिन |
| १३ | शांतीनगर सेक्टर नं. ३ मधील मैदान | | | रु. ३,०००/- प्रति दिन |

वरील प्रमाणे भाडे व दर आकारण्यास परवानगी देण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या मालमत्ता सकाळी ८.०० ते रात्री १०.०० या वेळेतच भाड्याने द्याव्यात.

**सुचक :- सौ. निलम ढवण** **अनुमोदन :- श्री. शरद पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | शिल्पा भावसार | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | **निरंक** |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसानी | ८ | पाटील वंदना विकास | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | प्रभात प्रकाश पाटील | |
| १० | जैन गिता भरत | १० | पाटील सुनिता कैलास | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | विराणी रेखा अनिल | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | वंदना रामदास चक्रे | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | अनिता जयवंत पाटील | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | काझी रशीदा जमील | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | इनामदार जुबेर | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | वेतोसकर राजेश शंकर | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | सामंत प्रमोद जयराम | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | खण्डेलवाल सुरेश | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | २५ | डॉ. आसिफ शेख | |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | २६ | नरेश तुकाराम पाटील | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | २७ | भोईर कमलेश यशवंत | |
| २८ | परमार अनिता भरत | २८ | रविंद्र भिमदेव माळी | |
| २९ | पाटील प्रणाली संदिप | २९ | वंदना मंगेश पाटील | |
| ३० | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३५ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३७ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३८ | भोईर भावना राजू | | | |
| ३९ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४० | मुन्ना सिंग | | | |
| ४१ | ॲड. रवि व्यास | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८०, छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर विविध ठिकाणी उड्डाणपुल बांधणे व पादचारी पुल बांधणेच्या सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत.

**रोहिदास पाटील :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ हा प्रमुख रस्ता असून सदर रस्त्यावर एकूण ०८ ठिकाणी सिग्नल आहेत. सदर रस्त्यावर वाहतूकीचा प्रचंड ताण असल्याने सकाळ व संध्याकाळच्या वेळेस वाहतूकीचा खोळंबा होत असतो. सदर रस्त्यावर ०६ ठिकाणी उन्नत मार्ग व दोन ठिकाणी पादचारी पुल बांधणेसाठी रू. ३७.८२ कोटी रकमेच्या खर्चास मा. महासभा दि. १९/०७/२०१४ ठराव क्र. २९ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आलेली आहे.

तद्नंतर सदर कामासाठी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सर्वप्रथम अनुदान उपलब्ध करून घेण्यास व अनुदान उपलब्ध होत नसल्यास शासकीय / निमशासकीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध करून घेण्यास मा. महासभा दि. २५/११/२०१४ ठराव क्र. ४० अन्वये मा. महासभेने मान्यता दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदर प्रस्तावानुसार मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाकडे पत्र व्यवहार करून पाठपुरावा केला असता, त्यांनी अनुदान देण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. सदर रस्त्यावर उन्नत मार्ग, पादचारी पुल, अंडर पास बांधणे बाबत मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण, (MMRDA) महाराष्ट्र रज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांच्यासोबत सन्माननीय स्थानिक खासदार, आमदार यांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात आल्या. सदर बैठकीमध्ये झालेल्या सूचनेनुसार व भविष्यातील सदर रस्त्यावरील वाढणारी वाहतूक लक्षात घेता खालीलप्रमाणे सुधारीत कामे खर्चासह प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१) भाईंदर (पूर्व) भागातील वाहनांना जाण्यासाठी वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) व दिपक हॉस्पीटल जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रिज) बांधणे.
२) सिल्व्हर पार्क जंक्शन, हटकेश जंक्शन व. प्लेझंट पार्क जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे.
३) एस. के. स्टोन जंक्शन, कनकिया जंक्शन व शिवार उद्यान जंक्शन (एन.एच. हायस्कुल रस्ता व सरदार पटेल रस्ता) या ठिकाणी एक उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे.
४) काशिमिरा नाका येथे पादचारी पुल बांधणे.

वरील सुधारीत कामांसाठी रू. ३८०.९१ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावित कामांसाठी दोन ते तीन वर्ष कालावधी लागेल. सदर कामांसाठी कर्ज उपलब्ध होऊ शकेल. तरी वरील कामांच्या सुधारीत खर्चास व आवश्यक रकमेचे कर्ज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अथवा इतर शासकीय, निमशासकीय संस्थेकडून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. दिपक हॉस्पीटल जंक्शन व गोल्डन नेस्ट जंक्शन येथे फ्लायओव्हर बांधण्यासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार निविदा प्रक्रिया करण्यात याव्यात व सदर काम करण्यास जास्त कालावधी लागणार असल्याने या कामाकरीता रक्कम कमी पडल्यास त्यासाठी पुर्नविनियोजन करावे, असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुनिला शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम, आपण ठराव मांडून त्याला मान्यता दिली आहे. परंतु काशिमिरा हे मिरा भाईंदरचे प्रवेशद्वार आहे आणि तेथे शिवाजी महाराजांचा अश्वरूढ पूतळा आहे. त्या ठिकाणी दोन्ही साईडने झालेली अतिक्रमणे आणि जो सर्व्हिस रोड व्हायचा होता तो आजमितीस झालेला नाही. माझी आपणाला सुचना राहणार आहे की ह्या माध्यमातून जी काम करणार आहोत. तत्पूर्वी त्या प्रवेशद्वाराच्या आजूबालूला जी अतिक्रमण झाली आहेत ती पूर्णतः हटवण्यात यावी. आणि आपला काशिमिरा ते गोल्डन नेस्टपर्यंतचा जो सर्व्हिस रोड आहे तो पूर्णतः रिकामी करण्यात यावा अशी मी मा. महापौरांना विनंती करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब आपण हा गोषवारा दिलेला आहे. १९/०७/२०१४ च्या महासभेमध्ये. ३७.८२ कोटी रक्कमेच्या ६ उन्नत पूल व २ पादचारी पूलाला आम्ही मान्यता दिलेली होती. आज मार्च २०१५ आहे म्हणजे ७-८ महिने ते आणि चार महिने हे ह्या ७-८ महिन्याच्या कालावधीमध्ये २५६.३४ कोटीची वाढ झाली आहे. २५/११/२०१४ मध्ये पून्हा महासभेने त्यांना कर्ज घ्यायची मान्यता दिली होती. ह्याच्यानंतर एम.एम.आर.डी.ए ची मिटीं झाली त्या बैठकीमध्ये सुचना केली की १,२,३,४ जे आपण गोषवाऱ्यामध्ये म्हटले आहे त्याप्रमाणे येणार. आपले जे बांधकाम डिपार्टमेंट आहे ते जे इंजिनियर आहेत ते निष्णात नाही का? त्यांना अगोदर कळल नव्हत का? त्यांनी पण सर्व्हे केला होता एका प्रतिष्ठित कंपनीकडून सर्व्हे केला होता आणि त्या सर्व्हेसाठी लाखो रुपये त्यांनी दिले होते. त्याप्रमाणे ३७.८२ कोटीचा प्रस्ताव आला आणि आज ७ ते ८ महिन्यांमध्ये २५६ कोटीचा प्रस्ताव आलेला आहे. साहेब त्याच्यात असे म्हटले आहे दिपक हॉस्पीटल जंक्शन, सिल्व्हर पार्क जंक्शन, प्लेझंट पार्क जंक्शन ह्यांचे अंडरपास आणि पुन्हा वरती म्हटले आहे भाईंदर (पूर्व) भागातील वाहनतळ वीर सावरकर व गोल्डन सर्कल व दिपक हॉस्पीटल जंक्शन येथे उन्नत मार्ग म्हणजे पहिल्यामध्ये पण दिपक हॉस्पीटलला उन्नत मार्ग म्हटले आहे आणि खाली पण म्हटले आहे अंडरपास बांधले आहे. साहेब ह्या ७ ते ८ महिन्यांच्या कालावधीमध्ये आपल्या बांधकाम विभागाने २५६ कोटीची केली आहे ह्यांना अगोदर सुचले नव्हते का? त्यावेळी त्यांनी का नाही आणले आणि आज प्रस्ताव आलेला आहे. मा. आयुक्त साहेब ह्याचा खुलासा करा?

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, ह्या अगोदर ७ अंडरपास बांधण्याचे निर्णय घेतले होते पण बजेटमध्ये तरतूद नव्हती म्हणून कामाला सुरुवात झाली नाही. ज्या एजन्सिला काम दिली त्यांनी जी काम केली ती बरोबर आहेत. अधिकाऱ्यांनी आपले काम केले. मधल्या काळात तत्कालीन आयुक्तांकडे आम्ही निवेदन केले होते की शिवार गार्डन इकडे एक ब्रिज बांधायचा तो उतरला नाही की मॅग्डॉनल्डला सुरु होणार मॅग्डलॉनल्डचा संपला नाही की एस.के.स्टोनचा सुरु होणार आणि भविष्यात हा ब्रिजच आपल्याला अडचणीचा निर्माण होणार कारण ते उतरुन जाणार कसे मग तो अजून एक मोठा प्रॉब्लेम होणार आहे. आता बदल केला आहे की गोल्डन नेस्ट सिग्नल ते दिपक हॉस्पीटल हा एकच कराव. शिवार गार्डन ते एस.के.स्टोनपर्यंत एकच ब्रिज करावा. प्लेझंट पार्कला एकच सिग्नल आहे, सिल्वर पार्क तिकडे एकच आहे त्या ठिकाणी अंडरपास करावे हे बदल केल्यामुळे

फिगर चेंजेस झाले. पण हे भविष्यातल्या दृष्टीकोनातून बघितले हे करणे गरजेचे आहे. लॅन्डींग आणि परत चढण ज्यावेळी गाड्या बाहेर पडतील त्यावेळी मोठ्या प्रमाणात नुकसान होईल. कारण गाड्या सर्व्हिस रोडनी येणार त्यापण ब्रिजवर चढणार आणि उतरणारे असे जाणार त्यांना मोठा प्रॉब्लेम होणार आहे. दोघांमध्ये डिव्हायडर ठेवायला लागणार ब्रिज उतरल्यावर राईट लेफ्ट जाता येणार नाही. आपण हा ब्रिज केल्यावर आपल्याला बाहेर जाता येईल. सन्मा. प्रशांत दळवीजीने उपस्थित केले ते ह्यावरती बजेटमध्ये आपण प्रस्तावित केले आहे. सर्व्हिस रोडसाठी साधारण ७ कोटी. ज्या अधिकाऱ्याने ही माहिती दिलेली आहे ते ह्यापूर्वी ह्या कंपनीने केलेले आहे. ते दोन्ही बरोबर आहे. आता बदल केल्यामुळे ती कॉस्ट वाढलेली आहे. दिपक हॉस्पीटल दोनदा ठरावात चूक झाली आहे. ठराव मांडताना आम्ही एकच मांडले आहे. गोल्डन नेस्ट ते दिपक हॉस्पीटल शिवार गार्डन ते एस.के.स्टोन, प्लेझंट पार्क, सिल्वर पार्क.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला ह्याच्यावर सुचना मांडायची आहे. आम्ही पण पत्र दिलेले आहे. प्लेझंट पार्कपासून संघवी नगर, सिल्वर पार्क मा. महापौर मॅडम ह्यांची सुचना घ्यावी आम्ही पत्र दिले आहे. ते ह्याच्यात नमूद करुन घ्यावे. ही माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एक सुचना आहे की जशी प्रशांत दळवीनी सुचना मांडली की काशिमिरा नाका हे आपले प्रवेशद्वार आहे. खांबित साहेब समोर आहेत दोन वर्षांपूर्वी मी सुचना मांडली होती त्या प्रवेशद्वारावर तत्कालीन नगरपालिका असताना आपण शिवरायाचा पूतळा उभा केला आहे. वरुन फ्लाय ओव्हर गेल्यामुळे पूतळा खूप खाली गेला आहे. आपली ती दर्शनी बाजू आहे. आपल्या शहराचे प्रवेशद्वार आहे अशा वेळी त्या पूतळ्याची हाईट ऊंचावणे गरजेचे आहे कारण पूतळा खूप खाली गेला आहे. उर्वरित कामे करताना त्याची सुध्दा ऊंची वाढवण्यात यावी. गेल्या वर्षीच्या बजेटमध्ये त्याची तरतूद केली होती. ते सुध्दा काम ध्यानात घ्यावे.

**दिपक खांबित :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, एकूण ६ ठिकाणी उन्नत मार्ग आणि २ ठिकाणी अंडरपास पादचारी पूल प्रस्तावित केले होते. त्यानंतर आपण महासभेमध्ये लोन करता आलो होतो. त्यावेळेला महासभेने सांगितले की तुम्ही अनुदानाकरिता एम.एम.आर.डी. कडे जा त्या अनुशंगाने आम्ही एम.एम.आर.डी. ला प्रस्ताव सादर केला एम.एम.आर.डी. च्या अधिकाऱ्यांनी प्रस्ताव दिला तेव्हा त्याच्याबरोबर आमच्या कन्सल्टंटची चर्चा झाली. त्यावेळी ही सुचना केली की तुम्ही भविष्यातली वाहने लोकसंख्या विचारात घेता हे अंडरपास जे आहेत त्याच्याऐवजी तुम्ही उन्नत मार्ग बांधा. एम.एम.आर.डी चे अधिकारी आले होते तेव्हा हे ठरले. जेणेकरुन एस.केस्टोन आहे एस.के स्टोन आणि जंक्शन जे आहे तो असा क्रॉस आहे. त्यामुळे तो अंडरपास क्रॉस असा बसत होता. पूनम गार्डनला एक अंडरपास आणि पोलिस चौकीच्या इकडून एस.के.स्टोनला जाणारा हे दोन्ही क्रॉस होत होते. भविष्यात जर मिरारोडला ट्रॅफिक वाढली तर तो अंडरपास आहे तो एक्सस्टेन करता आला नसता हे तीन जंक्शन म्हणून फ्लाय ओव्हर प्रस्तावित केला आहे. त्यानंतर भाईंदर पूर्वेला जाण्याकरिता गोल्डन नेस्ट सर्कल जो आहे तिथे आपण काहीच घेतले नव्हते. भाईंदर पूर्वची जी पब्लिक आहे त्याची वाहन जी आहे ती सरळ जाण्याकरिता आपण दिपक हॉस्पीटल पासून गोल्डन नेस्टपासून असा संपूर्ण ब्रिज घेतला. म्हणजे भाईंदर पूर्व कडील लोक सरळ जाऊ शकतील त्यामुळे हा खर्च वाढलेला आहे. दरम्यानच्या काळामध्ये नागपूर अधिवेशनामध्ये ह्यावर एम.एम.आर.डी ची, एम.एम.आर.डी. ए एकनाथ शिंदे साहेब ह्यांच्याकडे बैठक झाली. त्या बैठकीत लाखे साहेबांनी प्रेझेन्टेशन दिले होते. त्या अनुषंगाने २-३ मिटिंग झाल्या आणि त्यामध्ये ठरल्यानुसार ट्रॅफीकचा फ्लो लक्षात घेऊन आपण हे रिव्हाईज इस्टीमेंट केले आहे आणि ते मान्यतेकरिता आपल्याकडे सादर केले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्हाला २५ वर्ष झाली तुम्हाला प्रशासनाचा अनुभव आहे. साहेब ७ ते ८ महिन्यामध्ये ३६ कोटी वरुन २५६ कोटी इस्टीमेट वाढते. साहेब आमचा दुसरा मुद्दा ह्यांनी कन्सल्टंट अपॉइंट केला होता कन्सल्टंट आपण कशाला अपॉइंट करतो तो निष्णात असेल, जो टेक्नीकली कॉलिफाईड आहे, जो हुशार आहे मग त्यांनी त्यावेळी अभ्यास केला नाही. आपला पैसा वेस्ट गेला. साहेब एम.एम.आर.डी.ए च्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, तुम्ही फ्लाय ओव्हर ब्रिज बांधा. एम.एम.आर.डी.ए चे अधिकारी फुकट सल्ला देतात आणि ह्या कन्सल्टंटला लाखो रुपये फी भरतो. ह्याला जबाबदार कोण?

**दिपक खांबित :-**

कन्सल्टंटला आपण पैसे दिले नाहीत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कन्सल्टंटनी तुम्हाला फ्री मध्ये ॲडव्हाईज दिले.

**दिपक खांबित :-**

साहेब आधी ते सबवे होते ते आता फ्लाय ओव्हर ब्रिज झाले आहे. फ्लाय ओव्हर ब्रिज आणि त्याच्यात फरक आहे ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय असा आहे आम्ही कॉमर्स ग्रॅज्यूएट आहोत आणि ते इंजिनियर आहेत. त्याच्यामुळे त्यांना इस्टीमेटचे नॉलेज आहे. परंतु तुम्ही डीपमध्ये जा आजची महासभा झाल्यावर तुम्ही कन्सल्टंटला जे पैसे अदा केले आहे.

**दिपक खांबित :-**

कन्सल्टंटला पैसेच दिले नाहीत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब तुम्ही हे एक्सेप्ट करु शकता का? एखादा कन्सल्टंट फ्रि मध्ये आपल्यासाठी सर्व्हे करुन शकतो का? एखादा कन्सल्टंट बूकलेट देऊ शकतो का? मागच्या महासभेमध्ये बाकायदा बूकलेट आली होती. आम्हालाही कळते अंडरपास झाल्यानंतर आपण दुसरा ब्रिजवर कसा जोडू शकतो. ह्यांना कळले नाही का? महासभेमध्ये आपले आमदार साहेब पण होते. मग त्यांना त्यावेळी सुचले नाही का? साहेब आम्ही त्यांच्या डेप्यूटी इंजिनियरला सांगितले होते आपण जर एक ब्रिज बनवला तर आपला फायदा होईल. जर प्लेझंट पार्कवरुन एक ब्रिज बनवला तर तो डायरेक्ट गोल्डन नेस्ट सर्कलला उतरला तर बहुतेक ट्रॅफिक कमी होईल. शिवार गार्डन, एस.के.स्टोन कनाकिया सिग्नल तिकडे आपण फ्लाय ओव्हर ब्रिज बांधला तरी इमेजिएटली उतरल्यावर आपण दिपक हॉस्पीटलला उतरतो. तीन सिग्नल आपण क्रॉस करुन उतरतो म्हणजे शिवार गार्डनच्या पूढे उतरणार. लगेच उतरणार नाही थोडे पूढे उतरणार आणि दिपक हॉस्पीटलचे सिग्नल इमेजिएटली येतो. मा. आयुक्त साहेब हा विषय चांगला आहे. आणि ह्याची गरज पण आहे. परंतु आपल्या बांधकाम डिपार्टमेंटचे पितळ उघडे झालेले आहे. त्यांनी जुलै २०१४ ला ३४ कोटी दिले आणि २०१५ ला २५६ कोटी ही खूप मोठी तफावत आहे. तुम्ही डीपमध्ये जा ह्या ठरावाला आमचा विरोध नाही. आमचे समर्थन आहे. परंतु तुम्ही चौकशी करा.

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्त साहेब हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. ३६ कोटीचे काम आठ महिन्यात २५६ कोटीवर गेले. हा विषय तुम्हाला गंभीर वाटत नाही का? ह्या प्रकरणाची चौकशी करा.

(सभागृहात गोंधळ)

**प्रकरण क्र. ८० :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर विविध ठिकाणी उड्डाणपुल बांधणे व पादचारी पुल बांधणेच्या सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ८१ :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ हा प्रमुख रस्ता असून सदर रस्त्यावर एकूण ०८ ठिकाणी सिग्नल आहेत. सदर रस्त्यावर वाहतूकीचा प्रचंड ताण असल्याने सकाळ व संध्याकाळच्या वेळेस वाहतूकीचा खोळंबा होत असतो. सदर रस्त्यावर ०६ ठिकाणी उन्नत मार्ग व दोन ठिकाणी पादचारी पुल बांधणेसाठी रू. ३७.८२ कोटी रकमेच्या खर्चास मा. महासभा दि. १९/०७/२०१४ ठराव क्र. २९ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आलेली आहे.

तद्‌नंतर सदर कामासाठी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सर्वप्रथम अनुदान उपलब्ध करून घेण्यास व अनुदान उपलब्ध होत नसल्यास शासकीय / निमशासकीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध करून घेण्यास मा. महासभा दि. २५/११/२०१४ ठराव क्र. ४० अन्वये मा. महासभेने मान्यता दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदर प्रस्तावानुसार मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाकडे पत्र व्यवहार करून पाठपुरावा केला असता, त्यांनी अनुदान देण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. सदर रस्त्यावर उन्नत मार्ग, पादचारी पुल, अंडर पास बांधणे बाबत मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण, (MMRDA) महाराष्ट्र रज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांच्यासोबत सन्माननीय स्थानिक खासदार, आमदार यांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात आल्या. सदर बैठकीमध्ये झालेल्या सूचनेनुसार व भविष्यातील सदर रस्त्यावरील वाढणारी वाहतूक लक्षात घेता खालीलप्रमाणे सुधारीत कामे खर्चासह प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१) भाईंदर (पूर्व) भागातील वाहनांना जाण्यासाठी वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) व दिपक हॉस्पीटल जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रिज) बांधणे.
२) सिल्व्हर पार्क जंक्शन, हटकेश जंक्शन व. प्लेझंट पार्क जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे.
३) एस. के. स्टोन जंक्शन, कनकिया जंक्शन व शिवार उद्यान जंक्शन (एन.एच. हायस्कुल रस्ता व सरदार पटेल रस्ता) या ठिकाणी एक उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रीज) बांधणे.
४) काशिमिरा नाका येथे पादचारी पुल बांधणे.

वरील सुधारीत कामांसाठी रू. ३८०.९१ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावित कामांसाठी दोन ते तीन वर्ष कालावधी लागेल. सदर कामांसाठी कर्ज उपलब्ध होऊ शकेल. तरी वरील कामांच्या सुधारीत खर्चास व आवश्यक रकमेचे कर्ज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अथवा इतर शासकीय, निमशासकीय संस्थेकडून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. दिपक हॉस्पीटल जंक्शन व गोल्डन नेस्ट जंक्शन येथे

फ्लायओव्हर बांधण्यासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार निविदा प्रक्रिया करण्यात याव्यात व सदर काम करण्यास जास्त कालावधी लागणार असल्याने या कामाकरीता रक्कम कमी पडल्यास त्यासाठी पुर्नविनियोजन करावे, असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्रीम. सुनिला शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८१, भाईंदर (पूर्व) खारीगाव मासळी मार्केट इमारतीच्या जागेचा मोबदला देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**रोहिदास पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) खारीगांव येथे तळमजल्याची इमारत असून सदर इमारत सन १९८५ पूर्वी पासूनची आहे. सदर ठिकाणी तळ अधिक एक मजल्याची इमारत बांधण्याचे काम मंजूर झालेले आहे. मौजे खारी, स.क्र.१३९(जुना), ५३ (नवा) हि.क्र.८ हा ८८०.०० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील यांचे नावे नोंद आहे. त्यापैकी ११०.०० चौ.मीटर जागा ही मार्केट इमारतीच्या खालील आहे. इमारती खालील उर्वरीत २३०चौ.मीटर जागेची नोंद खारी पाड्याचे स्मशान नावाने आहे. सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट होत आहे. सदर जागा मालकांनी सदर जागेचा मोबदला देईपर्यंत सदर मार्केट इमारतीचे नूतनीकरण करू नये म्हणून महानगरपालिकेकडे हरकत नोंदवलेली आहे. सदर जागेपैकी ११०.०० चौ. मीटर क्षेत्राते जागा मालक श्री. तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील त्यांनी सदर जागेचे चालू बाजारभावानुसार (रेडी रेकनर) जागेची किंमत देण्याची मागणी केलेली आहे. रेडी रेकनर नुसार जागेची किंमत रू. २५,८५,०००/- (अक्षरी रूपये पंचवीस लक्ष पंच्याऐंशी हजार मात्र) एवढी होत आहे. सदर जागेची मोजणी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, ठाणे यांच्याकडून करून घेण्यात आलेली आहे. सदर जागेवर मार्केटची पुर्नबांधणी करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यासाठीचे निर्णय व अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत.

**कल्पना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब हा गोषवारा खूप जूना आहे. त्याच्यावर शितोळे साहेबांची सही आहे. त्याच्यानंतर लाखे साहेब येऊन गेले आता तुम्ही ह्या गोषवाऱ्यावर तुमचा अभिप्राय पाहिजे की तुम्ही सहमत आहात का?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर मॅडम, आता जो सन्मा. सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. मागे आपल्याकडे ॲडीशनल कमिशनर शितोळे साहेब सध्या पण कार्यरत आहेत पण आता ते रजेवर आहेत. त्यांच्याकडे आयुक्त पदाचा कार्यभार होता. त्या कालावधीत त्यांनी प्रस्ताव पाठवलेला खुर्चीवरचे नाव बदलले म्हणून तो चुकीचा प्रस्ताव नाही तो आपल्याच महानगरपालिकेचा प्रस्ताव आहे. तो त्यांनी आयुक्ताच्या कॅपेसिटीमध्ये पाठवलेला प्रस्ताव आहे. परंतु त्यानंतर बैठक लागली नाही त्यामुळे ह्या बैठकीमध्ये हा प्रस्ताव आलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही हा गोषवारा वाचला का? तुम्ही ह्या मताशी सहमत आहात का?

**मा. आयुक्त :-**

आयुक्तांनी सही करुन दिलेला म्हणजे मला ह्या खुर्चीवर बसले म्हणजे मानणारच.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

विषय असा आहे की अशा बऱ्याच केस झाल्या आहेत. मागच्या आयुक्तांनी सही केली .............

**मा. आयुक्त :-**

असे काही होणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणून विचारले तुम्ही ह्याच्याशी सहमत आहात ना.

**मा. आयुक्त :-**

जो प्रस्ताव दिला आहे त्याच्याशी मी ..................

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये फक्त खारीगावमध्ये हे एकच मार्केट नाही आहे असे मिरा भाईंदर मध्ये अनेक ठिकाणी मार्केट आहेत गार्डन आहेत. काही पालिकेच्या इमारती आहेत त्या लोकांना आपल्याला

मोबदला द्यायला लागेल. तुम्ही त्यांना पैसे देणार का? मग असे सगळे प्रस्ताव एकत्र का नाही आणले. आमचे सदस्य बर्नड डिमेलो ह्यांच्या प्रभागात सुध्दा असा प्रस्ताव आहे.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महापौर मॅडम हा जो खारीगाव मासळी मार्केट इमारती जागेचा मोबदला देण्याचा ठराव आलेला आहे जर हा ठराव देत असाल तर सर्वांचे एकत्र घ्या कारण उत्तन मार्केटमध्ये ग्रामपंचायत काळापासून एक डॉमणिक परेरा ह्यांची जमिन त्यांनी ५० रुपये भाड्याने ग्रामपंचायतीला दिली होती. नगरपालिका झाल्यानंतर त्यांचे भाडे तर बंद झालेच पण तिथे जे गाळे आणि दुकाने असलेल्या जागेवर अतिक्रमण बसलेले आहे. त्या मालकाची जागा मोकळी होत नाही आणि त्यांना कूठूनच भाडे मिळत नाही. जर ह्या गोष्टीला आपण मान्यता देत आहोत तर सर्व मार्केटचा महानगरपालिकेनी सर्व्हे करावा. ग्रामपंचायत काळापासून कोणी मार्केट भाड्यानी दिली आहेत जागेचे मालक आहेत ग्रामपंचायत आणि लोकांसाठी नागरी सुविधा आणि लोकांना सोय व्हावी शेतक-यांना त्यांचा माल विकता यावा मच्छीमारांना त्यांची मासळी विकता यावी म्हणून दानशूर व्यक्ती ग्रामपंचायतला जागा देते ती जागा हडप केली जाते ती मोकळी होत नाही. हा जर प्रस्तावाचे मी स्वागत करीन ह्याच पध्दतीने मिरा भाईंदरच्या सगळ्या वॉर्डामध्ये कोणाकोणाची गोरगरिबांची किंवा श्रीमंतांची ज्या-ज्या जमिनी आहेत त्यांचा पण विचार व्हावा. त्यांना मोबदला द्या किंवा खाली करुन द्या. ह्याच्या बाबतीत जसा विचार करता तसा सर्व मार्केटचा विचार करावा अशी माझी विनंती.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, ह्या ठिकाणी जो विषय आलेला आहे. सन १९८५ पूर्वी सन्मा. ज्यांनी आपल्या तत्कालीन नगरपरिषदेच्या वेळी मार्केटसाठी भूखंड दिलेला आहे. माझे असे म्हणणे आहे की, ह्या ठिकाणी जसे सन्मा. बर्नड डिमेलो ह्यांनी सांगितले त्याप्रमाणे बरेच प्रस्ताव आपल्या मिरा भाईंदरमध्ये विविध भागात आहेत. कोणी पाण्यासाठी टाकी दिलेली आहे कोणी गार्डनसाठी जागा दिली आहे. कोणी रस्ता रुंदीकरणासाठी जागा दिलेली आहे तर सगळ्यांचे प्रस्ताव आपण एकत्रित करणार का हा पहिला मुद्दा. दुसरा मुद्दा जे सन्मा. दानशूर व्यक्ती आहेत तेव्हा त्यांनी सांगितले असेल दानशूर म्हणून तिकडे त्याचे नाव लौकीक पण झाले असेल त्या भागातील लोकांना चांगले मार्केट उपलब्ध व्हावे म्हणून मी जागा देत आहे. माझी अशी विनंती आहे की अशा प्रकारचा प्रस्ताव आणणे म्हणजे महानगरपालिकेच्या निधीचा अपव्यव आहे आणि नियमाच्या विरुध्द संपूर्ण प्रकार आहे. म्हणजे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान ह्या ठिकाणी होते असे स्पष्टपणे दिसून येते. माझे असे मत आहे की सन्मा. सदस्यांचे नाव म्हणजे ज्यांनी ही जागा आपल्या महानगरपालिकेला मार्केट बांधण्यासाठी दिलेली आहे त्या इमारतीला त्या सन्मा. सदस्याचे नाव तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील ह्यांची नोंद घ्या आणि त्या इमारतीला त्याचे नाव देऊन टाका. हे एक चांगले सोल्यूशन आहे आणि आपल्या महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही. त्यामध्ये आपण अडकणार नाहीत आणि आपले सन्मा. सदस्य अडकणार नाहीत. कारण अशी बरीच प्रकरण आपल्या महानगरपालिकेत येत गेली आहेत. तर निश्चितपणे ह्यांची शासन स्तरावर चौकशी होईल पूर्ण बरखास्तीची पाळी आपल्यावर येईल असा हा संपूर्ण प्रकार टाळण्यासाठी हा सदरचा भूखंड ताब्यात घेऊन विकसीत करा आणि कोणताही मोबदला न देता त्या इमारतीवर त्यांचे नाव कुठे जागा असेल तिकडे बांधकाम करावे टी.डी. आर देऊन टाकावा. टी.डी.आर. द्यायची पध्दत आपल्याकडे आहे. टी.डी.आर आपण देऊ शकतो. ह्या प्रकरणावर गंभीरतेने विचार विनिमय करुन निर्णय घ्यावा.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्यांनी मांडलेले विचार महानगरपालिकेच्या नागरिकांच्या हिताचे असणे गरजेचे आहेत त्यांनी आपली महानगरपालिकेनी किंवा परिषदेने त्यावेळची वास्तविकता त्यावेळची परिस्थिती ओळखून जागा घेतली वहीवाटीला लोक बसायला लागले त्याबद्दल त्यांचे ऑब्जेक्शन घेतले. ऑब्जेक्शन घेतल्यानंतरही गरज आहे म्हणून लोक बसायला लागले शेड झाले त्यानंतर त्या मालकांनी मागणी केलेली आहे ही माझी जागा आहे. आपण केलेला प्रस्ताव त्याच्यामुळे ते अडून राहीले आहेत. त्या ठिकाणी मार्केटची अवस्था इतकी गंभीर आहे की लोक बसू शकत नाही. आपण स्वच्छता अभियान राबवतो ज्या ठिकाणी स्वच्छता अभियान करतो त्याला आपण महत्व देतो. मा. महापौर मासळी खात नाही मला माहित आहे. मी मासळी खातो, मासळी घ्यायला जाणारी व्यक्ती पाच मिनिट उभी राहते ती मा. महापौर मॅडम म्हणते काय घाण आहे. मासळी विकणारी बाई त्याच्यात पाच तास बसते ती कशी बसते. त्याचा आरोप आहे की नाही. ते मासळी मार्केट चांगले होणे गरजेचे आहे. मासळी मार्केट चांगले व्हावे म्हणून आपल्या महानगरपालिकेने त्याचा पूर्ण नकाशा तयार केला. इस्टीमेट बनवले. विक्रम कुमार साहेब आयुक्त असताना हा विषय चालू झाला. वेगवेगळी पत्र देत राहीलो पत्र घेत राहीलो. शेवटची कंडीशन त्याच्यावर टाकली की टी.आय.एल.आर करुन आणावा त्या शेतक-याने त्याच्यासाठी सात हजार खर्च करुन टी.आय.एल.आर. दिला. आपण दुसरीकडे कुठेही मागितला नाही. मोठ्या विकासकाचे प्रपोजल येते त्याचाही टी.आय.एल.आर. आपण मागत नाही. हे मी खात्रीने सांगतो. आधी पण मी तुम्हाला बोललेलो आहे. तुमच्याकडे उदाहरण आहे. आणि टी.आय.एल.आर. झाल्यानंतर हा आता प्रशासनाने नीट तपासून बघावे ह्याच्यात कोणतेही काळंगोर नाही. ज्यांनी मागणी केली आहे त्यांना आपण पैसे देतो हे विकासकाचे धार्जिण आहेत. विकासकानी टी.डी.आर मागितला तर त्या जागेचा आपण टी.डी.आर देतो. हा गरिब शेतकरी मागतो त्याला देत नाही का? तो शिकला नाही म्हणून. आम्ही प्रतिनिधी ह्यासाठी तर शेतक-यांनी त्या टायमाला त्या परिस्थितीत जमिन दिली असेल रितसर त्यांनी डॉक्युमेंट दिली.

मा. आयुक्तांची खात्री पटली तर त्यांना नुकसान भरपाई द्यायला पाहिजे. टी.डी.आर द्या किंवा किंमत द्या काही द्या पण द्यायला पाहिजे ह्या स्पष्ट मताचे आम्ही आहोत असे नाही की आता जो आला आहे त्याला अक्कल होती आणि पहिला होता त्याला अक्कल नव्हती. ह्या बाबतीत संपूर्ण सभागृह एकदम असले पाहिजे. त्या वेळच्या गरजेनुसार महानगरपालिकेला किंवा परिषदेला लोकांनी मदत केली आजच्या गरजेनुसार महानगरपालिकेची स्थिती आहे त्यांनी त्यांना मोबदला दिला पाहिजे.

**नरेंद मेहता :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटीलनी प्रश्न मांडला. बर्नडजीनी मांडला, काकांनी आपली भुमिका मांडली एका शहरात दोन न्याय नक्कीच होऊ शकत नाही. त्या जागेचा मोबदला द्यायचा असेल तर ज्या-ज्या ठिकाणी आपल्या महानगरपालिकेनी इकडच्या स्थानिक नागरिकांच्या जमिनिवर काही बांधले असेल तर आपल्याला सर्वांना द्यायला लागेल. सभागृहात सांगतो ह्या संदर्भात जो आम्ही निर्णय घेतला आहे तो द्या असा घेतलेला नाही कारण सभागृहाला आणि आम्हाला अजून पूर्ण माहिती नाही आहे काकांनी अभ्यास केलेला आहे. काकांना एक्सपिरियन्स आहे. बर्नडजींनी सांगितले त्यांचे जे डॉमणिक साहेब आहेत त्यांनी जमिन आहे इतर लोकांचीही असेल म्हणून सर्व अधिकार मा. आयुक्तांना दिले. मा. आयुक्तांनी गंभीरतेने निर्णय घ्यावा. एकूण किती अशी जागा आहे कोणाकोणाला द्यावे लागेल काय करायला लागेल. संपूर्ण अधिकार मा. आयुक्तांना दिले आहेत. आपण शहराच्या हिताचा निर्णय घेणार इकडचे स्थानिक नागरिक आहेत त्यांचा ही आपण विचार करणार. आपल्याला कोणत्या पध्दतीने हा विषय सोडवता येईल.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम, शेतकऱ्यांनी त्यांच्या ज्या जागा होत्या त्या आमच्यासमोर प्रशासनाला विकासासाठी वेळोवेळी आपआपल्या जागा दिल्या आहेत. शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी जागा आहेत त्या जागेचा मेहता साहेब बोलले त्याप्रमाणे एकत्रित विचार व्हावा. कोणावर अन्याय होऊ नये आणि त्यांचा मोबदला द्यायचा असेल तर सगळे विषय एकत्र घेऊन त्यांना तो मोबदला देण्यात यावा.

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. आयुक्त साहेब मैं आपका इस विषय पे थोडासा ध्यान चाहूँगा की हमारे पाटील साहबने शुरु में ही यह सवाल पूछा था की यह जो गोषवारा है इसके उपर हमारे ॲडीशनल आयुक्त के साईन है तो आप इससे सहमत है या नही यह सवाल सबसे पहले पूछा था। अभी हमारे आमदार साहब ने कहाँ की फायनल डिसीजन आपको लेना है। यदि यह गोषवारा आपकी तरफ से आया है। मा. आयुक्त की तरफ से आया है तो हम यह समझते है की हरी झंडी दे दी। यदि आपके तरफ से नहीं आया है तो यह समझ सकते है की आप जो है आगे इसका विचार विर्मश करके आगे निर्णय लेंगे। मैं एक बात जानना चाहूँगा सर्व्हे नं. ९० का एक गोषवारा पहले आया था। उसमें भी सेम यही प्रकरण था की खेडूत की जमिन के उपर महानगरपालिकाने गार्डन विकसित किया है। गार्डन विकसित करने के बाद नगरसेवक निधी से डेव्हलप किया है। उसके बाद में उसने जब मोबदला की बात की पहले वे आयुक्त के साथ में खांबित साहब ने जॉईंट मिटींग की थी। उसके अंदर खांबित साहब ने बताया था की यदि हम एक को मो बदला देंगे तो मिरा भाईंदर में जितने भी रस्ते और गार्डन बने बहुत सारी ऐसी जमिन है जिसको हमको आगे सबको मोबदला देना पडेगा। यदि एक प्रस्ताव आगे जाता है तो सामने जितने भी लोग है उनको कोर्ट में जाने का रास्ता ओपन हो जाएगा की महासभा ने इसको मंजूरी दे दिया है। मतलब आगे इस तरह की प्रस्ताव की झडी लग जाएगी तो मेरा आपसे एकही निवेदन है की यह जो प्रस्ताव लाया है। .......................

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या कुटुंबीयांना ११० वार जागा असेल त्याचा मला मोबदला मिळाला नाही तर मग मी कुठे जायचे? ज्याच्याकडे जमीनच नाही ते त्याच्यावरच डिपेंड आहेत ती लोक काय करणार ज्यांनी मागणी केलेली आहे पद्माकर बारक्या पाटील ह्यांनी मागणी केलेली आहे. त्यांनी दोन ऑप्शन टाकलेले आहेत एक तर टी.डी.आर. द्या किंवा मोबदला द्या.

**मा. महापौर :-**

आपण मा. आयुक्तांना तसे अधिकार दिले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्यांनी तुम्हाला प्रश्न विचारले. परंतु अजून पर्यंत आपण काही खुलासा केला नाही. मी नगरपरिषद असताना देखील नगरसेवक होतो. आता पण नगरसेवक आहे. असा प्रस्ताव अजून पर्यंत कधीही आलेला नाही.

**भगवती शर्मा :-**

मेरा एकही निवेदन है अगर किसीको मोबदला देते हो तो सामूहिक रुप से और मोबदले के बदले के अंदर में महानगरपालिका ऐसा भी बचेगा अगर टी.डी.आर के माध्यम से टी.डी.आर देंगे।

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो भाईंदर पूर्वला खारीगाव येथे ग्राऊंड फ्लोरचे मार्केट आहे. मार्केटच छोटे आहे. त्याकरिता तिकडे ग्राऊंड प्लस वनचे मार्केट बांधावे म्हणून त्यावेळचा स्टँडिंग कमिटीने काम मंजूर केले. ३६ लाख ६७ हजार आपण नोटिस वैगेरे लावले होते. जेव्हा आपण प्रत्यक्षात काम काढले तिकडे सगळी तयारी केली त्यावेळी त्या जागेच्या मालकांनी ह्या जागेचा मोबदला मागितला. आणि त्या

अनुषंगाने २०/०३/२०१२ रोजी तत्कालीन आयुक्तांकडे बैठक झाली की जागेचा मोबदला देण्याबाबत कशा प्रकारे देऊ शकतो त्या अनुषंगाने जागेचा पूर्ण टी.एल.आय.आर सर्व्हे केला रेडी रेक्नरप्रमाणे त्याचे रेट्स काढले त्या अनुषंगाने हा विषय आणलेला आहे.

**भगवती शर्मा :-**

साहेब ते ठीक आहे. बर्नड साहेबांनी पण सांगितले.

**दिपक खांबित :-**

आमच्या समोर ही पहिलीच एक केस आली होती. म्हणून ही पहिलीच केस तयार केली. त्यांची केस टी.डी.आर देण्याची होती. हे रिझर्व्हेशन नाही ना मार्केट ज्या ठिकाणी बांधतो त्या मार्केटचे रिझर्व्हेशन नसल्यामुळे आपण त्याला टी.डी.आर देऊ शकत नाही. त्याला जागेचा मोबदला देऊ शकतो ही एकमेव केस महानगरपालिकेत आमच्या समोर आलेली आहे. त्यामुळे हा विषय आणला.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, लोकांनी अर्ज केला म्हणून आपण असे करणार असे करता येणार नाही. आयुक्तांचे काम ह्या ठिकाणी काय आहे. महानगरपालिकेच्या हिताचे निर्णय घेतले पाहिजेत. महासभेला वाटले किंवा एखाद्या सदस्याला वाटले महानगरपालिका विकायची आहे तर विकून टाकणार का? असे त्यांना करता येईल. ह्या ठिकाणी सन्मा. आयुक्तांनी एवढीच दक्षता घ्यायला पाहिजे. महानगरपालिकेच्या हिताविरुध्द कोणतीही गोष्ट करता कामा नये. जर करत असाल तर ठराव विखंडीत करायला पाठवून द्या. आम्ही सांगितले त्या सन्मा. व्यक्तिला २५ लाख देण्यापेक्षा टी.डी.आर दिला तर त्यांना चांगला भाव येईल.

**सुरेश खंडेलवाल :-**

एकाला दिले तर सर्वांना द्यायला लागेल.

**मा. महापौर :-**

हा निर्णय मा. आयुक्तांना घ्यायचा आहे ह्या विषयी आपण चर्चा करु नये.

**नरेश पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, आमच्या मोर्वा गावामध्ये मच्छी मार्केट आहे ते आमच्या गावकीचे आहे त्याच्या सुध्दा आम्हाला मोबदला मिळावा एवढी विनंती करतो.

**वंदना पाटील :-**

मा. महापौर मॅडम, खारी ग्रामस्थानी पण ह्या विषयावर पत्रव्यवहार केलेला आहे. त्याची पण २३० चौ.मी. जागा निघते त्याचाही विचार केला जावा.

**मा. आयुक्त सो. :-**

मा. महापौर मॅडम, आता प्रशासनातर्फे बांधकाम विभागाचे एक्झीकेटीव्ह इंजिनिअर ह्यांनी खुलासा केलेला आहे आणि आणि त्यांनी सभागृहाच्या समोर वस्तुस्थिती आणून दिलेली आहे की ह्या ठिकाणी आपल्या महानगरपालिकेचे जुने मार्केट आहे आणि मार्केटचे रिझर्व्हेशन नाही. रिझर्व्हेशन असते तर आपल्याला संबंधीत शेतकऱ्याला टी.डी.आर देता आला असता आणि आज तिथे रिझर्व्हेशन नसल्यामुळे आणि अस्तित्वातले मार्केट आहे. त्या ठिकाणची नागरिकांची मागणी किंवा त्यांची आवश्यकता लक्षात घेऊन मागील स्टँडिंग कमिटीने महासभेने निर्णय घेतला असेल आणि स्टँडिंग कमिटीने त्याला मान्यता दिली असेल. खांबित साहेबांनी सांगितले ३६ लाखाचे इस्टीमेट ह्यापूर्वी ह्या ठिकाणी तयार होऊन मार्केट बांधण्यासाठी आले होते आणि ज्यावेळेला काम चालू केले त्यावेळेला तो शेतकरी समोर येऊन काम अडवून जागेच्या पैशाची मागणी त्यांनी केलेली आहे. त्यामुळे हा ज्वलंत प्रश्न आहे असा प्रकार आपल्या सभागृहात कधी आला नाही असे सर्व सन्मा. सदस्यांनी ह्या ठिकाणी नमूद केलेले आहे. त्यामुळे जरी आता ह्या ठिकाणी नमूद केलेले आहे. त्यामुळे तो जरी आता ह्या ठिकाणी ठराव घेऊन ते अधिकार मला दिले असले तरी सर्व कायदेशीर बाबी तपासून ह्याच्यामध्ये यथायोग्य निर्णय घेण्यात येईल. कोणावरही अन्याय होणार नाही किंवा कोणाला जास्त मावेदार दिला जाणार नाही किंवा सर्वच गावाला द्यायचे असेल तर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सगळ्या बाबी तपासून ह्याच्यात यथोचित निर्णय घेतला जाईल एवढे सभागृहाला सांगतो.

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्त साहेब आम्ही आपल्या मताशी सहमत आहोत. आपण सांगितले की त्या ठिकाणी मार्केटचे आरक्षण नाही तर आपण ३७ खाली प्रस्ताव आणा ना.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) खारीगांव येथे तळमजल्याची इमारत असून सदर इमारत सन १९८५ पूर्वी पासूनची आहे. सदर ठिकाणी तळ अधिक एक मजल्याची इमारत बांधण्याचे काम मंजूर झालेले आहे. सदर जागेपैकी ११०.०० चौ. मीटर क्षेत्राते जागा मालक श्री. तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील यांची आहे. व त्या जागेचे मालकानी सदर मार्केट इमारतीचे नुतणीकरण करण्यात येऊ नये म्हणून हरकत नोंदवली आहे. व जागेच्या मोबदल्यात बाजारभावानुसार जागेची किंमत रू. २५,८५,०००/- एवढी मागितलेली आहे. सदर मनपाचा खर्च वाचविणेकरीता प्रशासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव आणून त्यांना टी.डी.आर. देणेबाबत पुढील महासभेत रितसर प्रस्ताव आणावा असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

मतदानाची प्रक्रिया सुरु झाली आहे सर्वांनी बसून घ्या.

**वंदना चक्रे :-**

माझी सुचना ऐकून घ्या. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त महोदय आधी जो विषय झाला त्या विषयाला धरुन आहे. तुम्ही मला बोलायला द्या.

**मा. महापौर :-**

मतदान चालू झाले आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण ८१ करिता दोन ठराव आले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. रोहिदास पाटील, अनुमोदन श्रीम. कल्पना म्हात्रे, दुसरा ठराव सुचक श्री. ध्रुवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. जूबेर इनामदार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) खारीगांव येथे तळमजल्याची इमारत असून सदर इमारत सन १९८५ पूर्वी पासूनची आहे. सदर ठिकाणी तळ अधिक एक मजल्याची इमारत बांधण्याचे काम मंजूर झालेले आहे. सदर जागेपैकी ११०.०० चौ. मीटर क्षेत्राते जागा मालक श्री. तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील यांची आहे. व त्या जागेचे मालकानी सदर मार्केट इमारतीचे नुतणीकरण करण्यात येऊ नये म्हणून हरकत नोंदवली आहे. व जागेच्या मोबदल्यात बाजारभावानुसार जागेची किंमत रू. २५,८५,०००/- एवढी मागितलेली आहे. सदर मनपाचा खर्च वाचविणेकरीता प्रशासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव आणून त्यांना टी.डी.आर. देणेबाबत पुढील महासभेत रितसर प्रस्ताव आणावा असा मी ठराव मांडत आहे. मी मतदानास टाकतो. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) खारीगांव येथे तळमजल्याची इमारत असून सदर इमारत सन १९८५ पूर्वी पासूनची आहे. सदर ठिकाणी तळ अधिक एक मजल्याची इमारत बांधण्याचे काम मंजूर झालेले आहे. मौजे खारी, स.क्र.१३९(जुना), ५३ (नवा) हि.क्र.८ हा ८८०.०० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील यांचे नावे नोंद आहे. त्यापैकी ११०.०० चौ.मीटर जागा ही मार्केट इमारतीच्या खालील आहे. इमारती खालील उर्वरीत २३०चौ.मीटर जागेची नोंद खारी पाड्याचे स्मशान नावाने आहे. सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट होत आहे. सदर जागा मालकांनी सदर जागेचा मोबदला देईपर्यंत सदर मार्केट इमारतीचे नूतनीकरण करू नये म्हणून महानगरपालिकेकडे हरकत नोंदवलेली आहे. सदर जागेपैकी ११०.०० चौ. मीटर क्षेत्राते जागा मालक श्री. तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील त्यांनी सदर जागेचे चालू बाजारभावानुसार (रेडी रेकनर) जागेची किंमत देण्याची मागणी केलेली आहे. रेडी रेकनर नुसार जागेची किंमत रू. २५,८५,०००/- (अक्षरी रूपये पंचवीस लक्ष पंच्याऐंशी हजार मात्र) एवढी होत आहे. सदर जागेची मोजणी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, ठाणे यांच्याकडून करून घेण्यात आलेली आहे. सदर जागेवर मार्केटची पुर्नबांधणी करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यासाठीचे निर्णय व अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत. सुचक श्री. रोहिदास पाटील ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

श्री. रोहिदास पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४१ विरोधात ३० इतके मते पडली आहेत. श्री. रोहिदास पाटील ह्यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ८१ :-**

भाईंदर (पूर्व) खारीगाव मासळी मार्केट इमारतीच्या जागेचा मोबदला देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ८२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) खारीगांव येथे तळमजल्याची इमारत असून सदर इमारत सन १९८५ पूर्वी पासूनची आहे. सदर ठिकाणी तळ अधिक एक मजल्याची इमारत बांधण्याचे काम मंजूर झालेले आहे. मौजे खारी, स.क्र.१३९(जुना), ५३ (नवा) हि.क्र.८ हा ८८०.०० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील यांचे नावे नोंद आहे. त्यापैकी ११०.०० चौ.मीटर जागा ही मार्केट इमारतीच्या खालील आहे. इमारती खालील उर्वरीत २३०चौ.मीटर जागेची नोंद खारी पाड्याचे स्मशान नावाने आहे. सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट होत आहे. सदर जागा मालकांनी सदर जागेचा मोबदला देईपर्यंत सदर मार्केट इमारतीचे नूतनीकरण करू नये म्हणून महानगरपालिकेकडे हरकत नोंदवलेली आहे. सदर जागेपैकी ११०.०० चौ. मीटर क्षेत्राते जागा मालक श्री. तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील त्यांनी सदर जागेचे चालू बाजारभावानुसार (रेडी रेकनर) जागेची किंमत देण्याची मागणी केलेली आहे. रेडी रेकनर नुसार जागेची किंमत रू. २५,८५,०००/- (अक्षरी रूपये पंचवीस लक्ष पंच्याऐंशी हजार मात्र) एवढी होत आहे. सदर जागेची मोजणी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, ठाणे यांच्याकडून करून

घेण्यात आलेली आहे. सदर जागेवर मार्केटची पुर्नबांधणी करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यासाठीचे निर्णय व अधिकार मा. आयुक्त सो. यांना देण्यात येत आहेत.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदन :- सौ. कल्पना म्हात्रे**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | डिमेला बर्नड अल्बर्ट | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | शिल्पा भावसार | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसानी | ८ | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | पाटील वंदना विकास | |
| १० | जैन गिता भरत | १० | प्रभात प्रकाश पाटील | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | पाटील सुनिता कैलास | |
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | झिनत रऊफ कुरेशी | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | विराणी रेखा अनिल | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | वंदना रामदास चक्रे | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | अनिता जयवंत पाटील | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | काझी रशीदा जमील | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | इनामदार जुबेर | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २२ | जैन दिनेश तेजराज | २२ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २३ | जैन रमेश धरमचंद | २३ | सामंत प्रमोद जयराम | |
| २४ | डॉ. राजेंद्र जैन | २४ | पांडे हंसूकुमार कमलकुमार | |
| २५ | निलम हरिश्चंद्र ढवण | २५ | खण्डेलवाल सुरेश | **निरंक** |
| २६ | शुभांगी महिन कोटियन | २६ | डॉ. आसिफ शेख | |
| २७ | जयमाला किशोर पाटील | २७ | नरेश तुकाराम पाटील | |
| २८ | परमार अनिता भरत | २८ | भोईर कमलेश यशवंत | |
| २९ | पाटील प्रणाली संदिप | २९ | रविंद्र भिमदेव माळी | |
| ३० | गावंड मंदाकिनी आत्माराम | ३० | वंदना मंगेश पाटील | |
| ३१ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ३२ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३३ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३४ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३५ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३६ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३७ | केळुसकर प्रशांत नारायण | | | |
| ३८ | भोईर भावना राजू | | | |
| ३९ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४० | मुन्ना सिंग | | | |
| ४१ | ॲड. रवि व्यास | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम, आधीचा जो विषय झालेला आहे. माझ्या वॉर्डात संघवी नगर इथे २००८ मध्ये ठराव पास झाला होता की, मिरारोड मध्ये कुठेही फेरिवाला रस्त्यावर बसणार नाही. अमूक ठिकाणी माझ्याकडे सर्व्हे नंबर आहे त्या ठिकाणी महानगरपालिकेची इमारत बनवायचा असा ठराव पास झाला होता. त्याची माहिती पाहिजे होती त्यासाठी मी म्हटले मला बोलायला द्या.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला विनंती राहील. सन्मा. सचिव साहेब हरेश पाटील ह्यांच्या बहिणीचे निधन झालेले आहे. आम्ही सभागृहाला विनंती करतो की ही सभा तहकूब करुन बजेटची सभा ३० तारखेला आयोजित केली आहे ती संपल्यावर हे विषय घेण्यात यावे. अशी मी सभागृहास सुचना देतो. बजेटची सभा संपल्यावर त्वरीत ही सभा घेण्यात यावी.

**मा. महापौर :-**

आजची सभा तहकूब होऊन बजेटची सभा संपल्यावर ही सभा चालू होणार.

**(सभा तहकुबीची वेळ संध्या. ६.०५ मिनिटे)**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

